म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ..... बा. वा.
दा. क्र. ३४२४

BVBK-0401124

बो. वा.
नों. क्र. ११२४

हा सूर्य स्वातंत्र्याचा

स्वातंत्र्यवीर नेताजी सुभाषचंद्र बोस
यांची रोमहर्षक जीवन कहाणी

ना. स. करंदीकर

BVBK-0401124

...शाखा.
...बाल वाङ्मय विभाग.
दा, क्र. ११२४ दिनांक .....
विषय ... फेब्रो २ क्र. ६३१

निसंग साहित्य

अनिरुद्ध साहित्य : ९

• हा सूर्य स्वातंत्र्याचा
ना. स. करंदीकर

• मुखपृष्ठ
सुभाष अवचट

• नकाशा
खाजगीवाले चित्रायन

• प्रथमावृत्ती
१५ ऑगस्ट १९७४

• सर्वाधिकार
ना. स. करंदीकर

प्रकाशक
गजानन दामोदर क्षीरसागर
अनिरुद्ध साहित्य
१४९३ क, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

मुद्रक
सौ. कमल रामचंद्र घळसासी
संजीव मुद्रणालय
४६९, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

मूल्य सहा रुपये

प्रिय भगिनीस

चि. कमलाताईस

—नाना

आजच्या प्रौढ पिढीने स्वातंत्र्यपूर्व काळातील पंचवीस वर्षे अनुभविली आहेत. तौलनिक दृष्ट्या ब्रिटिशांच्या राजवटीच्या शेवटच्या वर्षांची कारकीर्द व स्वातंत्र्योत्तर काळातील देशस्थिती यांचे चित्र त्यांच्यापुढे तरळते आहे. स्वराज्य आले पण सुराज्य आले नाही, उजाडले पण सूर्याचा पत्ता नाही अशी स्थिती आजची आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ज्या देशभक्तांनी क्रांतिकारकांनी, समाजधुरीणांनी स्वातंत्र्यासाठी, जनहितासाठी देह झिजविला, सर्वस्व पणाला लावले आणि स्वातंत्र्याचा प्रभातकाल पाहिला त्यांना धन्यता वाटली. १९२० ते १९४५ या पंचवीस वर्षांच्या काल-खंडात जे अद्वितीय समाजधुरीण नेते, धाडसी, शूर, मुत्सद्दी, लढवय्ये, कुशल संघटक होऊन गेले त्यांत देशभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस यांची गणना प्रामुख्याने होते.

आजच्या तरुण पिढीने त्यांना पाहिले नाही. नेताजींचे जीवन, वक्तृत्व, धडाडी, शूर कृत्ये यांची आठवण त्यांना करून देण्याचे कार्य पुनः पुन्हा केले पाहिजे. सुभाषचंद्र म्हणजे मूर्तिमंत उत्साह, मूर्तिमंत त्याग-साहस-शौर्य यांचे प्रतीक. 'बंडखोर' म्हणून ते सर्व क्षेत्रांत चमकले व तेच त्यांचे वैशिष्ट्य. असंतोषाचे जनक, तेल्यातांबोळ्यांचे पुढारी ही हेटाळणी लोकमान्य टिळकांना सोसावी लागली, पण तीच त्यांची बिरुदावली ठरली. त्याचप्रमाणे ज्यांच्या कृतीने, वक्तव्याने ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या हृदयात धडकी भरे, शरणागती पत्करावी लागे, नमते घ्यावे लागे—असे हे सुभाषचंद्र बोस. बदलत्या काळाची पावले ओळखून वागणारे, धोरणी, द्रष्टे, मुत्सद्दी, राजकारणी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचेकडून प्रेरणा, मार्ग-

दर्शन घेऊन सुभाषबाबूंनी जर्मनी, रशिया, मलाया, सिंगापूर, टोकियो येथे जाऊन स्वतंत्र लष्करी सेना उभारली, आझाद स्वतंत्र सरकारची स्थापना केली; अशक्य कोटीतील कितीतरी घटना सत्य करून दाखविल्या, ध्येय साकार करण्यासाठी सर्वस्वाचे बलिदान केले, अनेकांना देशासाठी हौतात्म्य पत्करण्याची प्रेरणा दिली आणि मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी उघड उघड लढा दिला. ब्रिटिशांची पोलादी राजवट खिळखिळी झाली, कोलमडली आणि क्षितीजापलीकडे सूर्यास्त व्हावा त्याप्रमाणे नाहीशी झाली ! सुभाषबाबूंनी छत्रपती शिवाजीमहाराजांचे चरित्र, चारित्र्य आणि धोरण आदर्श म्हणून सतत डोळ्यांपुढे ठेवले. देशातील आणि परदेशांतील असंख्य नेत्यांच्या, थोर थोर देशभक्तांच्या, पुढाऱ्यांच्या आणि स्वतंत्र राष्ट्रांच्या सर्व प्रमुखांच्या गाठीभेटी घेतल्या, चर्चा केली, साहाय्य मिळविले आणि परदेशांत जाऊन लष्कर उभारून, स्वतंत्र सरकार स्थापून, द्रव्यसहाय्य मिळवून जो लढा दिला, जे शौर्य गाजविले त्याची हकीकत भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली जाईल. सुभाषचंद्र म्हणजे कृष्णमेघांनी व्याप्त झालेल्या आकाशात तळपणारी, नेत्र दिपवून टाकणारी बिजलीच ! तरुण पिढीला त्यांच्या चरित्रातून कितीतरी आदर्शाचे धडे मिळतील, प्रेरणा लाभेल आणि सद्यस्थितीतही आपल्या देशासाठी काहीतरी दिव्य आणि भव्य करून दाखवावे अशी जिद्द निर्माण होईल. ते कार्य त्यांच्या चरित्रवाचनाने थोडेफार जरी झाले तरी लेखकाच्या प्रयत्नांचे, प्रकाशकांच्या कष्टाचे चीज झाले असे होईल.

□

अनुक्रम

सूर्योदय	७
सरस्वतीची उपासना	१३
मातृभूमीसाठी	२१
प्रकृतीस्वास्थ्यासाठी परदेशगमन	३४
हरिपुरा काँग्रेस १९३८	४५
स्वातंत्र्यवीरांची भेट	४७
सिंह निसटला	५२
बर्लिनमधील कार्य	६०
आशियाकडे	६६
आझाद हिंद सेनेचे नेते	७०
लढ्याची प्रत्यक्ष सुरुवात	९०
रणकुंड पेटले	९८
सूर्यग्रहण	१०६
स्वातंत्र्यसूर्याला अर्घ्य	११३

सूर्योदय

भारताच्या पूर्व क्षितिजावर सूर्योदय झाला. मातृभूमीच्या पायात जखडलेल्या शृंखला तोडण्यासाठी आजवर अनेक वंगभूमीच्या युवकांनी ब्रिटिशांच्या बलाढ्य पोलादी सत्तेशी झुंज दिली. तळहातावर शीर घेऊन प्राण पणाला लावून! सत्तेच्या अभेद्य पोलादी भिंतीवर आतून आणि बाहेरून धडका दिल्या. खिंडार पाडले. ब्रिटीश साम्राज्यावरील सूर्य कधीही मावळत नाही अशी घमेंड बाळगणाऱ्या सत्तेला समोरासमोर आव्हान दिले. सुरेंद्रनाथ बानर्जी, बिपीनचंद्र पाल, देशबंधू चित्तरंजन दास, खुदिराम बोस, बीणा दास, बारींद्र, श्री अरविंद या दैदिप्यमान देशभक्तांच्या मालिकेत कंठमणी म्हणून शोभणारे बाबू सुभाषचंद्र बोस! त्यांच्या तेजस्वी जीवनाची गौरवगाथा आज मुक्तकंठाने गायची आहे. जी गाथा पुनः पुनः ऐकली तर नित्य नूतन वाटावी, अंगावर रोमांच उभे राहावे, बाहू स्फुरावे, हृदय हेलवावे, नयनात अश्रू उभारावे, मस्तक नत व्हावे, कर जुळावे आणि मुखावाटे उद्‌गार निघावे, 'धन्य सुभाष, धन्य भारतमाता!' असे वाटते की ती जणू कालीमाता आपल्या शक्तीचा आविष्कार या आपल्या सुपुत्रांच्या जीवनातून घडवीत आहे! केवळ शक्तीचाच नव्हे तर भक्तीचा, प्रेमाचा, चैतन्याचा, त्यागाचा आणि अपार करुणेचा! देशगौरव सुभाषचंद्र यांची ही गौरवगाथा ही त्या शक्तीचाच एक आविष्कार.

जगन्नाथपुरी या सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्राजवळ ओरीसा प्रांताची राजधानी कटक आहे. या शहरात जानकीनाथ बोस यांचे घराणे सुप्रतिष्ठित होते. स्वतः जानकीनाथ हे नामांकित वकील, उदारमतवादी, सुसंस्कृत बहुश्रुत असून सरकार व सामान्य जनता या दोघांनाही प्रिय असत. आपल्या कर्तृत्वाने ते दोघांचीही सेवा करण्यात मग्न असत. सरकारने त्यांना रावबहादूर ही मानाची पदवी दिली होती. ते म्युनिसिपालिटीचे चेअरमन होते. आपल्या मुलांच्या मनावर

उत्तमोत्तम संस्कार घडावे यासाठी ते सदैव जागरूक असत. जानकीनाथ हे सुभाषचंद्रांचे पिताजी. जन्मदात्या मातेचे नाव प्रभावतीबाई. या दांपत्याला अमाप संततीचे वरदान होते. त्यांना एकंदर चौदा अपत्ये झाली. प्रभावतीबाई या अष्टपुत्रा व षट्कन्या सौभाग्यवती होत्या. चंद्र ही बिरुदावली प्रत्येक मुलाला लाभली होती. सुभाषचंद्र हे सहावे सुपुत्र व नववे अपत्य. बॅ. सतीशचंद्र, श्री. सुधीरचंद्र, डॉ. सुनीलचंद्र, सुभाषचंद्र, शैलेशचंद्र, बॅ. शरच्चंद्र ही मुलांची नावे तर प्रमिला, सरला, तारामाला, प्रतिभा, मणिला, कनकलता ही मुलींची नावे. प्रभावतीमाता या धर्मशील, परोपकारी, साध्वी ! दीनदुबळ्या अनाथ अपंग दुःखितांविषयी त्यांच्या अंतःकरणात अपार करुणा असे. मुलांच्या जीवनावर सुसंस्कार घडत गेले ते मातेच्या आचार, विचार व वागणुकीने. सुभाषचंद्र भावपूर्ण, प्रेमळ, श्रद्धाळू झाले त्याचे श्रेय मातेला ! ह्या श्रद्धाळू माता भगवान रामकृष्ण परमहंसांच्या महान भक्त होत्या. सहाव्या बाळंतपणाचे वेळी प्रभावतीदेवी चोवीस परगण्यातील कोडालिया या गावी होत्या. २३ जानेवारी (शनिवारी) १८९७ रोजी सुभाषचंद्रांचा जन्म झाला. बोस घराण्यालाच काय पण अखिल भारताला ललामभूत व्हावे असे या सुपुत्राचे जीवन; पूर्णचंद्राच्या कौमुदीप्रमाणे !

शैशवावस्था सुरू झाली. संगोपन संवर्धन शिक्षण हे क्रमाक्रमाने होत गेले. लहानपणापासून बाळ सुभाष साधेपणाने राहात असे. निजायला गादी पलंग याची या बाळाला गरज भासत नसे. अंगावर एक साधे शुभ्र धोतर असले म्हणजे पुरे. उन्हाळा असो की हिवाळा–पावसाळा असो, बाळ सुभाष एका वस्त्रानिशी फरशीवर झोपून राही; मग आईचे लक्ष जाऊन तिने म्हणावे, 'अरे बाळ, असा कसा रे झोपतोस !' मग तिने हळूच त्याला पलंगावर आणून निजवावे. चादर पांघरावी व थोपटावे. यावर कधी कधी माय लेकाचा संवाद होई. सुभाष म्हणे, 'आई, आपले पूर्वज ऋषीमुनी असेच भूमीवर निजत असत ना ?' त्याने स्नानाला गंगेला जावे, स्तोत्रे म्हणावी. लहानपणापासून ही विरक्ती अंगी मुरावी यात नियतीचा काही हेतू असावा, 'शय्या भूमीतलं दिशोऽपि वसनं ज्ञानामृतं भोजनम्' या साधु जीवनाप्रमाणे !

मातापित्याकडून सौजन्य, माधुरी, बोलण्यात गोडवा, हृदयात दुःखितां-

विषयी अपार करुणा, औदार्य या दैवी गुणसंपत्तीचा वारसा घेऊन इतर भावंडांबरोबरच बाळ सुभाषचे संवर्धन चालू होते.

शैशव संपले. पाच वर्षे पूर्ण झाल्यावर बाळ सुभाषला कटक येथील एका प्राथमिक शाळेत घालण्यात आले. प्राथमिक शिक्षणानंतर अकराव्या वर्षी कटक येथील रेवेनशा कॉलेजिएट स्कूलमध्ये प्रवेश मिळाला. बाळ सुभाष लहानपणापासून हुशार; या शाळेमध्ये त्याच्या तैलबुद्धीला विस्तृत क्षेत्र मिळाले. शाळेचे मुख्य अध्यापक श्री. वेणीमाधवदास हे होते. वृत्तीने धार्मिक, त्यागी आणि आदर्श शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांच्या आचार विचारांचा प्रभाव सुभाषवर दिसू लागला. तो वेणीमाधवदासांनाच आपले गुरू मानू लागला. दररोजचे गृहपाठ उत्तम प्रकारे करणाऱ्या सुभाषची वृत्ती शिक्षणाबरोबर व्यापक, उदार आणि परोपकारी होऊ लागली होती. या मुलाचा सर्व वेळ ग्रंथालयात ग्रंथवाचनात चिंतनात जाऊ लागला. म. रामकृष्ण परमहंस आणि त्यांचे शिष्योत्तम स्वामी विवेकानंद यांचे कार्य त्याला जवळून पाहावयास मिळाले होते. दक्षिणेश्वर, बेलूरमठ येथील श्रेष्ठ महात्म्यांचे जीवन त्याने अभ्यासले होते.

इंग्रजी भाषेवर सुभाषचे प्रभुत्व विलक्षण होते. त्यावेळी लिहिलेल्या एका उत्तरपत्रिकेसंबंधी परीक्षकाने शेरा दिला, 'एवढा उत्तम पेपर मी ही लिहू शकणार नाही!'

१९१३ साली वयाच्या सोळाव्या वर्षी सुभाषचंद्राने दहा हजार विद्यार्थ्यांत मॅट्रिकच्या परिक्षेत सुयश मिळवून पहिल्या वर्गात दुसरा क्रमांक मिळविला. स्वतःबरोबर शाळेलाही श्रेय मिळाले.

हा सूर्य कलाकलांनी तेजोमय होत होता. त्याची तेजस्वी किरणे चहूकडे पसरत होती. त्याच्या विकासाला नवे विस्तृत क्षेत्र हवे होते. पिताजी मुलांच्या शिक्षणासाठी वाटेल तेवढा पैसा खर्च करण्यास तयार होते. घरची स्थिती सुसंपन्न होती. विद्येचे महत्त्व पटलेले असलेल्या या सुविद्य, सदाचारसंपन्न कुटुंबातली मुले पुढील शिक्षणासाठी कलकत्त्यास जात. कुशाग्र बुद्धीच्या व्यासंगी हुशार सुभाषला पुढील विश्वविद्यालयीन शिक्षणासाठी कलकत्त्यास पाठवण्यात आले.

सूर्योदयापूर्वी

१९१३ चा हा समय. १९०५ सालची वंगभंग चळवळ देशव्यापी झालेली. लो. टिळक व श्री. अरविंद घोष यांनी ब्रिटिशसत्तेविरुद्ध रणशिंग फुंकलेले. १९०७ सालच्या सुरत काँग्रेसनंतर जहाल मवाळ पक्ष अटीतटीने राजकारणात उतरलेले.

ब्रिटिशांच्या जुलमी सत्तेचा वरवंटा देशभक्त, क्रांतिकारक यांच्यावर फिरत राहिलेला. श्री. अरविंदबाबूंची वंदेमातरम युगांतर ही पत्रे विचारक्रांती घडवीत असलेली. एकीकडे क्रांतिकारकांचे प्रयत्न तर एकीकडे वैचारिक क्रांती घडवून आणण्याचे जहाल काँग्रेस कार्यकर्त्यांचे प्रयत्न. देशगौरव चित्तरंजनदास, बिपीनचंद्र पॉल यांनी स्वदेशी, बहिष्कार, परदेशी कपड्यांच्या होळ्या या चळवळी हाती घेतलेल्या. सर्वत्र धरपकड, तुरुंगवास यांनी जीवन व्याप्त झालेले. राजद्रोहाचा आरोप लादणे, खटले भरणे, कोणत्या ना कोणत्या कलमाखाली दोषी ठरवून कारागृहात अडकविणे याचे सत्र ब्रिटिश सत्ता जुलमीपणाने चालवीत होती.

सर्व पुढारी तुरुंगात डांबलेले. वैफल्य, निराशा यांनी थोडेसे शिथील झालेले. बाबू अरविंद घोष यांनी राजकारणाचा संन्यास घेऊन ब्रिटिशांचा ससेमिरा चुकविण्यासाठी पांडिचरी हे अज्ञातवासासाठी निवडलेले!

बंगाल स्फोटक झालेला. महाराष्ट्राने प्रेरणा द्यावी व बंगालच्या भावनापूर्ण युवकांनी चळवळ सुरू करावी. वाढवावी व हौतात्म्य पत्करून देशव्यापी करावी असे हे अन्योन्य संबंध.

१७ जून १९१४ ला लो. टिळकांची मंडाले तुरुंगातून सुटका झाल्यावर त्यांनी 'पुनःश्च हरि ॐ' हा मंत्र जपून राजकारणाची सूत्रे हाती घेतलेली. म. गांधींचे राजकारण दक्षिण आफ्रिकेत चालू असलेले. ब्रिटिश राजसत्ता, नोकरशाहीचे जुलमी कायदे या सर्वांबद्दल घृणा येऊन सर्व देश स्वदेशी, बहि-

ष्कार, राष्ट्रीय शिक्षण, या चतुःसूत्रीने एकत्र आलेला. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जीवन त्यागी, धाडसी आणि त्यांना झालेली काळ्यापाण्याची शिक्षा ही जनतेसमोर आलेली. या क्रांतिवीराने शिक्षा ठोठावली त्या वेळी उद्‌गार काढले होते—'तुम्ही जी परमावधीची शिक्षा सांगितली ती निमुटपणे सोसण्याला मी सिद्ध आहे. आमची प्रिय मायभूमी शाश्वतीच्या विजयाप्रत पोचायची ती हालअपेष्टा व स्वार्थत्याग या मार्गानीच पोचेल अशी माझी श्रद्धा आहे.'

राजकीय क्षेत्रात वावरत असताना पुढील सर्व जीवनात सुभाषचंद्रांच्यावर दोन महान राजकारणी पुरुषांचा प्रभाव पडला होता. पहिले देशबंधू चित्तरंजन दास व दुसरे स्वातंत्र्यवीर सावरकर! या दोन महापुरुषांच्या त्यागाने, देशसेवेने ते भारून गेले होते. त्यांना आपले राजकीय गुरू मानले होते. म. गांधीजी, पं. जवाहरलाल नेहरू यांच्याबद्दल सुभाषबाबूंना विलक्षण आदर होता; पण त्यांचे श्रद्धास्थान मात्र हे दोन वीरपुरुष होते. विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत सुभाषचंद्रांच्या जीवनाची जडण घडण होत होती. एकीकडे कॉलेजचे शिक्षण चालू असताना सूक्ष्मपणे ते भोवतालच्या परिस्थितीचे अवलोकन करीत होते. बंगालचेच काय पण सर्व भारताचे राजकीय जीवन स्फोटक होत चालले होते. ब्रिटिशांच्या पाशवी सत्तेची स्मारके कलकत्ता शहरात जागोजागी होती त्यांच्याकडे पाहताना कोणत्याही देशभक्त तरुणाचे रक्त उसळावे. ब्रिटिशांच्या कुटील राजनीतीला तोंड देणारी प्रबळ शक्ती जनतेत हळूहळू दृढावत होती. १८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर सतत प्रयत्न चालू होते. भारतीय उत्थानाच्या काळात दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, न्या. रानडे, लो. टिळक, सुरेंद्रनाथ बानर्जी, लाला लजपतराय, विपीनचंद्र पाल यांसारखे पुढारी सतत प्रयत्न करीत होते. पहिल्या महायुद्धात दोस्तांना भारतीयांनी सर्वतोपरी साहाय्य केले पण त्याबद्दल कृतज्ञता बुद्धी तर राहोच पण सत्तेचा वरवंटा जुलमी कारभाराच्या रूपाने फिरवला जात होता. सैन्याच्या बळावर इंग्रज भारतावर सत्ता गाजवीत होते तेव्हा असे सैन्य जमा करणे आणि तयार केलेले सैन्य आपणाकडे वळविणे हे उपाय योजणे अत्यावश्यक होते. याची जाणीव स्वातंत्र्यवीर सावरकरांदी क्रांतीकारकांना पूर्ण झाली होती. पण चढाऊ राजकारण करणारे तळहातावर शीर

घेऊन मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करणारे शूर वीर हवे होते. नुसते शौर्य, धाडस उपयोगी पडणारे नव्हते. छत्रपती शिवाजी महाराजांचा गनिमी कावा, हिकमत, बुद्धिमत्ता व अचाट शौर्य यांची गरज होती.

लो. टिळकांचे धोरण असेच होते पण कॉंग्रेसचे मवाळ धोरण प्रतिकूल ठरल्याने त्यांना लढाऊ राजकारणाचा मार्ग पत्करावा लागला. बाबू अरविंद घोष यांच्या सहकार्याने त्यांनी स्वतंत्र पक्ष सुरू केला. लो. टिळकांच्या निधनानंतर म. गांधीजींचा भारतीय राजकारणक्षेत्रात उदय झाला व त्यांनी धोरण बदलून आसेतु हिमाचल जनजागृती केली. क्रांतिकारक आपल्या मार्गाने कार्य करीत होतेच. म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली असंख्य देशभक्त तयार झाले. देशबंधू बॅ. चित्तरंजनदास हे त्यापैकीच एक अग्रगण्य देशभक्त पुढारी. जितके त्यागी, परोपकारी तितकेच ज्वलंत, देशप्रेमी, लढाऊ, राजकारणी. अशा धोरणी मुत्सद्दी देशबंधूंच्या मार्गदर्शनाखाली बंगालची तरुण पिढी आकृष्ट होत होती. सुभाषचंद्र हे त्यांतले एक अग्रगण्य.

१९२० साल उजाडले ते क्रांतीच्या ज्वाळा पेटवूनच. अखिल राष्ट्र या असहकारितेच्या चळवळीने खडबडून जागे झाले. चैतन्याची व देशप्रेमाची लाट वेगाने वाहू लागली. शाळा-कॉलेजे ओस पडली. परदेशी कापडांच्या होळ्या सर्वत्र पेटू लागल्या.

सुभाषचंद्र हे अशाच तरुणांचे प्रतिनिधी. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पुरे झाल्यावर १९१३ साली वयाच्या सोळाव्या वर्षी ते कलकत्त्यास आले. विश्वविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांच्या संस्कारक्षम जीवनाची जडण घडण होत होती. मॅट्रिकच्या परीक्षेत सर्व विद्यार्थ्यांत दुसरा क्रमांक मिळवून ते आता शिक्षणाच्या विस्तृत क्षेत्रात पदार्पण करीत होते. लहान तलावातला मासा कलकत्त्याच्या हुगळी नदीच्या विशाल पात्रात उतरला होता. पुढे तो उपसागर–महासागरात प्रवेश करून प्रचंड, विशाल, भव्य स्वरूपात कसा परिवर्तित झाला हे आता पाहावयाचे आहे.

सरस्वतीची उपासना

१९१३ साली कलकत्त्यास उच्च शिक्षणासाठी आल्यावर सुभाषबाबूंनी प्रेसिडेन्सी कॉलेजात प्रवेश मिळविला. अल्पावधीत त्यांच्या विलक्षण हुशारीची, बुद्धिमत्तेची छाप सहकारी मित्रांवर व प्राध्यापकांवर पडू लागली. उंच गोरापान, तेजस्वी पण धीरगंभीर वृत्तीचा हा विद्यार्थी सर्व विद्यार्थ्यांत वेगळाच भासे. बाष्कळ गप्पा, विनोद, वटवट करण्यात वेळ न घालवता हा विद्यार्थी ग्रंथालयात ग्रंथवाचनात गढून जाई. तो वक्तृत्वसभेत भाग घेई. भगवान रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांचा तो चाहता होता. रामकृष्णांपेक्षा स्वामी विवेकानंदांच्या प्रतिभेने आणि कार्याने तो भारावून जाई. त्यांचे ध्येय व कर्तृत्व, चारित्र्य आणि गुरुभक्ती ही त्याला आदर्श वाटत. पुण्यास स्थायिक झालेले हरिकृष्ण मंदिरातील श्री. दिलीपकुमार रॉय हे सुभाषबाबूचे सहाध्यायी, वर्गमित्र; त्यांनी सुभाषबाबूंनी प्रेसिडेन्सी कॉलेजात प्रवेश केला त्या पहिल्या दिवसापासून त्यांच्या आठवणी आपल्या प्रभावी भाषाशैलीत 'नेताजी दी मॅन' या पुस्तकात नमूद केल्या आहेत. ते म्हणतात, 'सुभाषबाबू हे अत्यंत हुशार, वात्सल्याने परिपूर्ण, चारित्र्यसंपन्न असे सन्मित्र होते. ते आपली मते दुसऱ्यावर लादत नसत; पण वेळी सल्ला देत. स्त्रियांविषयी ते अलिप्त असत. ते सचोटीने वागणारे, प्रामाणिक असत. जुन्या रुढी परंपरा यांचे ते भोक्ते नव्हते. स्वतंत्र विचाराचे, प्रसिद्धीला विन्मुख असलेले पण विद्यार्थ्यांना सदा प्रिय असलेले नेते होते. विद्यार्थी दशेपासून त्यांचा ओढा राजकारणाकडे होता तरी ते प्रसंगी गूढ विचारात मग्न असत. स्वावलंबन, शिस्त, टापटीप, याचे ते भोक्ते होते. त्यांचे अंतःकरण देशप्रेमाने, श्रद्धेने तुडुंब भरलेले असे. भारतमातेची मूर्ती हृदयमंदिरात साठवून तिची पूजा श्रद्धेने करण्यात, तिच्यासाठी त्याग करण्यात जीवनाची सार्थकता आहे असे ते मानीत. प्रत्येकाने 'सधर्माने' म्हणजे आपल्या सद्सद्विवेक-

बुद्धीस स्मरून वागावे यावर त्यांचा कटाक्ष असे.

विश्वविद्यालयाची पहिली परीक्षा उत्तीर्ण झाली. सुभाषबाबूंनी इंटरच्या वर्गात पदार्पण केले. एकीकडे कॉलेजचा अभ्यास चालू असताना सुभाषबाबूंचे मन अज्ञाताच्या शोधात रमू लागले. जीवनात चंगीभंगी ऐषारामी थाटामाटाकडे ते कधी वळले नाहीत. चैन, उधळमाधळ यांचा स्पर्शही त्यांना नसे. अज्ञातवासात दूर दूर कोठे तरी जावे, अनंताचा शोध लावावा, जीवनाचा अंतिम हेतू कोणता हे पाहावे या हेतूने ते गुरूच्या शोधात एके दिवशी माता, पिता, बंधू, भगिनी, स्नेहीसोबती या कोणालाही न कळविता घरातूनच बाहेर पडले. अंतःकरणातील सत्प्रवृत्तींना साक्षी ठेऊन वाट फुटेल तिकडे हा तरुण विद्यार्थी गुरूच्या शोधात भटकू लागला. संत–महात्मे–साधू बैरागी, गोसावी· महंत यांची गाठ घ्यावी, या हेतूने ते हिंडत हिंडत दिल्ली, आग्रा, मथुरा, वृंदावन, काशी, गया या तीर्थक्षेत्री गेले. निष्कांचन स्थितीत कोणालाही बरोबर न घेता एवढ्या लहान वयात हा घेतलेला शोध धाडसी होताच पण त्या· मागील हेतू हा विशेष प्रेरक होता. ध्रुवबाळासारखा. सुभाषबाबूंनी ही सर्व क्षेत्रे धुंडाळली. अनेक संत–महंत–साधूंच्या गाठीभेटी घेतल्या. पण त्यांचे समाधान करील असा कोणीही महात्मा त्यांना त्या दिवसांत भेटला नाही. उलट कित्येक साधू बैरागी महंत-नशाबाज, गांजेकस, भ्रष्ट आचार-विचारांचे असलेले आढळले. शुद्ध सात्त्विक आचार–विचारांचा आदर्श महापुरुष चिरशांतीचा मार्ग दाखवणारा कोणी भेटला तर या जिज्ञासू; परमार्थी–अध्यात्म गूढवादाकडे वळलेल्या तरुण विद्यार्थ्याचे जीवनच आमूलाग्र बदलले असते. आणि हा भारत देश एका थोर पुढारी, देशभक्त नेत्याच्या कर्तृत्वाला मुकला असता. पण योगी परमहंस अध्यात्ममार्गी झाले असते तर सुभाषबाबू काय करू शकले असते हे केवळ कल्पनेवरच सोपवलेले बरे. ब्रह्मजिज्ञासू सुभाषबाबूंची मनीषा त्या काळी परिपूर्ण होऊ शकली नाही एवढे मात्र खरे. नियतीचा त्यातही काही हेतू असावा. त्यांना घराबाहेर पडून सहा महिने लोटले होते. पश्चात्ताप झाला होता; विवेकाने विकारांवर मात केली आणि कोठे तरी न भटकता सुभाषबाबू एके दिवशी कोणालाही न कळवता जसे बाहेर पडले तसे एके दिवशी घरी येऊन प्रकट झाले!

इकडे घरची मंडळी अत्यंत चिंतेत होती. सर्वत्र शोध चालू होता. प्रभावती-देवींच्या दुःखाला पारावार नव्हता. मातेचे हृदय क्षणोक्षणी व्याकुळ झाले होते. पुत्रवियोगाने ती खंगली; भ्रमंती करून एकाएकी प्रगट झालेल्या आपल्या प्रिय सुभाषला पाहून तिचे अंतःकरण गहिवरून आले. अनेक ठिकाणी भ्रमंती केल्याने सुभाषबाबूंचे शरीर दुर्बल झाले होते. ते आजारी पडले. काही दिवस पूर्ण विश्रांती घेतल्यावर सावरले. पुन्हा शिक्षण सुरू झाले. जणू मध्यंतरीचा काही काळ पडद्याआड झाला होता.

१९१५ साली सुभाषबाबू इंटरची परीक्षा पहिल्या वर्गात पास झाले. पदवी परीक्षेसाठी त्यांनी तत्त्वज्ञान हा ऐच्छिक विषय निवडला होता. पहिले वर्ष पार पडले आणि एक संस्मरणीय प्रसंग कॉलेज जीवनात घडून आला. त्या प्रसंगाने सुभाषबाबूंची स्वाभिमानी वृत्ती, अन्यायाबद्दलची चीड, धडाडी आणि वीर-वृत्ती प्रकट झाली.

तो प्रसंग असा—

प्राध्यापक विद्यार्थ्यांना शिकवितात. चारित्र्यसंपन्न करतात; जीवनातल्या विशाल क्षेत्रात नागरिकाचे धडे देतात. आजचा कॉलेज युवक उद्याचा नागरिक असतो; पण काही प्रसंग असे उद्‌भवतात की विद्यार्थ्यांनाच प्राध्यापकांना धडे देण्याची वेळ येते. प्रेसिडेन्सी कॉलेजात बी. ए. च्या शेवटच्या वर्षी शिकत असता कॉलेज जीवनात असाच एक प्रसंग घडला.

कॉलेजात ओएटन् नावाचे एक प्राध्यापक होते. ते इंग्रजी शिकवीत व होतेही इंग्रज. ब्रिटिश सरकारचे सेवक. त्यांना इंग्रजांबद्दल जाज्वल्य अभिमान तितकाच हिंदी जनतेबद्दल तिरस्कार वाटे. त्यांच्या चालण्या, बोलण्यात, शिकवण्यात हिंदी विद्यार्थ्यांबद्दल तिरस्कार वृत्ती दिसून येई. ते तुच्छतेने वागवत. अपमानास्पद शब्द उच्चारत. एके दिवशी एका हिंदी विद्यार्थ्याबद्दल त्यांनी असेच अपमानास्पद शब्द उच्चारले. ही वार्ता विद्यार्थ्यांना समजताच ते खवळले. सुभाषबाबू त्यावेळी ग्रंथालयात वाचत बसले होते; त्यांना ही वार्ता समजताच त्यांचा राग अनावर झाला. हातातले पुस्तक टेबलावर आपटून ते बाहेर आले. विद्यार्थ्यांत जाऊन मिसळले. खरा प्रकार काय झाला तो समजून घेतला. दोष विद्यार्थ्यांचा नाही याची खात्री होताच ते पुढाकार घेऊन प्रिन्सिपॉल

साहेबांकडे तक्रार घेऊन गेले. 'प्रा. ओएटन् यांनी आम्हा हिंदी विद्यार्थ्यांचा अपमान केला आहे त्याबद्दल त्यांनी आमची माफी मागावी.' प्रिन्सिपॉल-साहेबांना ही कल्पनाच सहन होईना. एका इंग्रजी प्राध्यापकाने विद्यार्थ्यांची जाहीरपणे माफी मागायची म्हणजे काय?... त्यांनी स्पष्ट नकार दिला. सुभाषबाबूंना तिथून चालते होण्यास सांगितले.

सुभाषबाबूंनी विद्यार्थ्यांची सभा घेतली. संपावर जाण्याचा निर्णय घेतला. सुभाषबाबू आता विद्यार्थ्यांचे आवडते पुढारी झाले होते. दुसरे दिवशी सर्व विद्यार्थी संपावर! कॉलेज ओस पडले. मग प्रिन्सिपॉलसाहेबांनी ओएटन् साहेबांना बोलावून घेतले. प्रकरण जास्त चिघळू नये म्हणून विद्यार्थ्यांची समजूत घालून समेट करता आला तर पाहा असे सुचविले. कशीबशी तडजोड झाली पण ओएटन साहेबांना आपला अपमान झाला असे वाटले. ते शल्य त्यांना रात्रंदिवस सलत होते. कॉलेजचे वर्ग सुरू झाले. ओएटन साहेब आतल्या आत धुमसत होते. एके दिवशी त्यांनी एका हिंदी विद्यार्थ्याच्या श्रीमुखात मारली. ही वार्ता पसरताच सर्व विद्यार्थ्यांनी ओएटन साहेबाला घेराव घालून ठोकून काढले व धडा शिकविला. पण त्याचा परिणाम भयंकर झाला व तो भोवला मात्र सुभाषबाबूंना एकट्यालाच.

बंगाल सरकारच्या कानी ही वार्ता जाताच त्यांनी चौकशी केली व प्रिन्सि-पॉलसाहेबांस बडतर्फ केले. प्रिन्सिपॉलसाहेब खवळले पण हुकूम आल्यावर करतात काय? श्रीयुत बोस हाच विद्यार्थी या सर्व प्रकरणाला जबाबदार आहे हे माहीत असल्याने त्यांनी सुभाषला बोलावले व फर्माविले, 'मिस्टर सुभाष बोस, या सर्व कटकटी तुझ्यामुळेच झाल्या. कॉलेजातील शांतता तुझ्यामुळे बिघडली. तुला मी कॉलेजातून काढून टाकले आहे!'...

जणू काही घडलेच नाही अशा शांत वृत्तीने सुभाषबाबूंनी हुकुमाची चिठ्ठी खिशात घातली व ते बाहेर पडले. आपण केले ते योग्यच केले याची खात्री असल्याने जे घडले त्याचे परिणाम भोगण्यास ते तयार होते. अन्याय सहन करणे हे त्यांच्या स्वभावाला मानवण्यासारखे नव्हते. तत्त्वनिष्ठ माणसे तडजोड स्वीकारीत नाहीत. सुभाषबाबूंनी निश्चय केला—'काही झाले तरी पुन्हा प्रेसिडेन्सी कॉलेजचे तोंड पाहावयाचे नाही.'

पदवी परीक्षेचे वर्ष–शिक्षण पूर्ण होत आलेले; आणि ही आपत्ती ! सरस्वतीची उपासना निष्ठेने करणाऱ्या या हुशार विद्यार्थ्याने शिक्षण पुरे करण्याचा चंग बांधला. हरतऱ्हेचे प्रयत्न सुरू झाले. एका कॉलेजातून वेशिस्तीसाठी काढून टाकलेल्या विद्यार्थ्याला दुसऱ्या कॉलेजात प्रवेश मिळणार कसा? अशा प्रसंगी कलकत्ता विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु आशुतोष मुखर्जी यांनी मदत केली व आपले वजन खर्च करून स्कॉटिश चर्च महाविद्यालयात सुभाषबाबूंना प्रवेश मिळवून दिला. दुसऱ्याच वर्षी १९१९ साली वयाच्या एकविसाव्या वर्षी सुभाषबाबू तत्त्वज्ञान हा विषय घेऊन पदवी परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. जणू पहिला वर्ग त्यांच्यासाठी खास राखून ठेवलेला !

सुभाषबाबू कॉलेजमध्ये शिकत असताना ते व त्यांचे बंधू शरश्चंद्र एका आश्रमात जात. नवयुवकांसाठी मिर्झापूर रस्त्यावर डॉ. सुरेश यांनी हा आश्रम स्थापन केला होता. जन्मभर अविवाहित राहून देशाची सेवा करण्याची प्रतिज्ञा घेणाऱ्यांचा हा आश्रम होता. आपल्या रक्ताने प्रतिज्ञा लिहावयाची प्रथा होती. दोघाही बोस बंधूंनी रक्ताने सही करून प्रतिज्ञा केली.

'मी माझा देश स्वतंत्र करीन. त्यासाठी वाटेल तो त्याग करीन, कष्ट उपशीन–मागे हटणार नाही. विलासी चैनी जीवनाचा त्याग करीन.'

या प्रतिज्ञापूर्तीसाठी सुभाषबाबूंनी आपले सर्व जीवन समर्पण केले.

भारताबद्दल त्यांच्या भावना अत्यंत श्रद्धायुक्त प्रेममय असत. 'भारत-माता माझी, ही पुण्यभूमी माझी. परमेश्वराने ही पुण्यभूमी आपल्या अवतारांसाठी निवडली. सत्य धर्म यांची बीजे या भूमीत रुजली, वाढली.

पुढील सर्व आयुष्यात त्यांची हीच भावना दृढावत गेली.

सुभाषबाबू शिक्षण घेत असताना कलकत्त्यास पटकीची साथ सुरू झाली. लोक हैराण होऊन तडकाफडकी मृत्यूमुखी पडू लागले. औषध–पथ्यपाणी संभाळण्यास शहरातील डॉक्टर, वैद्य, हकीम अपुरे पडू लागले. त्याप्रसंगी सुभाषबाबूंनी एक विद्यार्थ्यांचे सेवा मंडळ बनविले. स्वयंसेवकांनी गोर-गरीब, अनाथ, रोगपीडित लोकांच्या वस्तीत घरोघरी जाऊन औषध आणून द्यायचे, साफसफाई करायची, गोड बोलून रोग्यांना धीर द्यायचा, शुश्रूषा करायची. मुलांच्या या सत्कृत्यांला सर्वांचा पाठिंबा हवा, पण एकदा घडले ते उलटेच.

गरीबांच्या वस्तीत-झोपडपट्टीत हैदरखाँ नावाचा एक गुंड होता. तो मवाल्यांचा प्रमुख होता. त्याला मुलांची ही कामे रुचली नाहीत. त्याने मुलांच्या या सेवा-शुश्रूषा कार्यात व्यत्यय आणला. त्यांची थट्टामस्करी केली. पण तरुणांनी तिकडे लक्ष न देता आपले काम बिनबोभाट चालू ठेवले.

योगायोग असा की हैदरखाँच्या घरातच हा पटकीचा आजार सुरू झाला. मुलांना तो फिरकू देत नसे. त्याच्या गुंडगिरीमुळे डॉक्टर वैद्य त्याच्या घरी फिरकत नसत. मुलांच्या लक्षात येताच ती हैदरखाँच्या घरात जाऊन कामे करू लागली. हैदरखाँ घरात येऊन पाहतो तो काय! ही मुले साफसफाई करण्यात गुंतलेली. एक औषध देतोय तर एक बाडबिस्तरा साफ करतोय. एक चूल पेटवून पाणी तापवतोय! हे दृश्य पाहून त्या गुंडाचे हृदय पालटले. तो धुसमुसून तोंड लपवून रडू लागला. सुभाषबाबूंजवळ येण्याचे त्याला धैर्य झाले नाही. सुभाष त्याचे जवळ जाऊन म्हणाले, 'भाई, घबराओ मत, रो मत'—तुमचे घर सर्व घाणीने भरले होते म्हणून रोग शिरला. आम्ही आता सर्व साफ केले आहे. औषध पथ्य पाणी दिले आहे—भाईजी एकमेकाने परस्परांच्या उपयोगी पडावे हे मनुष्याचे कर्तव्य नव्हे काय?

हैदरखाँने सुभाषचे पाय धरले आणि पश्चात्तापाने खजील होऊन तो रडत रडत म्हणाला—'नही नही, मेरा घर तो गंदा था ही। पर मेरा मन उससे भी ज्यादा गंधा था। आपकी सेवाने मेरी दोनो गंदगियोंको निकाल दिया है।'

बी. ए. ह्या पदवीपरीक्षेनंतर वडिलांची इच्छा मुलाने आय. सी. एस. परीक्षेसाठी विलायतेस जावे अशी होती. वास्तविकपणे सुभाषबाबूंचा मनोदय यापेक्षा वेगळा होता; पण काय करायचे ते पुढे पाहू, आता जायला मिळते आहे तर जावे असा विचार करून ते १९१९ साली विलायतेस गेले. १५ सप्टेंबर १९१९ रोजी ते बोटीने निघाले; बोट पोचण्यास उशीर झाला त्यामुळे आय. सी. एस्. परीक्षेसाठी प्रवेश मिळविण्याची मुदत टळून गेली होती. पण सुभाषबाबूंची हुशारी पाहून त्यांना टर्म भरण्याची परवानगी मिळाली. परीक्षा कठीण, नऊ विषय आणि परीक्षेस अवघे आठ महिने राहिलेले! पण सुभाषबाबू विलक्षण हुशार, तैलबुद्धीचे, त्यांची ग्रहणशक्ती मुळातच उत्तम. त्यांनी सर्व विषयांचा उत्तम अभ्यास करून परीक्षा दिली व सर्व विद्यार्थ्यांत चवथा क्रमांक

मिळविला. त्यावेळी त्यांचे वय अवघे बावीस होते. केंब्रिज विश्वविद्यालयाची बी. ए. ही पदवी परीक्षाही त्यांनी सन्मानाने उत्तीर्ण केली.

आय. सी. एस् परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्याला ताबडतोब नोकरीचा हुकूम मिळतो व नेमलेल्या अधिकाराच्या जागेवर हिंदुस्थानात हजर रहावे लागते. सुभाषबाबूंच्या पुढे आता प्रश्न उभा राहिला. परीक्षा पास झाल्यावर ब्रिटिश नोकरशाहीच्या सेवेत अधिकारी म्हणून सुभाषचंद्र येणार अशी सुखस्वप्ने बडील पहात होते तर इकडे सुभाषबाबू एका निराळ्याच विचारात गढून गेले होते. विलायतेस असताना त्यांचे विचारी जिज्ञासू मन समाजनिरीक्षण करीत होते. इंग्रज लोकांचे आचारविचार आणि व्यवहार, त्यांची काम करण्याची जिद्द, प्रामाणिकपणे व कुशलतेने काम करण्याची हातोटी ही सर्व त्यांनी पाहून ठेवली होती. त्यांनी स्वतःच यासंबंधी लिहून ठेवले आहे—

'विलायतेतील लोक स्वतः परिश्रम करणारे मेहनती आहेत. दुःख, निराशा आणि संकटे यांनी ते खचून जात नाहीत. 'जीवन दोन दिवसांचे' अशी वैकल्य-वैराग्य भावना त्यांची नाही.'

उत्कृष्ट यश मिळाले पण सुभाषबाबू या यशाने हुरळून तर गेले नाहीतच; ही आय. सी. एस. परीक्षा पास होणे म्हणजे कृतकृत्यता नव्हे की जीवनातील ध्येय गाठले असे नव्हे. नोकरशाहीच्या यंत्रणेतील चाकोरीचे निष्क्रीय जिणे त्यांना मान्य नव्हते. शिवाय ब्रिटिशांची तावेदारी, व सेवा त्यांची यंत्रणा राबवण्यासाठी, आपल्याच लोकाविरुद्ध. ही कल्पना त्यांना मानवण्यासारखी नव्हती. त्यांनी आपले बंधू शरश्चंद्र बोस यांना पत्र पाठवून कळविले.

'...'ब्रिटिशांच्या नोकरशाहीत एखाद्या बड्या अधिकाराची व पगाराची नोकरी मी पटकाबीन अशी जर तुमची समजूत असेल तर ती चुकीची आहे. ज्या सरकारने जालीयनवाला बागेतील क्रूर कत्तल घडवून आणली त्या सरकारचा नोकर होऊन मी माझ्या देशबांधवांचा शत्रू होऊ काय?' ... मला माझे जीवन देशसेवेत घालवायचे आहे. ध्येय गाठणाऱ्याने आपल्या कुटुंबाचा विचार करून चालत नाही.'

आपला भाऊ आय. सी. एस. परीक्षेत उत्तीर्ण झाला तरी सेवेत ऋजू होणार नाही. याची कुणकुण लागताच त्यांच्या बंधूंनी त्यांना इशारा दिला

होता, 'सुभाष, तुझ्या या कृतीने तू आपल्या वडिलांचा अंतकाळ जवळ ओढवतो आहेस याची जाणीव तुला आहे का?'

पण या सूचनेचा काही उपयोग झाला नाही. सुभाषबाबूंनी भारतमंत्र्याकडे राजीनामा सादर केला. भारतमंत्री मॉंटेग्यू राजीनामा पाहताच चकितच झाले. ते म्हणाले, 'मिस्टर बोस, तुम्ही वेडे तर नाही! तुम्ही आपला उदरनिर्वाह कसा करणार?'

सुभाषबाबूंनी उत्तर दिले, 'मी जे शिक्षण संपादन केले आहे त्यावर मी माझा उदरनिर्वाह सहज करू शकेन. ब्रिटिशांची नोकरी करून भारतमातेची सेवा प्रामाणिकपणे करता येणे मला शक्य नाही.' राजनिष्ठेची शपथ मी घेणार नाही.

काळ्या लोकांना अपमानाने वागवणाऱ्या ब्रिटिश लोकाबद्दल त्यांना चीड असे. त्वेषानं केव्हा केव्हा ते म्हणत, गोऱ्या लोकांनी माझी सेवा करताना किंवा बूट पुसताना मी पाहिलं म्हणजे मला अत्यानंद होतो.'

याचा परिणाम काय होणार हे सुभाषबाबूंना स्पष्ट दिसत होते. वडील बंधूंनी तर दहशत घातली होती. 'भारतात पाऊल टाकल्यावर तुला अटक होणार. वडील रागावणार, पैसे पाठवण्याचे बंद करणार. परत स्वदेशी यायलाही पैसे मिळणार नाहीत.'

सुभाषबाबूंनी आपल्या एका मित्राकडून पैसे उसने घेतले. राजीनामा सादर केला होताच. भारतात परत येऊन मायभूमीची सेवा करण्याचा निश्चय दृढावला होता. १६ जुलै १९२१ रोजी सुभाषबाबू भारतात परत येण्यास निघाले.

जवळ जवळ दोन वर्षे ते विलायतेस उच्च शिक्षणासाठी राहिले होते. विलायतेत शिक्षण घेत असताना ते विद्यार्थ्यांना अत्यंत प्रिय होते, नेते होते. गप्पाटप्पा बाष्कळ बडबड यात त्यांनी वेळ दवडला नाही. फावल्या वेळात ते ग्रंथ वाचनात दंग असत. आपले चारित्र्य निष्कलंक राहावे यासाठी ते अत्यंत दक्ष असत. आपली खोली, टेबल सर्व व्यवस्थित स्वच्छ ठेवत. त्यांच्या शेल्फवर पुस्तके नीट लावलेली असत. अव्यवस्थितपणा, आळस त्यांना खपत नसे. पोषाख स्वच्छ नीटनेटका टापटीपीचा असे. आपण आपल्या देशाचे

प्रतिनिधी आहोत. देशाचे नाव, कीर्ती याला बाध येईल असे कोणतेही कृत्य आपल्या हातून घडता कामा नये असे ते कटाक्षाने सांगत व म्हणत 'India too, like England expects every man to do his duty.' स्त्रियांचा सहवास कटाक्षाने टाळीत असत. ते म्हणत, 'हा सहवास म्हणजे विस्तवाशी खेळ. जीवघेणा! कोणत्याही स्त्रीशी त्यांनी सलगी केली नाही. त्याला अपवाद फक्त एका महिलेचा मिसेस धर्मवीर. पण या बाई तर त्यांना वंद्य आदरणीय भगिनीप्रमाणे, मातेप्रमाणे वाटत.....मदिराक्षीप्रमाणे ते मदिरेलाही स्पर्श करीत नसत!

मातृभूमीसाठी

मानाच्या कीर्तीच्या आणि सत्तेच्या सुवर्ण शृंखला तोडून टाकून सुभाषबाबू आय्. सी. एस्. सारख्या नोकरीवर लाथ मारून भारतात परत आले, आणि मातृभूमीच्या सेवेस सादर झाले. कलेक्टर, कमिशनर होण्यासाठी त्यांचा जन्म नव्हता.

भारतात पदार्पण केल्यावर लवकरच सुभाषबाबूंनी म. गांधीजींची साबरमती आश्रमात जाऊन भेट घेतली. विचारविनिमय केला आणि ते कलकत्त्यास आले. महात्मा गांधीजींच्या प्रथम भेटीने आपल्या मनावर फारसा परिणाम झाला नाही असे ते म्हणाले. यावरून सुभाषबाबूंची मनोवृत्ती चढाऊ राजकारणाची होती हे दिसून येते. त्यांच्या महत्त्वाकांक्षेला चेतविणारा, त्यांच्या चित्तवृत्ती उल्हसित करून प्रेरणा देणारा एक महान पुरुष त्यांना भेटला. तो म्हणजे देशबंधू चित्तरंजन दास. बंगालचे ते अनभिषिक्त सम्राट. १९१७ सालापासून चित्तरंजन दास राजकारणात शिरले आणि आपल्या सेवेने त्यागाने लोकप्रिय झालेले.

सुभाषचंद्रांनी दासबाबूंची भेट घेतली व देशसेवेसाठी जीवन समर्पण करण्याचा आपला मनोदय व्यक्त केला. चित्तरंजनदासांना एक रत्नच गवसले! उसळत्या रक्ताचा, तडफदार, हुशार, कर्तृत्ववान तरुण मिळाल्यावर त्या देशभक्ताचे हृदय आनंदाने नाचू लागले. १९२१ चे हे वर्ष! असहकारितेच्या चळवळींनी व्यापलेले. जनतेचा ब्रिटिश सरकारवरील विश्वास पूर्ण उडाला होता. राष्ट्रीय सभेच्याद्वारे सरकारकडे अर्ज विनंत्या करून, भीक मागून स्वराज्य मिळणे शक्य नव्हते. स्वतःच्या हिमतीवर, शक्तीवर, बुद्धीवर जनतेने ते स्वार्थत्यागाने, आत्मक्लेशाने, जिद्दीने मिळवायचे असते. 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले? – कोणालाही नाही!' इतिहासाची पाने याची साक्ष देतील.

म. गांधीजींनी असहकारितेची चळवळ देशाच्या कानाकोपऱ्यात पोचवली. जनतेत विलक्षण जागृती झाली. जनतेने पाठिंबा दिला. विद्यार्थ्यांनी अभ्यास थांबविला. सरकारी शाळा-कॉलेजवर बहिष्कार पुकारला. मानाची पदवी मिळालेल्या पदवीधरांनी पदव्यांचा त्याग केला. वकिलांनी वकिली सोडली. डॉ. रवींद्रनाथ टागोरांनी आपली 'सर' ही पदवी सोडली व सरकारचा निषेध केला. ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकला. परदेशी कापडांच्या होळ्या पेटल्या. देशातील वातावरण सर्वत्र पेटून ज्वलंत झाले स्फोटक झाले.

देशबंधू चित्तरंजन दासांनी बंगालमध्ये चळवळी सुरू केल्या. सुभाषबाबूंसारखा तडफदार मोहरा मिळाल्यावर चित्तरंजन दासांना अपार अभिमान आनंद वाटला. सुभाषबाबूंबद्दल वात्सल्य उत्पन्न झाले. या तरुणाची योजना तशाच एखाद्या महत्वाच्या जागी करणे योग्य वाटले. तशी संधीही लाभली.

दासबाबूंनी १९२१ साली मे मध्ये राष्ट्रीय कॉलेज स्थापन केले होते. त्या कॉलेजच्या प्रमुख प्राध्यापकाचे जागी सुभाषबाबूंची नेमणूक करण्यात आली. अध्यापन सुरू झाले. अध्यापनाबरोबर एक स्वयंसेवक दल तयार करावे, तरुण वर्ग राष्ट्रसेवेसाठी तयार व्हावा अशी सुभाषबाबूंची तळमळ होती. राष्ट्रकार्यासाठी तळहातावर शीर घेऊन सर्वस्व समर्पण करण्यास सिद्ध असलेल्या तरुणांची राष्ट्राला गरज होती. प्राध्यापकाचे क्षेत्र अपुरे वाटू लागले. सुभाषबाबूनी कॉलेजच्या प्रिन्सिपाल पदाचा राजीनामा दिला. राष्ट्रीय स्वयंसेवक दलाची स्थापना केली. संघटना करून ते स्वयंसेवक दलाचे प्रमुख झाले. राष्ट्रा-

साठी लढाऊ वृत्तीचे सैनिक तयार करण्यासाठी सुभाषबाबूंनी अविश्रांत श्रम घेतले. अन्यायाला वाचा फोडली.. वेठबिगारी बंद केली. व्याजाचा दर ठरविला, विहीरी, तलाव खोदले – लोकोपयोगी कामे हाती घेतली.

सुभाषबाबूंची कीर्ती वाढू लागली. ते लोकप्रिय नेते होते. विद्यार्थ्यांना प्राणप्रिय वाटत. सरकारला सुभाषबाबूंची ही लोकप्रियता व स्वयंसेवक दलाचे कार्य खटकू लागले, सरकार प्रक्षुब्ध झाले. बंगालचे अनभिषिक्त राजे चित्तरंजन दास यांचे कार्य सलत होतेच, त्यातच सुभाषबाबूंच्या कार्याची व लोकप्रियतेची भर पडली ! सरकारचे धावे दणाणले. जिकडे तिकडे धरपकड सुरू झाली. चित्तरंजन दास यांना गिरफदार करण्यात आले तसेच सुभाषबाबूनाही पकडले व त्यांना सहा महिन्याची शिक्षा ठोठावली. त्यांनी स्थापना केलेल्या स्वयंसेवक दलावर बंदी घातली. ही शिक्षा सूडबुद्धीने करण्यात आली होती. एवढीच शिक्षा मिळाली याचा उपहास करून सुभाषबाबू हसून म्हणाले, 'काय एवढीच शिक्षा ?' मी कोणाची कोंबडी चोरली म्हणून मला एवढी थोडी शिक्षा !'

ब्रिटिशांच्या पाशवी सत्तेला दैव लीलेने दिलेले हे आव्हान होते. दडपशाहीने, तुरुंगवासाने ही चळवळ आता थांबणारी नव्हती.

महात्मा गांधीजींनी सत्य, अहिंसा, असहकार या चळवळींच्या अवताराने राष्ट्राला नवचैतन्य दिले. नवा मार्ग उपलब्ध करून दिला. देशाच्या सर्व थरांत आणि कोनाकोपऱ्यात स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षणाचे लोण पोचविले. जनतेत विलक्षण जागृती निर्माण झाली. बलदंड पाशवी शक्तीला हादरे बसू लागले. ब्रिटिश साम्राज्यशाही डळमळू लागली. सिंहासन डळमळू लागले.

ब्रिटिशांच्या साम्राज्यावर आता घणावर घण बसू लागले. निःशस्त्र जनता आपल्या मनोबलावर जिद्दीने त्यागाने आत्मक्लेशाने सामना देण्यास सिद्ध झाली सुभाषबाबू हे सशस्त्र उत्थानाचे जनक झाले आणि पुढे 'नेताजी' या पदावर आरूढ होऊन शेवटचे घाव वर्मी घालण्यासाठी कसे सिद्ध झाले, त्याचा रोमहर्षक इतिहास पुढे पाहू.

हृदयात देशप्रेम उचंबळत असलेल्या कोणत्याही माणसाला सेवेची अनंत क्षेत्रे उपलब्ध असतात. पारतंत्र्याचे जू मानेकर असताना परकीय शत्रूकडून

स्वातंत्र्य मिळविण्याची जिद्द बाळगणाऱ्या त्या काळच्या तरुण पिढीला ही जुलमी सत्ता झुगारुन देण्यासाठी काय करू काय नको असे वाटे. सुभाषबाबू हे त्यांतले एक अग्रगण्य ज्वलंत तरुण !

१९२१ साली पहिल्याच वेळी झालेल्या कारावासात सुभाषबाबू आणि त्यांचे राजकीय गुरू, प्रिय पुढारी चित्तरंजनदास एकत्र आले. सुभाषबाबूंनी चित्तरंजन दासांची सेवा करावी, स्वयंपाक करावा त्यांच्या वैयक्तिक आवडी निवडींकडे लक्ष पुरवावे. आपल्या प्राणप्रिय नेत्याची सेवा करताना त्यांचे हृदय प्रेमाने भरून येई. सहा महिन्यांची ही शिक्षा अशी कारणी लागली. त्यांना राजकीय क्षेत्रात सर्वोत्तम गुरू योग्य वेळी लाभले होते.

१९२१ सालच्या अखेरीस प्रिन्स ऑफ वेल्स हे हिंदुस्थानात येणार म्हणून सर्वत्र स्वागताची तयारी चालू होती. त्यांच्या आगमन प्रसंगी त्यांच्या सर्व कार्यक्रमावर बहिष्कार पुकारण्याचे काँग्रेसने ठरविले.

१९२२ साली गयेला काँग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात सुभाषबाबूंनी स्वयंसेवक म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली.

काँग्रेस अधिवेशनानंतर दासबाबूंनी स्वराज्य पक्षाचे मुखपत्र म्हणून 'फॉरवर्ड' नावाचे वृत्तपत्र काढले. त्याचे संपादन सुभाषबाबूंनी काही दिवस केले. स्वराज्य पक्षाचे सामर्थ्य वाढविण्यास मदत केली.

गया काँग्रेसनंतर उत्तर बंगालमध्ये महापुराची आपत्ती ओढवली. पूरग्रस्तांना सर्वतोपरी साहाय्य देण्यासाठी कलकत्त्यास एक साहाय्यक मंडळ स्थापन करण्यात आले. सुभाषबाबूंनी या मंडळाचे चिटणीस म्हणून काम केले. आपद्ग्रस्तांचे क्लेश निवारण करण्यासाठी हर प्रयत्न केले. अन्न, वस्त्र निवारा, ज्या ज्या मार्गांनी मदत करता येणे शक्य होते ती केली. चिटणीस म्हणून कुशल संघटनेचे कार्य करून मदतसंस्था आदर्श कशी असावी याचा धडाच घालून दिला. निरलस कार्यकर्ता म्हणून सुभाषबाबूंचे नाव सर्वतोमुखी झाले. चित्तरंजनदास या तरुण कार्यकर्त्यांवर अत्यंत खूष असत. सुभाषबाबूंनी त्यांचा पूर्ण विश्वास संपादन केला होता एवढेच नव्हे तर त्यांचे ते उजवे हात झाले होते.

१९२४ साली स्वराज्य पक्षाने कलकत्ता कॉर्पोरेशनची निवडणूक लढवून आपले बहुमत स्थापन केले. मेयरच्या मानाची जागा चित्तरंजन दास यांना

निवडणुकीत बहुमताने मिळाली. ही जागा स्वीकारल्यावर सुभाषबाबूंना कॉर्पोरेशनच्या चीफ एक्झीक्युटिव्ह ऑफिसरच्या जागेवर नेमण्यात आले. या जागेवर ते थोडे दिवस होते पण त्या अल्पकाळातही त्यांनी आपले व्यक्तिमत्व प्रस्थापित केले व एक आदर्श निर्माण केला. या जागेचा पगार दरमहा तीन हजार रुपये होता पण तो कमी करून फक्त पंधराशे रुपये त्यांनी स्वीकारले. कॉर्पोरेशनचा कारभार त्या काळी सर्व इंग्रज धार्जिणा होता. सुभाषबाबूंनी हा कारभार बदलला. देशभक्तांना मानपत्रे देण्याची प्रथा सुरू केली. प्राथमिक शिक्षण मोफत केले. समाजोपयोगी पुष्कळच कामे करून वाहवा मिळविली.

कॉर्पोरेशनमध्ये जे. आर. कोट्स नावाचे एक प्रमुख इंजिनिअर होते. हे इंग्रज गृहस्थ नगरपालिकेतील हिंदू लोकांना अगदी तुच्छ लेखीत. सुभाषबाबूंनी अधिकाराची जागा स्वीकारल्यावर त्यांना त्यांचे हाताखाली काम करणे भाग पडले. एकदा सिगारेट ओढीत ओढीत सुभाषबाबूंना भेटायला ते गेले. वरिष्ठ अधिकाऱ्याला सामोरे जाताना कोणता शिष्टाचार पाळावा याचे त्यांना भान राहिले नाही. हाडीमासी अहंमन्यतेची मग्रूरी खिळली होती. सुभाषबाबू शांतपणे बसले होते. या इंजिनियरसाहेबास पहाताच त्यांनी सुनावले, 'मिस्टर कोट्स, आपल्या अधिकाऱ्याशी बोलताना सिगारेट तोंडात धरून बोलणे हे शिष्टाचारास धरून आहे असे आपणास वाटते काय? तुमच्या हाताखालच्या एखाद्या अधिकाऱ्याने असे वर्तन केले तर ते तुम्ही सहन कराल काय?....' चपराक बसल्याप्रमाणे कोट्स यांची सिगारेट तोंडातून आपोआप गळून पडली. ते वचकले, झालेल्या प्रकाराबद्दल त्यांनी दिलगिरी प्रदर्शित केली. बाकीचे सर्वच इंग्रज अधिकारी सुभाषबाबूंना वचकून राहू लागले.

आपल्या अवघ्या सहा महिन्यांच्या कारकीर्दीत सुभाषबाबूंनी कॉर्पोरेशनच्या कारभाराला शिस्त लावली व सुरळीतपणा आणून दिला.

१९२४ साली बंगालमध्ये क्रांतिकारकांचेही कार्य सुरू होते. गोपीनाथ सहाय या क्रांतिवीराने मिस्टर डे नावाच्या युरोपियन गृहस्थावर गोळी झाडली. डे मृत्यूमुखी पडले; तात्काळ गतप्राण झाले.

या खुनी कृत्याने बंगालचे सरकार खवळले. बंगालचे त्या काळचे गव्हर्नर लॉर्ड लिटन् यांनी दहशत बसविण्यासाठी बंगाल ऑर्डिनन्स हा वटहुकूम

काढला. कार्यकर्त्यांना पकडून तुरुंगात टाकण्यात आले. स्वराज्य पक्षाचे कार्य चित्तरंजनदास व त्यांचे सहकारी सुभाषचंद्र चालवीत असत. दासबाबूंनी या वटहुकुमाचा कडाडून निषेध केला. अत्याचारातून अत्याचार निर्माण होतो; क्रांतिकारकांपेक्षा सरकारच अधिक अत्याचारी आहे हे ठणकावून सांगितले. या निषेधाचा काय परिणाम होणार हे उघड होते. २२ आक्टोबर १९२४ रोजी सुभाषबाबूंना सरकारने बंगाल ऑर्डिनन्सखाली अटक करून अलिपूरच्या तुरुंगात डांबून ठेवले. त्यांच्यावर रीतसर आरोप नाही, खटला नाही की अटकेची मुदत नाही. अलिपूरच्या तुरुंगातून मुर्शिदाबादच्या तुरुंगात पाठविण्यात आले. याचे मुख्य कारण म्हणजे अलिपूरच्या तुरुंगात असताना सुभाषबाबू कलकत्ता कॉर्पोरेशनचे काम पाहात असत ते सरकारला सहन झाले नाही. पुढे मुर्शिदाबाद जेलमधून त्यांना मंडालेच्या तुरुंगात डांबण्यात आले.

प्रतिकूल, उष्ण व कडक हवेसाठी मंडालेचा तुरुंग कुप्रसिद्ध होता. मंडाले येथील उष्ण हवा सुभाषबाबूंना सोसली नाही. एकान्तवासाचे एवढ्या दूरचे जिणे त्यांना असह्य झाले. चित्तवृत्ती प्रक्षुब्ध झाल्या. पण संयमाने सुभाषबाबूंनी त्यावर आवर घातला. ते विचार करू लागले. याच तुरुंगात १९०८ साली लो. टिळक राहात नव्हते काय? याच प्रतिकूल वातावरणात एकान्तवासात असताना त्या धीरगंभीर नरपुरुषाने गीतारहस्य हा महान ग्रंथ लिहून काढला ना? त्यांनी तेथे ६ वर्षे कशी काढली असतील? या विचाराने त्यांचे अंतःकरण भरून आले. लोकमान्य ज्या खोल्यांत राहात त्या खोल्यांकडे त्यांचे वारंवार लक्ष जाई. कर जुळत. मस्तक नम्र होई. मग ते चिंतनशील होत. त्यांच्या चित्तवृत्ती हळू हळू उल्हसित होत. बंगालची सुजलां सुफलां पवित्र भूमी, बंगालचे कवी, चित्रकार, देशभक्त यांचे स्मरण होई. तुरुंगात त्यांनी इतिहास, वाङ्मय, धर्मशास्त्र, मानसशास्त्र यांचे शेकडो ग्रंथ अभ्यासिले. त्यांना शांती लाभली. बौद्धिक उंचीही वाढली.

मंडाले जेलमध्ये असताना दुर्गापूजेच्या उत्सवाचे दिवस आले. सुभाषबाबूंनी हा उत्सव तुरुंगात साजरा करण्याचे ठरविले. सरकारने प्रतिबंध केला. तुरुंगाच्या शिस्तीस हे धरून नव्हते. सुभाषबाबूंनी तात्काळ अन्नसत्याग्रह

सुरू केला. सरकारला नमते घ्यावे लागले. आणि मग मोठ्या धामधुमीने तुरुंगाच्या आवारात हा दुर्गापूजेचा उत्सव अत्यंत थाटाने साजरा झाला.

मंडाले येथे तुरुंगात असताना १६ जून १९२५ रोजी देशबंधू चित्तरंजन दास यांचा मृत्यू ओढवला. बंगाल पोरका झाला. दानशूर परोपकारी देशभक्ताचा अंत झाला. ते उत्कृष्ट वकील आणि राजकारणधुरंधर मुत्सद्दी होते. क्रांतिकाराचे खटले त्यांनी विनामूल्य चालविले आणि कित्येकांची सुटका केली. बाबू अरविंद घोष यांचेवर चाललेला खटला व त्यातून त्यांची झालेली सुटका ही केवळ चित्तरंजनदासांच्या वकिली कौशल्याने झाली. त्यांच्या मृत्यूची वार्ता तुरुंगातच पिचत पडलेल्या सुभाषबाबूंचे कानी जाताच ते हळहळले...'माझा आधार तुटला! शेवटच्या क्षणी मी त्यांच्या अंत्यदर्शनास मुकलो!! मी त्यांना राजकीय गुरू मानले पण खाजगी जीवनातही ते मला आदर्श वाटत. बारीकसारीक गोष्टीतूनही त्यांचे उदार, विशाल अंतःकरण मला समजून येई. मी त्यांच्याकडे आकर्षिला गेलो तो त्यांच्या त्या सात्विक गुणाने-माझ्या शोकास -वियोगास पारावार नाही...!'

मंडालेच्या तुरुंगात असताना असे प्रसंग घडले-अशा वार्ता समजल्या तरी त्यांनी आपले मन प्रक्षुब्ध होऊ दिले नाही. तुरुंगवासात असताना त्यांचे वाचन-चिंतन चालू होते. एखाद्या ध्यानमग्न योग्याप्रमाणे त्यांचे जीवन चालू होते. त्यांनी ब्रह्मी भाषा शिकून घेतली. त्यांच्या दृष्टीने मंडाले हा तुरुंग नसून लो. टिळकांच्या संपर्काने एक आश्रम बनला होता. त्यांचे मन कणखर बनले होते. वाटेल त्या प्रसंगास, वाटेल त्या यातना सहन करण्यास ते तयार झाले होते...पण शरीर साथ देईना. क्षयरोगाने त्यांना ग्रासले. त्यांचे शरीर क्षीण होऊ लागले. याच मनःस्थितीतही ते आपले बंधू शरश्चंद्र यांना लिहितात—'...माझी मनस्थिती अत्यंत शांत आहे, वाटेल त्या परिस्थितीस तोंड देण्याचे सामर्थ्य माझे अंगी आहे ही परमेश्वराची कृपाच होय. आपले विचारसामर्थ्य कधीही नष्ट होणार नाही. या नाही तर पुढच्या पिढीस त्याचा उपयोग झाल्याशिवाय राहणार नाही...हिंदी राष्ट्राने आजवर केलेल्या चुकांचे प्रायश्चित्त म्हणून माझी तपश्चर्या चालू आहे असे मला वाटते. ह्या प्रायश्चिताने माझी अंतःशुद्धी होऊन मनःशांती लाभेल असा मला भरवसा वाटतो.'

सुभाषबाबूंची शरीरप्रकृती दिवसेंदिवस बिघडत चालली. शारीरिक हालचाल करण्याचे सामर्थ्यही अंगी उरले नाही. त्यांचे बंधू डॉ. सुनीलचंद्र बोस यांनी त्यांची प्रकृती तपासली. प्रकृतीची अवस्था फार गंभीर झाली आहे असा सर्वांनी अभिप्राय दिला...त्यांची मुक्तता करणे सरकारला भाग पडले. सुभाषबाबूंनी मुक्तता झाल्यावर प्रकृती सुधारण्यासाठी स्वित्सर्लंडला जावे पण कलकत्त्यास उतरू नये. थेट मार्गस्थ व्हावे अशी त्यांच्यावर अट लादण्यात आली. ही अट सुभाषबाबूंना मान्य होणे शक्य नव्हते. या प्रसंगी त्यांनी आपले बंधू बॅ. शरश्चंद्र बोस यांना पत्राने कळविले—

'—बंगाल सरकार काही अटीवर मला सोडण्यास तयार आहे पण त्या अटी स्वीकारण्यापेक्षा मी कैदेतच राहणे बरे असे मला वाटते...मला स्वित्सर्लंडला जायला मिळाले तरी माझ्या मागे गुप्त पोलीसांचा ससेमिरा लागणारच...अशा स्थितीत युरोपात जाणे म्हणजे मायभूमीस कायमचे पारखे होणे!'

'अडीच वर्षे झाली मला तुरुंगातच डांबून टाकले आहे. माझ्या मातापित्यांची भेट नाही. या वियोगाची कल्पना सरकारला कशी येणार?—शिवाय परदेशातही माझा खर्च मीच करायचा!...' 'दी पाथ ऑफ् ग्लोरी लीडस् बट् टू दी ग्रेव्ह' या उक्तीवर माझा विश्वास आहे...मला माझ्या देहाची क्षिती मुळीच वाटत नाही. माझ्या देहाच्या रक्षणार्थ मी तत्त्वावर पाणी सोडण्यास तयार नाही. आमचा झगडा तत्त्वाशी आहे, सत्तेशी आहे, सैतानाशी आहे! आमचा पंथ सत्याचा. स्वातंत्र्याचा आहे. मग देह जावो अथवा राहो! आमची निष्ठा अढळ असेल तर विजय आम्हांला मिळणारच. मात्र तो विजय पाहण्यास आमच्यापैकी कोण जगणार हे एक ईश्वरच ठरविणार—'

परमेश्वरी योगायोग असा की अपूर्व त्याग करून विजय प्राप्त होण्याची संधी दृष्टीपथात येताच या नेत्याला काळाने ओढून नेले!

सुभाषबाबूंची प्रकृती अत्यंत क्षीण, गंभीर होऊ लागताच सरकारने अगदी नाईलाज झाला तेव्हा १५ मे १९२७ रोजी त्यांची सुटका केली.

२२ आक्टोबर १९२४ ते १५ मे १९२७ एवढा प्रदीर्घ काळ तुरुंगवासात गेला.

सुभाषबाबूंची सुटका होऊन ते कलकत्त्यास येणार असे समजताच त्यांच्या दर्शनार्थ औट्राम घाटावर प्रचंड गर्दी लोटली. त्यांची वाढती लोकप्रियता सहन न होऊन सुभाषबाबूंना सरकारने दुसरीकडेच गुपचूप उतरवून घेऊन नंतर त्यांच्या बंधूच्या स्वाधीन केले. सुभाषबाबूंची प्रकृती सुधारावी म्हणून सर्वत्र प्रार्थना सुरू झाल्या. अभिनंदनाच्या तारा पत्रे यांचा वर्षाव होत होता.

अशाही स्थितीत सुभाषबाबूंनी पत्रक काढून आपला मनोदय व्यक्त केला.

'शक्य तितक्या लवकर प्रकृती सुधारून कामाला लागावे एवढीच माझी इच्छा आहे... मला आजारी पडून राहायला सवड नाही.'

सुभाषबाबूंचे वजन चाळीस पौंडांनी घटले. त्यांना रात्र न् रात्र झोप येत नसे. सर नीलरत्न सरकार, डॉ. बी. सी. रॉय या तज्ज्ञ डॉक्टरांनी त्यांची प्रकृती तपासून पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला.

सुभाषबाबूंनी थोडे दिवस विश्रांती घेतली व पुन्हा ते काम करू लागले.

१९२८ सालच्या मे महिन्यात सुभाषबाबू महात्मा गांधीजींना साबरमती आश्रमात भेटायला गेले. चर्चा झाली. आपले स्पष्ट मत मांडताना ते गांधीजींना म्हणाले, 'महात्माजी! हीच वेळ सत्याग्रह करून स्वातंत्र्याचा लढा देण्याची आहे, आपण यापुढे क्षणाचाही विलंब लावता कामा नये.

गांधीजीनी उत्तर दिले – 'मला अजून प्रकाश मिळाला नाही!' या गूढ वचनावर सुभाषबाबू काय उत्तर देणार!...सुभाषबाबू निराश होऊन तिथून परतले.

सुभाषबाबू बंगाल प्रांताचे आवडते नेते झाले होते. सुभाषबाबू प्रत्येक सामाजिक राजकीय लोकसेवेच्या कार्यात पुढाकार घेऊन भाग घेत. बंगाल प्रांतिक काँग्रेस कमिटीने त्यांना अध्यक्ष म्हणून निवडले.

१९२८ साली मे महिन्यात पुणे येथे महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस परिषदेचे सहावे अधिवेशन भरविण्यात आले. त्याचे अध्यक्षपदी सुभाषबाबूंची नियुक्ती करण्यात आली. हे अधिवेशन तरुण पुढारी म्हणून लोकप्रिय झालेले, नुकतेच तुरुंगातून सुटून आलेले सुभाषबाबू यांच्या अध्यक्षतेखाली फार उत्साहाने पार पडले. बंगाल व महाराष्ट्र पुन्हा एक होत होते. शिवरामपंत परांजपे हे स्वागताध्यक्ष होते. त्यांनी आपल्या ओजस्वी चैतन्यमय वाणीने महाराष्ट्र

आणि बंगाल यांचे अतूट नाते किती हृद्य व भावपूर्ण आहे हे पटविले. सुभाषबाबूंचे अध्यक्षीय भाषण अत्यंत स्फूर्तिदायक व ओजस्वी झाले. परिषद आटोपल्यावर त्यांनी सर्व महाराष्ट्रभर दौरा काढून चैतन्याची स्फूर्तीची लाट पसरविली. धीरोदात्त गंभीर अन् तेजस्वी सुभाषबाबू महाराष्ट्राला प्रिय झाले. महाराष्ट्रीय जनतेत त्यांच्याबद्दलचा आदर शतपटीने वाढला. बंगाल महाराष्ट्राचे संबंध पुन्हा जुळले, दृढावले. या अधिवेशनात आपले ध्येय संपूर्ण स्वातंत्र्याचे आहे हे सुभाषबाबूंनी स्पष्टपणे जाहीर केले. महाराष्ट्रीय जनतेने त्यांचे स्वागत केले!

१९२८ साली कलकत्ता येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले. त्या सालचे काँग्रेसचे अधिवेशन गाजले. पं. मोतीलाल नेहरू अध्यक्ष होते. हावरा स्टेशनपासून त्यांची मोठ्या थाटाने मिरवणूक काढण्यात आली. सुभाषबाबू स्वयंसेवक दलाचे प्रमुख या नात्याने घोड्यावर स्वार होऊन लष्करी पोषाख चढवून मानवंदना देण्यास सामोरे आले त्यावेळचे दृश्य अत्यंत विलोभनीय होते. सरसेनापती शोभावेत असे रुबाबदार शूर वीर वृत्तीचे सुभाषबाबू विलक्षण तेजस्वी दिसत होते. त्यांच्याकडे पाहताच प्रत्येकजण श्रद्धेने मान तुकवी. जणू तळपती विद्युल्लताच! या अधिवेशनात पं. जवाहरलाल नेहरू व सुभाषबाबू एकत्र आले. त्यांचे संबंध दृढावले. नेहरू रिपोर्ट तयार झाला. सुभाषबाबूंनी त्याला मान्यता दिली.

१९२९ साली लाहोर येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात सुभाषबाबूंनी आपला संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडला व तो बहुमताने संमत झाला. हिंदुस्थानात प्रतिसरकार नेमावे ही ठरावाला जोडलेली उपसूचना नामंजूर झाली, पण संपूर्ण स्वातंत्र्याच्या चळवळीची पूर्वतयारी या अधिवेशनात झाली हे यश काही थोडे नव्हते.

लाहोर काँग्रेसनंतर सुभाषबाबूंनी श्रीनिवास अय्यंगार यांच्या सहकार्याने 'काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी' स्थापन केली. संपूर्ण स्वातंत्र्य हे या पक्षाचे ध्येय असून त्यासाठी देशातील इतर पक्षांशीही सहकार्य करण्यात येईल असे जाहीर केले.

२६ जानेवारी १९३० रोजी सुभाषबाबूंनी कलकत्त्यास मोठ्या धामधुमीने संपूर्ण स्वातंत्र्यदिन साजरा केला. पण त्यामुळे सरकारच्या रोषास बळी पडून त्यांना अटक करण्यात आली. एक वर्षाची सजा होऊन त्यांची तुरुंगात रवानगी झाली.

एक वर्षाचा कारावास संपवून सुभाषबाबू परत येतात तोच संपूर्ण स्वातंत्र्याचा स्मृतिदिन साजरा करण्यासाठी सुभाषबाबूंच्या नेतृत्त्वाखाली लाहोर येथे ३१ डिसेंबर १९३१ रोजी एक भव्य मिरवणूक काढण्यात आली. पोलीसांनी या मिरवणुकीवर अमानुष लाठीमार केला. त्या लाठी हल्ल्यात सुभाषबाबूही जखमी झाले.

२६ जानेवारी १९३० रोजी सुभाषबाबूंची नियुक्ती कलकत्त्याचे महापौर म्हणून झाली होती व त्या अधिकारावर असतानाच स्वातंत्र्यदिनाची मिरवणूक काढण्यात आली. त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली व ते पुन्हा तुरुंगात डांबले गेले. डिसेंबर १९३० ला त्यांची सुटका झाली. २६ जाने. १९३१ ला सुभाषबाबूंनी पुन्हा मिरवणूक काढली. त्यांना पुन्हा अटक झाली. ४ एप्रिल १९३१ रोजी गांधी आयर्विन कराराप्रमाणे त्यांची सुटका झाली. १९३१ साली गोलमेज परिषदेहून महात्मा गांधीजी परत आले. ही परिषद अयशस्वी झाली. काही घडले नाही. त्या संबंधी विचार विनिमय करण्यासाठी मुंबई येथे काँग्रेस वर्किंग कमिटीचे एक खास अधिवेशन भरले. बंगाल प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष या नात्याने सुभाषबाबू उपस्थित होते. कलकत्ता कार्पोरेशनच्या मेयरपदाचा राजीनामा त्यांनी सादर केला होता.

१९३१ च्या डिसेंबर महिन्यात सुभाषबाबूंच्या अध्यक्षतेखाली पुण्यास एक महाराष्ट्र युवक परिषद भरली. श्री. काकासाहेब गाडगीळ हे स्वागताध्यक्ष होते. या परिषदेने महाराष्ट्रीय तरुणांत एक नवे चैतन्य उत्पन्न झाले. सुभाषबाबू हे तरुणांचे आवडते नेते होते. महाराष्ट्राबद्दल त्यांना विशेष अभिमान वाटे. परिषदेत सुभाषबाबूंचे उत्कृष्ट भाषण झाले. परिषदेनंतर सुभाषबाबूंनी महाराष्ट्रात दौरा काढला. ते सातारा, सोलापूर, सिंहगड या भागात हिंडले. या दौऱ्यासंबंधी ते म्हणाले, 'महाराष्ट्रातील हा दौरा फार उत्साहजनक स्फूर्तिदायक वाटला. विशेषतः सह्याद्रीच्या गिरीगव्हरांतून, दऱ्याखोऱ्यांचे

निसर्गरमणीय सौंदर्य दृष्टीस पडले. सिंहगडची सफर अविस्मरणीय ठरली. महाराष्ट्रातील प्रवास हा स्फूर्तीचा झरा आहे. महाराष्ट्रात प्रवास करताना गत इतिहास आठवू लागतो. माझे सर्वत्र चांगले स्वागत झाले. त्यात आदर आणि जिव्हाळा आढळला. आणखी काही दिवस या दौऱ्यात मिळाले असते तर विशेष आनंद वाटला असता. मला सर्वत्र उत्साह दिसतो. अशाच मनः प्रवृत्तीची आवश्यकता आहे.'

मुंबईस वर्किंग कमिटीच्या आधिवेशनाच्या समाप्तीनंतर कलकत्त्यास परत जाताना २ जानेवारी १९३२ रोजी कल्पना नसताना सुभाषबाबूंना कल्याण स्टेशनवर अटक करण्यात आली. या वेळी कायदा हुडकून काढला तो १८१८ च्या रेग्युलेशनचा! वॉरंट नव्हते, कोठे नेणार याची कल्पना नव्हती. नागपूरहून गाडी निघाल्यावर सोंदिया येथे त्यांना गाडीतून उतरवून घेण्यात आले व त्यांची रवानगी शिवणीच्या तुरुंगात करण्यात आली. या तुरुंगातील अवस्था अतिशय हलाखीची होती. सुभाषबाबूंना येथे पोटदुखीचा विकार जडला. सरकारने त्याची रवानगी जबलपूर तुरुंगात केली. पण प्रकृती सुधारण्याचे चिन्ह दिसेना म्हणून त्यांना मद्रासच्या तुरुंगात हलविण्यात आले.

त्यांच्या अटकेचे पडसाद बंगाल कौन्सिलमध्ये उमटले. २५-१-३२ रोजी शामाप्रसाद मुकर्जी यांनी केवळ माणुसकी, भूतदया यासाठी तरी सतत आजारी असलेल्या सुभाषबाबूंना तुरुंगातून मुक्त करावे म्हणून ठराव केला. या ठरावाला हिंदु व मुसलमान सर्व सभासदांनी एकमताने पाठिंबा दिला. तथापी सरकारने त्याची दाद घेतली नाही.

तुरुंगवासात असताना सुभाषबाबूंचे पहिले दुखणे उलटले. त्यांना क्षयाची भावना झाली. भवाली सॅनिटोरियममध्ये त्यांना औषधोपचार करण्यात आले. पण काही सुधारणा झाली नाही. १९२१ सालापासून सतत दहा बारा वर्षे सुभाषबाबूंचे राजकीय कार्य नित्य चालू होते. राजकारणात भाग घ्यावा, काँग्रेसच्या आधिवेशनात सहभागी व्हावे, स्वयंसेवक दले स्थापावी, पूरग्रस्तांसाठी शुश्रूषा-पथके काढावी; लोकप्रियता वाढली, चळवळ फोफावली म्हणजे सरकारने कोणता ना कोणता तरी आरोप ठेवावा. तुरुंगात डांबावे. तिथे प्रकृती बिघडावी. अत्यवस्थ झाले म्हणजे सरकारने नाइलाजाने सुटका करावी.

सुटकेनंतर विश्रांती मिळते न मिळते तोच पुन्हा हिरिरीने चळवळीत भाग घ्यावा–असा हा सर्व जीवनाचा कालक्रम चालू होता. प्रकृती सुधारणार कशी? आताही हेच घडले. शिवनी–मद्रास येथील कारावासात मुदतीचा ताप येऊ लागला. सुभाषबाबूंच्या पाठीतून, कण्यातून कळा येऊ लागल्या. अंगात ताप मुरला होता. त्यातच क्षयाची भावना उद्‌भवली.

इकडे देशात विशेषतः बंगालमध्ये सुभाषबाबूंच्या प्रकृतीबद्दल जनतेचे औत्सुक्य वाढत गेले. सरकारला यापुढे दुर्लक्ष करणे अशक्य झाले. सुभाषबाबूंच्या प्रकृतीची हेळसांड होत होती. प्रकृतीस्वास्थ्यासाठी त्यांना ऑस्ट्रियात व्हिएन्ना येथे पाठवावे असे ठरवण्यात आले. सरकारला परवानगी देणे भाग पडले. देशातच राहण्याची परवानगी द्यावी तर सुभाषबाबू पुन्हा चळवळीत पडणार हे उघड होते. आता सरकारलाही चिंता वाटू लागली. सरकारने त्यांच्या सुटकेपूर्वी त्यांच्यावर तीन अटी लादल्या.

(१) युरोपात चळवळ करावयाची नाही.

(२) इंग्लंडमध्ये पाऊल टाकायचे नाही.

(३) सरकारने परवानगी देईपर्यंत स्वदेशात परत यायचे नाही.

सुभाषबाबू स्वातंत्र्याचे भोक्ते; ते तुरुंगवासाला भिणारे नव्हते. ह्या अपमानास्पद अटी स्वीकारणे त्यांना शक्य नव्हते. पक्ष्याचे पंख तोडून त्याला घायाळ करण्यासारखे होते. पण सुभाषबाबूंची प्रकृती चिंताजनक झाली होती. जनतेने तर आग्रहच धरला की, कोणत्याही परिस्थितीत ताबडतोब उपचार करणे आवश्यक आहे. केवळ प्रकृतीसाठी तरी त्यांनी परदेशी जावे. केवळ नाईलाज म्हणून सुभाषबाबूंनी या अटी मान्य केल्या. त्या मान्य करण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

सरकारने त्यांची सशर्त सुटका केली. २३-२-१९३२ रोजी मुंबईहून निघणाऱ्या बोटीने ऑस्ट्रिया येथे व्हिएन्ना या शहरी उपचार करण्यासाठी ते निघाले.

प्रकृतीस्वास्थासाठी परदेशगमन

(१९३२–१९३७)

सुभाषबाबू प्रकृतीने एवढे खंगले होते की, मुंबई येथे येऊन विलायतेच्या बोटीत बसताना त्यांना खुर्चीवर बसवून उचलून आणावे लागले. ऑस्ट्रियाच्या राजधानीत व्हिएन्ना येथे येऊन ते पोचले. व्हिएन्ना येथील हवामान उत्तम असून क्षयरोग–चिकित्सा व उपचार यांसाठी तेथील चिकित्सालय सुप्रसिद्ध होते. या चिकित्सालयात सुभाषबाबू उपचारासाठी राहिले. हळू हळू त्यांची प्रकृती सुधारू लागली.

या चिकित्सालयात भारताच्या केंद्रीय कायदेमंडळाचे अध्यक्ष श्री. विठ्ठलभाई पटेल हेही उपचारासाठी आलेले होते. स्वदेशाहून दूर यावे लागलेल्या या दोन श्रेष्ठ पुढाऱ्यांची गाठभेट या चिकित्सालयात होऊ लागली.

चिकित्सालयात आल्यावर त्यांनी आपल्या एका मित्राला पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात—

'या सॅनिटोरियममध्ये आल्यापासून मला पुष्कळ बरे वाटू लागले आहे; पण पोटातील दुखणे अजून आटोक्यात आले नाही. म. गांधी सध्या चालू असलेला भारतातील लढा तहकूब करण्याचा विचार करीत असल्याचे दिसते. तसे एक पत्रक त्यांनी व्हाइसरॉयना पाठवल्याचे लंडन टाइम्सवरून मला समजले.

सध्याच्या परिस्थितीवरून ब्रिटिश सरकार हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मागणीला होकार देईल याचा सुतराम् संभव नाही...प्रतिगामी प्रवाह सर्वत्र प्रबळ होत चाललेले आहेत असे दिसते. हिंदी स्वातंत्र्याचा आपणांस जर मनापासून ध्यास लागला असेल तर आपण देहकष्ट, त्याग व कर्तृत्व यांची

कास धरली पाहिजे. काँग्रेसमधील वृद्ध व अनुभवी कार्यकर्त्यांना जर थकल्यासारखे वाटत असेल तर त्यांनी बाजूला होऊन तरुणांना आपली जागा रिकामी करून द्यावी. या प्रसंगी कोणतीही तडजोड स्वातंत्र्याच्या चळवळीला मारक झाल्याशिवाय राहणार नाही. परदेशाकडून मिळणारी सहानुभूतीही आम्ही गमावून बसू.'

सुभाषबाबू उसळत्या रक्ताचे नवविचारांचे तरुण राजकारणी मुत्सद्दी होते. महात्मा गांधीजींची तडजोडवादी विचारसरणी त्यांना मान्य नव्हती. सत्याग्रहाची चळवळ शिगेला पोचली होती. मिठाचा सत्याग्रह यशस्वी झाला होता. जंगलचा कायदा तोडण्यासाठी हजारो स्वयंसेवक सिद्ध होते. तो कायदाही तोडला गेला. ब्रिटिश सत्तेचा पायाच उखडल्यासारखे झाले होते. अशा अनुकूल प्रसंगी परिस्थितीचा जास्तीत जास्त फायदा घेण्याऐवजी महात्मा गांधीजींनी सत्याग्रह तहकूब करावा, सामुदायिक कायदेभंग थांबवावा असे ठरविले.

येरवड्याच्या तुरुंगात असताना महात्मा गांधीजींनी आत्मशुद्धीचे कारण देऊन ८ मे १९३३ पासून एकवीस दिवसांचे प्रायोपवेशन सुरू केले. गांधीजींची मुक्तता झाली. प्रायोपवेशन निर्विघ्नपणे पार पडले. काँग्रेसचे तात्पुरते अध्यक्ष लोकनायक अणे होते. म. गांधीजींनी त्यांना सूचना दिली. सत्याग्रहाची चळवळ सहा आठवडे थांबवावी असे जाहीर करण्यात आले. सरकारची इच्छा जनतेने ही असहकारतेची चळवळ कायमची मागे घ्यावी तरच सरकार राजकीय कैद्यांची मुक्तता करील अशी होती. या विषयावर खडाजंगी झाली. म. गांधींचा सल्ला सामुदायिक कायदेभंग थांबवावा, वैयक्तिक कायदेभंग करण्यास मोकळीक असावी असा होता तो ठरावरूपाने मांडण्यात येऊन मंजूर करण्यात आला!

ही वार्ता कानी पडताच सुभाषबाबूंनी विठ्ठलभाई पटेलांशी विचारविनिमय करून या ठरावासंबंधी एक संयुक्त निषेध पत्रक प्रसिद्ध केले. त्यात ते म्हणतात,

'महात्मा गांधींच्या उपवासाने चिंताजनक वातावरण पसरले. उपवासातून ते सुखरूपपणे पार पडले व त्यांची बिनशर्त मुक्तता करण्यात आली हे वाचून मनाला बरे वाटले. पण त्याचबरोबर त्यांनी कायदेभंगाची चळवळ तहकूब ठेवल्याचे ऐकून आश्चर्य वाटले. महात्मा गांधींनी आजपर्यंत राष्ट्राकडून

झालेल्या भरीव कार्यावर एका लेखणीच्या फटकाऱ्याने काळीमा फासला आहे. गेल्या १३ वर्षात विलक्षण स्वार्थत्याग व आत्मयज्ञ करून हिंदी राष्ट्राने आपल्या चळवळीची कमावलेली कीर्ती व इभ्रत या चळवळ तहकूब ठेवण्याच्या निर्णयाने पार घालविली आहे... महात्माजींना अशा चळवळी मध्येच तहकूब करण्याचा काय हक्क आहे हे अजून आम्हाला समजले नाही...आज म. गांधी मी म्हणजेच काँग्रेस असेच अप्रत्यक्षपणे लोकांना सांगत आहेत.'

महात्मा गांधीजींच्या मतांशी व कार्यक्रमांशी सहमत होणे हे सुभाषबाबूंना अशक्य वाटू लागले सुभाषबाबूंचे स्पष्ट मत असे होते की आत्मक्लेशाने राज्यकर्त्यांच्या मनात आणि वागणुकीत फरक घडवून आणू अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. म्हणून कायदेभंगाची चळवळ तहकूब करणे म्हणजे काँग्रेसचे धोरण फसले, कार्यक्रम अयशस्वी झाला आहे अशी कबूली देण्यासारखे आहे. महात्मा गांधी राजकीय पुढारी या दृष्टीने अयशस्वी ठरले आहेत असे त्यांनी स्पष्टपणे जाहीर केले.

सुभाषबाबू हे व्यक्तीमाहात्म्य वाढविणारे नव्हते. त्यांना विभूतीपूजा मान्य नसे. त्यावेळच्या काँग्रेस कार्यकर्त्यांपेक्षा ते जहाल पुरोगामी मताचे असल्याने आता राजकीय धोरण आखण्याची व कार्यक्रम पार पाडण्याची जबाबदारी डेमोक्रॅटिक पक्षाच्या जहाल पुढाऱ्यांकडे जावी असे त्यांना वाटू लागले. मतभेदास येथेच सुरवात झाली.

सुभाषबाबू प्रकृतीस्वास्थासाठी युरोपमध्ये गेले तरी ते स्वस्थ आराम करीत बसले नाहीत. १९३३ च्या जून महिन्यात लंडन येथे हिंदी राजकीय परिषद भरली त्याचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवडणूक झाली होती. पण व्हिएन्नाहून लंडनला जाण्याचा परवाना त्यांना नाकारण्यात आला; त्यांचे अध्यक्षीय भाषण परिषदेत वाचून दाखविण्यात आले.

१९३३ च्या नाताळमध्ये रोममध्ये इटालीचे सर्वाधिकारी मुसोलिनी यांचे हस्ते पौर्वात्य विद्यार्थी परिषदेचे उद्घाटन झाले. सुभाषबाबूंना या संमेलनाचे अध्यक्ष नेमण्यात आले. या संमेलनात हिंदी राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमाला पाठिंबा देण्याचा ठराव मंजूर झाला. सुभाषबाबूंनी आपल्या अध्यक्षीय भाषणात हिंदी विद्यार्थ्यांच्या चळवळीतील अडचणी सांगितल्या. राष्ट्रीय चळवळीला

पूरक असे हे विद्यार्थ्यांचे प्रयत्न होते. राजकर्त्यांचा विरोध सहन करून हिंदी विद्यार्थ्यांना चळवळ करावी लागते. हे त्यांनी स्पष्ट केले.

युरोपात फॅसिझम् मतप्रणालीचे वारे वाहात होते. सुभाषबाबूंनी दोन्ही तत्त्व प्रणालींचा सखोल अभ्यास करून या दोन्ही चळवळी हिंदुस्थानात उपयोगी पडतील असे वाटत नाही असे आपले मत स्पष्ट केले. हिंदुस्थानची भारतीय संस्कृती व परंपरा लक्षात घेऊन आपल्या कार्यक्रमांची आखणी केली पाहिजे असे ते म्हणत.

परराष्ट्र प्रचाराचे तंत्र समर्थपणे चालू ठेवले पाहिजे; इतर राष्ट्रांची सहानुभूती भारताच्या स्वातंत्र्य-चळवळीला मिळविण्याचा प्रचार हा एकमेव मार्ग आहे. संघटना व शिस्तवार प्रचार या मार्गांनी आपण आपले उद्दिष्ट साधले पाहिजे, जगात जे नवे नवे विचारप्रवाह व मतप्रणाली प्रचलित आहेत त्यांचा तौलनिक अभ्यास करून जे हिंदुस्थानाला सध्याच्या परिस्थितीत पेलवेल व पचनी पडेल असे धोरण ठेवले पाहिजे. असे विचार ते प्रदर्शित करत.

व्हिएन्ना येथे १९३४ सालच्या मे मध्ये परस्पर-संबंध वाढीस लागावेत या हेतूने सेंट्रल इंडो-युरोपियन सोसायटी स्थापन झाली. त्यांची प्रचारासाठी निमंत्रणे आल्यावरून झेकोस्लोव्हाकिया, ऑस्ट्रिया, हंगेरी, जर्मनी, युगोस्लाव्हिया इत्यादी देशांना त्यांनी भेटी दिल्या, व्याख्याने दिली व हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-चळवळीला पाठिंबा व सहानुभूती मिळविली. हे त्यांचे कार्य फार महत्त्वाचे ठरले कारण हिंदुस्थानच्या राष्ट्रीय चळवळीबद्दल परदेशात बरेच गैरसमज, अपसमज, विकृत, विपर्यस्त, खोडसाळ कल्पना होत्या. म. गांधी अस्पृश्यांच्या विरुद्ध आहेत, कम्युनिस्ट आहेत अशाही वार्ता पसरल्या होत्या ! त्या बदलण्यास या व्याख्यानांची फार मदत झाली.

हिंदु-मुसलमान जमाती हिंदुस्थानात एकत्र नांदूच शकत नाहीत; ब्रिटिश राजसत्ता आहे म्हणून दंगेधोपे या दोन जमातीत होत नाहीत; या दोन्ही जमातींचे वैर आहे पण या त्रयस्थ-तटस्थ राजकर्त्यांच्या धोरणामुळे शांतता व सुव्यवस्था नांदते असे परदेशात वृत्तपत्रांद्वारे भासवले जात होते. वस्तुस्थिती अगदी उलट होती. दोघांचे ऐक्य होऊ नये, दोन्ही जमातींची कोंबडी सतत

झुंजवावी व आपण मात्र नामानिराळे राहावे व सख्य व शांतता घडवून आणतो असे भासवावे असे ब्रिटिश राज्यकर्त्यांचे राजनैतिक धोरण होते. सुभाषबाबूंनी प्रत्यक्ष उदाहरणे देऊन हे परदेशांत पटवून दिले. यासाठी राष्ट्रीय सभेने प्रचार-संस्था युरोपात स्थापन करावी, एकट्यादुकट्याचे हे काम नव्हे असे सुभाष-बाबू सांगत. दोन्ही जमातींबद्दल त्यांना प्रेम असे. पुढे त्यांच्या आझाद हिंद सेनेत तर हिंदूप्रमाणेच मुसलमान पदाधिकारी व सेना सलोख्याने स्वातंत्र्या-साठी प्राण पणाला लावून लढत आहे हे दृश्य जगाला पहायला मिळाले.

परदेशांत प्रभावी प्रचार करणे आवश्यक असल्याचे पटल्याने विठ्ठलभाई पटेल यांनी आपल्या इस्टेटीपैकी एक लाख रुपये सुभाषबाबूंच्या हवाली केले...पुढे काही तांत्रिक अडचणीमुळे ही रक्कम प्रत्यक्ष हाती पडली नाही ही गोष्ट निराळी; पण त्यावरून विठ्ठलभाई पटेल यांच्यासारख्या मुत्सद्यांचा सुभाषबाबूंवर किती विश्वास होता हे दिसून येते.

१९३४ च्या नोव्हेंबर महिन्यात रायबहादूर जानकीनाथ बरेच आजारी झाले. सौ. प्रभावती देवी मातोश्रींनी वडिलाना भेटायला यावे अशी सुभाष-बाबूंना तार केली. स्वदेशी येण्यास सरकारच्या परवानगीची आवश्यकता होती, म्हणून सरकारकडे विनंती अर्ज केला व कळविले की वडील मृत्यूशय्येवर आहेत तेव्हा सुभाषबाबूंना स्वदेशी येऊन त्यांना भेटण्याची परवानगी मिळावी.हिंदुस्थान सरकारने या विनंतीकडे लक्ष दिले नाही, पण ब्रिएन्ना येथे असलेल्या ब्रिटिश वकिलाने ही तार पाहून कलकत्त्यास जाण्याचा सुभाषबाबूंना परवाना दिला एवढेच नव्हे तर विमानाने जाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. सुभाषबाबू विमानाने कलकत्त्यास यायला निघाले; कराचीपर्यंत पोचले तोच वडिलांच्या मृत्यूची दु:खद वार्ता त्यांना समजली. जानकीनाथ ३ डिसेंबर १९३४ रोजी कलकत्त्यास कालवश झाले. पितापुत्रांची भेट होऊ शकली नाही. हयातभर सुभाषबाबूंच्या कर्तृत्वाकडे डोळे लावून बसलेले जानकीनाथ मुलाची भेट न होताच देवाघरी निघून गेले. आय्. सी. एस्. परीक्षा पास झाल्यावर कलेक्टर कमिशनर या श्रेष्ठ अधिकाराच्या जागेवर रुजू व्हावे अशी महत्त्वाकांक्षा बाळगणारे पिताजी सुभाषबाबूंनी राजीनामा दिल्यावर जरा नाराजच होते; पण सुभाषबाबूंची नियुक्ती नियतीने राष्ट्राची धुरा समर्थपणे पेलण्यासाठी केली होती.

अशी उदाहरणे बंगालमध्ये घडली होती. बाबू अरविंद व त्याचे वडिल डॉ. कृष्णघन घोष यांचा इतिहास असाच. मनुष्य ठरवितो एक पण घडते वेगळेच !

सुभाषबाबू विमानाने डमडम विमानतळावर उतरताच पोलीसांनी त्यांना आपल्या ताब्यात घेतले व पोलीसपहाऱ्यात घरी पोचते केले; यावरून ते एक बंडखोर, राजद्रोही म्हणून समजले जात होते हे उघड आहे. अशा या राजकारणी मुत्सद्याला ब्रिटिश सरकारने स्थानबद्ध करून ठेवले एवढेच नव्हे तर एक आठवड्याचे आत पुन्हा युरोपला परत गेले पाहिजे अशी अट घातली ! नोकरशाहीच्या या दुष्ट मत्सरी कृतीस तोड नाही !

१९३४ साली १८१८ सालच्या तिसऱ्या कलमान्वये जे निर्बंध घातले गेले ते काढल्याचे सरकारने मागेच जाहीर केले होते असे असताना हे निर्बंध का ? सुभाषबाबूंनी याचा खुलासा मागितला. आपण कोणताच गुन्हा केला नसताना सरकारने आपल्याला असे बेमुदत का हद्दपार करावे ? ज्या मायभूमीसाठी एवढे कष्ट भोगले, सर्वस्वावर पाणी सोडले त्या मायभूमीचा एक सुपुत्र म्हणून स्वदेशीच राहण्याचा माझा जन्मसिद्ध हक्क सरकारने का हिरावून घ्यावा ?

सुभाषबाबूंचे हृदय विव्हल झाले. सरकारकडे त्यांनी लेखी कळविले— चौकशीविना मला इतके दिवस बंदिवासात ठेवलेत, परदेशी–हद्दपार केले आणि परत येण्याची बंदी केली हे मला सहन होणार नाही. या बंधनातून मी मुक्त होणार आहे, असा दृढ निश्चय केला आहे; मग त्याची बरीवाईट फळे कशीही असोत ती भोगण्यास मी तयार आहे ! आठ दिवसांत पुन्हा परदेशी जायचे ! वडिलांची और्ध्वदेहिक कृत्ये–क्रियाकर्मांतरास चौदा दिवस, पहिले दहा दिवस सुतक पाळायचे या कोणत्याही भावनात्मक आणि संस्कारधर्माला आवश्यक असलेल्या गोष्टीचा विचार न करता सरकारने दुष्टपणाने सुभाषबाबूंवर परदेशी जाण्याचा निर्वाणीचा हुकूम बजावला !...ब्रिटिश राजकर्त्यांची ही सूड बुद्धी ! सुभाषबाबूंना पुन्हा परदेशात जाणे भाग पडले.

व्हिएन्नाला परत जाताना कराची येथे विमान उतरले, त्याबरोबर पोलीसांनी त्यांना गराडा घालून त्यांची झडती घेतली. त्यात 'हिंदी स्वातंत्र्याचा लढा–' इंडियन स्ट्रगल–हे त्यांनी नुकतेच लिहिलेले पुस्तक मिळाले. इंग्लंडमध्ये

प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाची टंकलिखित प्रत पोलिसांना मिळाली ती त्यांनी जप्त केली. मात्र प्रकाशित झालेल्या या पुस्तकातील काही उत्तरे हिंदुस्थानातील काही वृत्तपत्रांना पाठविण्यात आले होते व ते प्रसिद्धही झाले होते.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला कोणत्याही–ब्रिटिशांचे मित्र नसलेल्या–राष्ट्रांकडून मदत मिळाल्यास ती घ्यायची असे सुभाषबाबूंचे स्पष्ट मत होते. त्यासाठी त्यांनी युरोपमधील श्रेष्ठ राजकारणी महापुरुषांच्या, राष्ट्रनेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या. मागेच १९३३ साली बर्लिनमध्ये जाऊन त्यांनी हिटलरची भेट घेतली होती. इंग्रजांचे संकट तीच आपली संधी या न्यायाने हर हिटलरशी मोकळेपणे चर्चा करून त्यांनी हिंदी बांधवांच्या राष्ट्रीय स्वातंत्र्यासंबंधीच्या आकांक्षा व चालविलेले प्रयत्न यांची माहिती देऊन साहाय्य अपेक्षिले होते. या भेटीत त्यांनी हर हिटलर यांना उघड उघड 'युद्ध केव्हा सुरू करणार' असे विचारले होते— त्या महामुत्सद्याने याचा थांग लागू दिला नाही पण राजकारण धुरंधर सुभाषबाबूंनी मात्र महायुद्ध लवकरच सुरू होणार हे बरोबर हेरले होते.

१९३५ साली युरोपमध्ये आल्यावर सुभाषबाबूंनी सिनॉर मुसोलिनी यांची भेट घेतली.

प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठी त्यांच्या पोटदुखीच्या विकारावर व्हिएन्ना येथील रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया फार कठीण होती पण रुडोल्फायनर सॅनिटोरियम्मध्ये चोख व्यवस्था होती. डॉक्टर परिचारिका यांच्या उत्कृष्ट शुश्रूषेमुळे ते वाचले. या ठिकाणी एमिली शेंकल या तरुणीशी त्यांचा परिचय झाला. या तरुणीने त्यांना 'हिंदी स्वातंत्र्याचा लढा' या प्रसिद्ध पुस्तकाच्या रचनेबाबत खूपच साहाय्य केले होते मजकूर टंकलिखित करणे, मुद्रिते तपासणे, वृत्तांत लिहून घेणे अशा विविध प्रकारे या तरुणीची मदत त्यांना झाली. एमिली शेंकल ही तरुणी फार प्रेमळ, विश्वासू होती. सुभाषबाबूंचे मन तिने आकर्षित केले. विवाहाचा आजवर कधीही विचार न केलेले सुभाषबाबू या तरुणीच्या प्रेमळ स्वभावामुळे व तिने दिलेल्या साहाय्यामुळे प्रेमवश झाले. १९४१ साली सुभाषबाबूनी तिच्याशी विवाह केला. 'इंडियन स्ट्रगल' या पुस्तकात सुभाषबाबूंनी या तरुणीने दिलेल्या सहाय्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे.

या विवाहाची वार्ता हिंदुस्थानात फार उशीरा समजली. त्याचा वृत्तांत पुढे यथावकाश येईलच.

रुग्णशय्येवर असतानाही त्यांचे प्रचारकार्य पत्रकांद्वारे चालू होते.

१९३६ च्या फेब्रुवारी महिन्यात सुभाषबाबूंनी आयर्लंडला भेट दिली. स्वातंत्र्याचा संदेश व त्यासाठी चाललेला लढा याची माहिती आयरिश जनतेला दिली. आयर्लंडचे अध्यक्ष इमान डी व्हॅलेरा यांची मुलाखत घेतली.

अनेक राष्ट्रांना भेटी देऊन तिथल्या राज्यकर्त्यांशी विचारविनिमय करून त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याची भूमिका समजावून दिली. आपल्या लढ्याला बाहेरची कोणती राष्ट्रे आपल्याला किती व कसे साहाय्य करू शकतील याचा अंदाज घेतला. १९३३ ते १९३९ या चार वर्षांच्या कालखंडात घेतलेल्या गाठीभेटींवरून लवकरच दुसरे महायुद्ध पेटणार असे त्यांना दिसू लागले. ही मोक्याची संधी होती या वेळी परदेशात संघटना व चळवळ करून सशस्त्र उठाव कसा व कोठे सुरू करता येईल हे विचार मनात घोळू लागले होते. भावी स्वातंत्र्यलढ्याची ही वैचारिक पार्श्वभूमी तयार होत होती. पुढे होणाऱ्या सशस्त्र क्रांतीची नांदीच !

शस्त्रक्रियेनंतर काही दिवस विश्रांती घेऊन सुभाषबाबू १९३६ साली लखनौ येथे भरणाऱ्या कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठी हिंदुस्थानास यावयास निघाले. हिंदुस्थानात आलात तर तुरुंगात जावे लागेल असे हिंदुस्थान सरकारने त्यांना ऑस्ट्रियाच्या वकिलामार्फत कळविले. कोर्टात खटला नव्हता की कोणताही आरोप नव्हता. पण क्रांतिवादी गटाच्या नेतृत्वाशी आणि त्यांना देण्यात येणाऱ्या सहाय्याशी त्यांचा संबंध असावा म्हणून सुभाषबाबू मोकळे राहिले. तर सारा बंगाल पुन्हा पेटून उठेल अशी धास्ती वाटत असल्याने ८-३-१९३६ रोजी सुभाषबाबूंनी मुंबईस पदार्पण करताच त्यांना अटक करून येरवडा तुरुंगात पाठविण्यात आले. पुण्याची उष्ण हवा त्यांना मानवली नाही.

२४ एप्रिल १९३६ रोजी सुभाषबाबूंचे बंधू डॉ. शैलेशबाबू यांनी येरवडा तुरुंगात जाऊन त्यांची प्रकृती तपासली व मुलाखत घेतली.

या अटकेचे पडसाद हाऊस ऑफ कॉमन्समध्ये उमटले. सभासदांनी अटकेचे कारण विचारले त्याला उत्तर देताना अंडर सेक्रेटरी बटलर म्हणाले की,

सुभाषबाबूंचा क्रांतिकारक चळवळीशी संबंध असल्याने त्यांच्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

त्यांची सुटका व्हावी म्हणून लोकांनी सभा घेतल्या. २४-११-१९३६ रोजी बी. सी. चतर्जी यांच्या अध्यक्षतेखाली सुभाषबाबूंच्या सुटकेची मागणी अल्बर्ट हॉलमध्ये भरलेल्या सभेत करण्यात आली. सुभाषबाबू हे अत्याचारी मार्गाचे पुरस्कर्ते नसताना त्यांना अटकेत ठेवणे योग्य नाही असे सभेने सरकारला सुचविले पण सरकारवर या मागणीचा काही परिणाम झाला नाही.

येरवड्यास सुभाषबाबूंची प्रकृती बिघडली म्हणून त्यांना बंगालमध्ये कुर्सिआंग येथे नेण्यात आले पण प्रकृतीत काही सुधारणा न होता ती जास्तच बिघडली. अखेरीस १९३७ च्या एप्रिलमध्ये त्यांना कलकत्ता येथील मेडिकल कॉलेजच्या हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले पण तिथे त्यांची प्रकृती अधिकच चिंताजनक झाली. १७ मार्च १९३७ रोजी शेवटी त्यांना बिनशर्त बंधमुक्त करणे सरकारला भाग पडले. त्यांचे वजन ३०-३५ पौंडांनी घटले. क्षयरोगाचा प्रादुर्भाव झाला म्हणून पंजाबात डलहौसी या हवेशीर ठिकाणी ठेवले. तिथे मात्र त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली. ऑक्टोबर पर्यंत ते पूर्ववत काम करू लागले. कलकत्ता येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे वेळी त्यांनी स्वयंसेवक दलाचे अधिपती म्हणून काम केले. अखिल बंगाल किसान सभेच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला त्यावेळी आपल्या भाषणात ते म्हणाले, 'देशात आज सर्वत्र पिळवणूक दिसत आहे ती नेस्तनाबूद करणे हे काँग्रेसचे कार्य आहे. काँग्रेस ही सर्व वर्गांची, सर्व समाजाची प्रतिनिधी आहे. स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर आर्थिक स्वातंत्र्य येईलच. पुन्हा एकदा जगातील पुढारलेल्या राष्ट्रांच्या अग्रस्थानी बसण्याचा मान हिंदुस्थानला मिळेल व हिंदी संस्कृतीचा ध्वज सर्व जगभर फडकत राहील अशी मला आशा आहे.'

राजकीय सामाजिक कार्य धडाडीने सुरू झाले पण सुभाषबाबूंची प्रकृती पूर्ववत धडधाकट झाली नाही. डॉक्टरांनी पुन्हा हवापालट करण्याचा सल्ला दिला. १९ नोव्हेंबर १९३७ रोजी ते पुन्हा विमानाने ऑस्ट्रियात गेले व बाडगॉस्टेन येथील एका रुग्णालयात जाऊन राहिले. राजबंद्यांना अनंत छळ सोसावा लागत आहे याची रुखरुख त्यांना नेहमी वाटे अशाच उद्विग्न मनः-

स्थितीत त्यांना प्रकृतीस्वास्थ्यासाठी पुन्हा परदेशी जावे लागले. जाताना त्यांचे हृदय भरून आले होते.

ऑस्ट्रियात सुमारे दीड महिना विश्रांती घेतल्यावर ते इंग्लंडला मित्रांना भेटण्यासाठी गेले. इंग्लंडमध्ये प्रवेश करू नये असा या वेळी त्यांच्यावर निर्बंध नव्हता त्यामुळे त्यांना जाता आले. १० जानेवारी १९३८ रोजी ते इंग्लंडला पोचले.

व्हिक्टोरिया स्टेशनवर त्यांचे उत्स्फूर्त स्वागत झाले. हिंदी विद्यार्थी एकत्र जमले होते; त्यांनी 'सुभाषबाबू झिंदाबाद' अशा घोषणा केल्या; पुष्पहार घातले. पुढे डॉर्चेस्टर हॉटेलमध्ये त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

११-१-१९३८ रोजी सेंट पँक्रस टाऊन हॉलमध्ये त्यांचा सन्मान झाला. हिंदी स्वातंत्र्याकरिता झगडणारा वीर, पुढारी, मुत्सद्दी असे त्यांना संबोधण्यात आले. त्या सन्मानाला उत्तर देताना सुभाषबाबू म्हणाले,– ...'हिंदुस्थानने चालविलेला लढा हा पौर्वात्य देशांनी चालविलेल्या जागतिक लढ्याचा एक भाग आहे. हिंदुस्थानला यापासून वेगळे राहता येणार नाही. त्या लढ्यात त्याने उतरले पाहिजे.'

वृत्तपत्रसंस्थेला–रॉयटरला खास दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हिंदुस्थानातील चळवळीचे ध्येय स्पष्ट केले. संपूर्ण स्वातंत्र्य आणि लोकशाही घटना ही आमची मागणी आहे. समाधानी तडजोड झाली तरच ती आम्ही मान्य करू.

लंडनमध्ये असताना त्यांनी मजूर पक्षाचे पुढारी मेजर ॲटली, लॉर्ड स्नेल, लॉर्ड किनोल यांच्याबरोबर चर्चा केली व स्पष्टपणे सांगितले की इंग्लंडमधील एखाद्या राजकीय पक्षाकडून आमच्या स्वातंत्र्यचळवळीला मदत मिळेल अशी आमची अपेक्षा नाही व नव्हती. मजूर पक्षाबद्दलचाही आमचा भ्रमनिरास झाला आहे.

सुभाषबाबूंचे लंडनमध्ये अनेक ठिकाणी सत्कार झाले, भाषणे चर्चा, संदेश, मुलाखती पुष्कळच झाल्या. प्रमुख व्यक्तींच्या गाठीभेटी झाल्या. विचारविनिमय झाला. त्या प्रमुख व्यक्तीत मेजर ॲटली, जॉर्ज लॅन्सबरी, ग्रीनवुड, वेब्हिन, स्ट्रॅफोर्ड क्रिप्स, प्रो. लास्की, पामदत्त ब्रॅडले, लॉरेन्स, हाऊस मन इ. पुढारी व होरॅबिन, स्ट्रॅची मॉरिस इ. विद्वानही होते.

लंडन स्कूल ऑफ इकॉनामिक्स, ऑक्सफर्ड, केंब्रीज विद्यापीठांनी त्यांचा सन्मान केला. १५-१-१९३८ रोजी डी. व्हॅलेरांची गाठही घेतली. लॉर्ड आयर्विन, ऑस्ट्रियाचे प्रेसिडेंट डॉ. बेनिस यांनीही त्यांच्या मुलाखती घेतल्या.

इंग्लंडचा दौरा गाजला, अपेक्षेपेक्षा यशस्वी झाला.

१९ जानेवारी १९३८ रोजी ते इंग्लंडहून विमानाने हिंदुस्थानात परत येण्यास निघाले व २३ ला कराचीस आणि २४ जानेवारी १९३८ रोजी कलकत्त्यास पोचले. त्यांचे शाही थाटाने स्वागत झाले. ते अखिल हिंदुस्थानचे अनभिषिक्त सम्राट झाले.

ते लंडनमध्ये असताना इकडे हिंदुस्थानात लखनौमधील सुंदरनगर येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले असताना सर्वसंमत ठराव होऊन एकमुखाने १९३८ साली हरीपुरा येथे भरणाऱ्या ५१ व्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून त्यांना निवडण्यात आले. ही आनंदाची बातमी त्यांना लंडनमधून निघताना मिळाली. वास्तविकपणे १९३८ सालच्या काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदासाठी पं. जवाहरलाल नेहरु, अब्दुल गफारखान, मौलाना आझाद व सुभाषचंद्र बोस अशी चार नावे सुचविली होती, पण तिघांनी आपले नावे परत घेतली त्यामुळे सुभाषबाबूंची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. सुभाष-बाबूंचे नाव प्रत्येक प्रांताने सुचविले होते.

हरिपुरा काँग्रेस १९३८
५२ वे अधिवेशन

देशातील अत्युच्चपदाचे मान म्हणजे काँग्रेसचे अध्यक्षपद. ते बंगालच्या या सुपुत्राला मिळाले. त्या वेळी त्यांचे वय ४१ होते. बंगालची परंपरा मोठी. आत्तापर्यंत अध्यक्षस्थान भूषित केलेल्या बंगालच्या पुढाऱ्यात उमेशचंद्र बानर्जी, सुरेंद्रनाथ बानर्जी, आनंदमोहन बोस, रमेशचंद्र दत्त, लालमोहन घोष, राशबिहारी घोष, भूपेंद्रनाथ बसू, लॉर्ड सिंह, अंबिकाचरण मुजुमदार, चित्तरंजन दास, नेली सेनगुप्त असे राष्ट्रधुरीण होते. त्या सर्वांत सुभाषबाबू वयाने लहान व कीर्तीने व कर्तृत्वाने श्रेष्ठ असे अध्यक्ष लाभले. तरुण भारताचा, बंगालचा व अखिल भारताचाच हा गौरव!

सुभाषबाबू कलकत्त्याला काही दिवस राहिल्यावर काँग्रेसच्या अध्यक्षपदाचे मानाचे स्थान भूषित करण्यासाठी हरिपुरा (गुजरात) येथे आले.

हरिपुरा काँग्रेस अधिवेशनासाठी ते आले असताना त्यांचे सम्राटासारखे स्वागत झाले. तापी नदीच्या काठावर विठ्ठलनगरच्या काँग्रेसमंडपाची शोभा अवर्णनीय होती. ५१ प्रवेशद्वारे, ५२ राष्ट्रीय झेंडे उभारले होते. त्यांची भव्य मिरवणूक सजविलेल्या ५१ बैलगाड्यांच्या रथातून काढली. त्या वेळेचे दृश्य ज्यांनी पाहिले असेल त्यांचे डोळे तृप्तीने दिपले. असे भव्य प्रचंड आणि उत्स्फूर्त स्वागत यापूर्वी कोणत्याही अध्यक्षाचे झाले नाही असे लोक म्हणत होते.

हे अधिवेशन चांगलेच गाजले. आपल्या अध्यक्षीय भाषणांत सुभाषबाबूंनी स्पष्ट घोषणा केली, ' आगामी संकटाचा लाभ घेऊन भारतीय राष्ट्राने ब्रिटिशांना संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीची पूर्णता करण्यासाठी अगतिक केले पाहिजे. ब्रिटिश सत्ता भारताची मागणी पूर्ण करणार नसेल तर त्या सत्तेशी लढा

देण्याची तयारी केली पाहिजे–तो दिवसही निश्चित केला पाहिजे.' जणू जागृत ज्वालामुखीच्या मुखातून जाज्वल्य विचार-स्फुल्लिंग उफाळून बाहेर पडत होते!

विविध राष्ट्रीय प्रश्नांची त्यांनी चर्चा केली. कामाचा विलक्षण ताण पडल्यामुळे ते नंतर आजारी पडले.

कौन्सिलमध्ये राहून सुधारणा करणे हे गौण आहे हे स्पष्टपणे मांडल्यावर शासनाला विरोध करून स्वातंत्र्याचा लढा देणे अपरिहार्य आहे असे सुभाषबाबूंनी सांगितले. पण त्यांना म. गांधी व त्यांच्या गटाकडून सहकार्य मिळाले नाही.

महात्मा गांधीजींशी आता मतैक्य होणे शक्य नव्हते. परस्परविरोधी मताचे हे दोघे पुढारी! एक ज्येष्ठ, श्रेष्ठ, सत्य–अहिंसा मार्गाने जुळते घेऊन वागूया असे म्हणणारे व दुसरे छाती ठोकून, दंड उगारून उघड उघड लढ्यास प्रवृत्त झालेले. काँग्रेसमध्ये दोन तट पडले.

१९३९ च्या जानेवारीत त्रिपुरा येथे काँग्रेसचे अधिवेशन भरण्याचे ठरले. मध्यंतरीच्या काळात सुभाषबाबूंनी वर्षभर आपल्या मताचा प्रचार केला व तो प्रभावी ठरला तरीही सहनशीलता स्वीकारून शक्य तितके महात्मा गांधींच्या गटाशी मिळते जुळते घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्रिपुरा काँग्रेसच्या अध्यक्षपदी महात्मा गांधीजींनी डॉ. पट्टाभी सीतारामय्या या आपल्या गोटातील पुढाऱ्याचे नाव सुचविले. इतके असताना सुभाषबाबूंनी महात्मा गांधीजींना तार करून आशीर्वाद मागितला.

'महात्माजी, मी अध्यक्षपदासाठी उभा आहे. मला आपला आशीर्वाद मिळावा.'

म. गांधीजींनी उत्तर दिले– 'छे, छे, या वेळी डॉ. पट्टाभींचे नाव ठरविले आहे.'

आश्चर्य असे की जनतेच्या हृदयसिंहासनावर सुभाषबाबूंनी प्रतिष्ठान स्थिर केले होते. म. गांधींचा उघड उघड विरोध असतानाही २६ जानेवारी १९३९ रोजी झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सुभाषबाबूंना अधिक मते पडून ते त्रिपुरा काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष निवडले गेले. डॉ. पट्टाभी सीतारामय्यांचा पराभव झाला.

स्वातंत्र्यवीरांची भेट

महात्मा गांधीजींच्या अनुमतीने उभे राहिलेल्या डॉ. पट्टाभी सितारामय्या यांचा पराभव करून जनतेच्या हृदयसाम्राज्यावर आरूढ झालेले सुभाषबाबू. अंगात १०६° ताप असताना काँग्रेस अधिवेशनास आले. त्रिपुरी काँग्रेसचे अधिवेशनही गाजले पण सुभाषबाबूंना विरोध सतत होत राहिल्याने म. गांधीजी व त्यांचे अनुयायी यांच्याबरोबर काम करणे त्यांना अशक्य झाले. वारंवार खटके उडू लागले. सुभाषबाबूंनी त्यामुळे ही फाटाफूट वाढू नये म्हणून स्वतःच २८ एप्रिल १९४० च्या कलकत्ता येथे भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभेत अध्यक्षपदाचा राजीनामा दिला; ते काँग्रेसच्या बंधनातून मुक्त झाले पण एवढ्यावर प्रतिपक्षाचे समाधान झाले नाही. सुभाषबाबूंनी पुढे आपला स्वतंत्र पक्ष (फॉरवर्ड ब्लॉक) स्थापून मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी आपला प्रचारदौरा काढला, कार्यक्रम सुरू केले. त्यांची वाढती लोकप्रियता काँग्रेसमधील गांधीवादी पुढाऱ्यांना सहन झाली नाही. काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी ठराव करून सुभाषबाबूंची तीन वर्षे पर्यंत काँग्रेसमधून उचलबांगडी केली! ज्या महान नेत्याने अपूर्व त्याग करून आपल्या जिवाचे रान केले, हाडाची काडे केली, मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी अनेक वेळा तुरुंगवास भोगला त्यांना ही वागणूक! हा अपमान!... बंगाल प्रांताचे ते आवडते नेते; त्यामुळे आपल्या नेत्याचा हा अपमान सहन न होऊन बंगाल काँग्रेस कमिटीने ठराव करून सुभाषबाबूंना आपले प्रमुख म्हणून निवडले. झाले! एवढे कारण मिळाल्यावर काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांच्या अंगाचा तिळपापड उडाला. त्यांनी बंगाल प्रांत काँग्रेस कमिटीच बेकायदेशीर ठरवली. सुभाषबाबू बंडखोर ठरले. त्यांची कोणतीही चळवळ काँग्रेसला पसंत पडली नाही.

महात्मा गांधीजींबद्दल त्यांना आदर असे. 'भारत स्वतंत्र होईल तेव्हा

त्याची सर्व सूत्रे महात्माजींच्या हाती असावीत; आम्ही त्यांचे हाताखाली मातृभूमीच्या संरक्षणार्थ सेनापती म्हणून आनंदाने काम करू' असे ते म्हणत.

काँग्रेसच्या हायकमांडने थोडे नमते घ्यावे; सुभाषबाबूंनीही ताणून धरू नये यासाठी सुभाषबाबूंच्या चाहत्यांनी पुष्कळ प्रयत्न केले. कविवर्य रवींद्रनाथ टागोरांनी म. गांधींना एक निवेदन सादर केले पण गांधीजींचा निर्णय अटळ होता. त्यांनी कविवर्यांना तारेने उत्तर दिले, 'तुम्हीच सुभाषबाबूंचे मन वळवून त्यांनी शिस्त पाळावी असे सांगावे, तरच त्यांचेवरील निर्बंध दूर होतील.'

म. गांधीजी आपल्या बाबतीत एवढे कठोर होतील अशी सुभाषबाबूंची कल्पनाही नव्हती. खोट्या प्रतिष्ठेसाठी महात्माजींनी कविवर्य टागोरांची विनंती धुडकावून लावली! बंडखोरपणे वागल्याबद्दल काँग्रेस हायकमांडची माफी मागितल्याशिवाय त्यांचेवरील निर्बंध उठणार नाहीत अशी समज दिली. 'माफी? कशासाठी?' सुभाषबाबूंनी पुष्कळ विचार केला. कोणतीही चुकीची, बेशिस्तीची वागणूक आपल्या हातून घडलेली नाही याची ग्वाही त्यांचे अंतर्मन त्यांना देत होते. त्यांची इच्छाशक्ती दुर्दम्य होती. यापुढे 'मोडेन पण वाकणार नाही' ह्या जिद्दीने सुभाषबाबूंनी आपले कार्य 'फॉरवर्ड ब्लॉक' ह्या पुरोगामी गटाची स्थापना करून चालू ठेवले. दौरा काढला. प्रचार सुरू केला. त्यांचे एक स्नेही श्री. ह. वि. कामथ यांनी आय. सी. एस्. चा राजीनामा दिला व ते पुरोगामी गटाला सामील झाले. ब्रिटिशांविरुद्ध तात्काळ लढा पुकारणे अगत्याचे आहे हे मत सुभाषबाबूंनी पुनः निश्चित केले. त्यांनी काँग्रेस हायकमांडला स्पष्ट नकार कळविला.

सुभाषबाबूंनी यापुढे भारतातील प्रत्येक नेत्याची व संघटनांची गाठ घेऊन भारतात स्वातंत्र्ययुद्ध कसे लढविता येईल याचा अंदाज घेण्याचे ठरविले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे स्मरण त्यांना उत्कटतेने होत होते. जून १९४० मध्ये एके दिवशी ते अकस्मात स्वातंत्र्यवीर सावरकर सदनात उपस्थित झाले. दोन महान नेत्यांची गाठ भेट चर्चा झाली. ती गुप्तचर्चा फारच परिणामकारक ठरली. दोघांची विचारसरणी एक असली तरी कार्यपद्धतीविषयी मतभिन्नता होती. स्वातंत्र्यासंबंधी आपले विचार प्रकट करताना सुभाषबाबूंनी चळवळीची सुरुवात परकीय सत्तेने उभारलेली स्मारके उखडून टाकण्यापासून

करावी असे सांगितले. कलकत्त्यास हॉल्वेल स्मारक उखडून टाकण्याचा मनोदय व्यक्त केला.

कलकत्त्याच्या डलहौशी स्क्वेअरसमोर हे स्मारक इंग्रजांनी उभे केले होते. जनतेला लावलेला हा खोटा कलंक होता. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामात बंडवाल्यांनी काही इंग्रज स्त्री-पुरुषांना एका लहान अंधारकोठडीत कित्येक तास कोंडून ठेवले. त्यामुळे कित्येक गतप्राण झाले; गुदमरून गेले. त्यांच्या स्मरणार्थ हे स्मारक उभारले होते!... ही सर्व घटनाच पुढे खोटी ठरली तरी स्मारक उभेच! ही लांछनास्पद स्मृती नष्ट करणे अगत्याचे आहे असे सुभाषबाबूंना वाटले.

सुभाषबाबूंनी आपला मनोदय व्यक्त करताच स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले, 'अशा कदाचित योग्य पण कमी महत्त्वाच्या प्रश्नावर आता सामर्थ्य खर्च करु नका! संधी आल्यास या युद्धकाळातच भारताचं स्वातंत्र्ययुद्ध लढण्याची वेळ येईल. तिचा लाभ घेण्यास आपण नित्य सज्ज असले पाहिजे. सैन्य हेच सर्वांत महत्वाचे सामर्थ्य केंद्र होय! त्यांच्याच साहाय्यानं स्वातंत्र्ययुद्ध संभवत असतं.'

जनतेत काहीतरी जागृती उत्पन्न करावी या हेतूने हॉल्वेल स्मारकाच्या उच्चाटणार्थ चळवळ मी हाती घेतली असे सांगताच स्वातंत्र्यवीर म्हणाले–'मी तुमची तळमळ जाणतो...मेलेल्या हॉल्वेलसारख्या ब्रिटिश जुलमी अधिकाऱ्यांच्या दगडी पुतळ्याचे उच्चाटण करण्यात सामर्थ्य खर्ची पडू देऊ नका. यासाठी तुमच्या सारख्या पुढाऱ्याने तुरुंगात डांबून पडावे म्हणजे शत्रूला जे नेमके हवे तेच आपण करण्यासारखे होईल.–खरे राजकारण म्हणजे शक्य तर शत्रूलाच तुरुंगात डांबावे ...मी आपणास आग्रह करतो की सैनिकीकरणाचे आंदोलन जे मी चालविले ते मूलतः क्रांतिकारक आंदोलनच आहे...जपान या वर्षी युद्ध पुकारील–देशाच्या स्वातंत्र्यासाठी जर्मनी जपानच्या अद्यावत शस्त्रास्त्रांनिशी लढाईत मुरलेल्या हजारो हिंदी सैनिकांच्या साहाय्याने हिंदुस्थानावर बाहेरून स्वारी करण्याची सुवर्ण संधी लाभेल!– रासबिहारी बसू यांच्यासारख्या क्रांतिकारकांच्या पुढाऱ्यांचा आदर्श ठेवून हातावर तुरी देऊन तात्काळ हुलकांडी देऊन निसटून जावे. इटली, जर्मनीच्या हाती पडलेल्या हजारो हिंदी

सैनिकांचे पुढारीपण स्वीकारून हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याची प्रकट घोषणा करावी...जपान युद्धात पडताच साधेल त्या मार्गाने बंगालच्या उपसागरातून अगर ब्रह्मदेशातून ब्रिटिश सत्तेवर बाहेरून स्वारी करावी...जी काही अचाट सामर्थ्याची कर्तबगार माणसे माझ्या दृष्टीपुढे आहेत त्यांत आपण एक आहात माझा आपणावरच डोळा आहे.'

द्रष्ट्या महापुरुषाचे विचार सुभाषबाबू गंभीरपणे, शांतपणे ऐकत होते. या विचारांनी ते भारले गेले. बाहेरून मिळणाऱ्या सशस्त्र साहाय्याचं नेतृत्व करण्याचा विचार प्रबळ झाला.

सुभाषबाबू म्हणाले, 'मी आता प्रथम कलकत्त्यास जाऊन पुढचा कार्यक्रम निश्चित करीन.' सैन्यभरतीचा पुरस्कार स्वातंत्र्यवीर सावरकर, दुसऱ्या महायुद्धाच्या प्रसंगी का करीत असत याचे मर्म त्यांना पटले होते.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या भेटीनंतर सुभाषबाबू जे कलकत्त्यास आले ते एका नव्या पटलेल्या विचाराने भारून! छत्रपती शिवाजीमहाराजांच्या जीवनातील आग्ऱ्याहून सुटका या प्रकरणाची त्यांना आठवण झाली. शिवाजीमहाराज हे त्यांना आदर्श महापुरुष वाटत. महान कार्य साधण्यासाठी थोर वीर महापुरुषांचे उदाहरण व वागणूक डोळ्यांपुढे ठेऊन वागणे अगत्याचे आहे हे सुभाषबाबूंना मनोमय पटले होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी याच विचारांचे स्फुल्लिंग हृदयात चेतविले; अग्नि पेटला; आणि नव्या उत्साहाने पुढील कार्याची सुरवात झाली. गुप्तपणे, गनिमी काव्याने, धूर्तपणे!

फॉरवर्ड ब्लॉकच्या मुखपत्रात सुभाषबाबूंनी हॉलवेल स्मारक उखडून टाकण्यासाठी चळवळ करावी असे आव्हान पूर्वीच केले होते. सरकारने त्यांचे लेख आक्षेपार्ह ठरविले. कलकत्त्यास आल्याबरोबर त्यांच्यावर खटला भरला; अटक करून २ जुलै १९४० रोजी त्यांना प्रेसिडेन्सी तुरुंगात डांबून ठेवले.

सुभाषबाबूंच्या अटकेच्या वृत्तांताने जनतेचा प्रक्षोभ वाढला. इकडे प्रेसिडेन्सी तुरुंगात सुभाषबाबू २ जुलै १९४० पासून सतत काही योजना आखत होते. तुरुंगातून सुटका झाल्याशिवाय काही करता येणे शक्य नव्हते. जनतेचा वाढता प्रक्षोभ लक्षात घेता सरकारने सावधगिरी घेऊन हॉलवेल स्मारक हल-

विले पण सुभाषबाबूंची सुटका केली नाही! सुभाषबाबू सतत विचार करीत होते. २६ नोव्हेंबर १९४० रोजी तुरुंगात असताना त्यांनी अन्नसत्याग्रह पुकारला. सुभाषबाबूंचे बाबतीत सरकार फार सावधगिरी बाळगे. त्यांची प्रकृती बिघडू लागली. अन्नपाणी वर्ज्य केल्यामुळे वजन घटले. सरकारचे धाबे दणाणले. अन्नपाणी वर्ज्य करून नऊ दिवस लोटले होते. शेवटी ५ डिसेंबर १९४० रोजी सरकारने गंभीर परिस्थिती ओळखून सुभाषबाबूंची तुरुंगातून सुटका केली. घरी जाण्यास परवानगी दिली पण घराबाहेर पडण्यास मात्र सक्त मनाई केली! घराभोवती सक्त पहारा ठेवण्यात आला. ६२ गुप्त पोलीसांची खास नेमणूक करण्यात आली. सुभाषबाबूंना कोण भेटायला येते, कोण बाहेर जाते येते याची रोज नोंद घेण्यात येई. सुभाषबाबू तुरुंगातून सुटले खरे पण स्वतःच्या घरातच अडकून पडले! घरच तुरुंग झाला!

कोणतेही साहस करण्यापूर्वी प्रथम तुरुंगातून सुटका करून घेणे आवश्यक होते. सहजासहजी कोणत्याही इतर उपायांनीही सुटका होणे शक्य नव्हते म्हणून अन्न सत्याग्रहाचा जालीम उपाय अंमलात आणावा लागला. हा गनिमी कावा होता. सुभाषबाबूंच्या तुरुंगातून झालेल्या सुटकेमुळे हा हेतू अंशतः सिद्ध झाला! अन्नत्याग असा फलदायी ठरला! सुभाषबाबूंच्या पुढच्या बेताची सरकारलाच काय पण जनतेला, घरच्या मंडळींनाही कोणत्याही तऱ्हेची कल्पना नव्हती. पण सुभाषबाबूंच्या हृदयात प्रचंड खळबळ चालली होती. बेत आखले जात होते; ते अत्यंत गुप्त ठेवणे अत्यावश्यक होते. गुप्त पोलिसांचे कडे भोवताली असताना काही दिवसांनी जे रामायण घडले त्याची हकीगत रोमांचकारी व चमत्कृतीजन्य आहे. क्रांतिकारकांच्या इतिहासात तिला अढळ स्थान मिळाले!

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क. 1224 दिनांक .....
विषय 8212 क्र. 8.21

सिंह निसटला !

तुरुंगातून मुक्तता तर झाली. आता पुढे काय ? वीर सावरकरांचे अचूक आणि अत्यंत आणीबाणीच्या वेळी मार्गदर्शन लाभले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी हरप्रयत्नाने युक्तीप्रयुक्तीने औरंगजेबाच्या नजरकैदेतून सुटका करून घेतली होती. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंतांनी एडनच्या तुरुंगातून सुटका करून घेण्यासाठी अचाट साहस केले होते. "साहसे श्री प्रतिवसति !" धाडस केल्याशिवाय ध्येय साध्य कसे होणार ? आता परिस्थिती वेगळी, मार्ग निराळे, साधनेही नवी. नव्या काळास अनुसरून वागणे आवश्यक होते. या अशा विचारांचे थैमान सुरू होते.

५ डिसेंबर १९४० रोजी तुरुंगातून मुक्तता होताच काही घोरण ठेवून, अत्यंत गुप्तता राखून सुभाषबाबूनी आपण आजारी असल्याचे जाहीर केले. सरकारची दिशाभूल व्हावी, गुप्तहेरांचा ससेमिरा कमी व्हावा यासाठी आपण आता राजकारणाचा संन्यास घेतल्याचे वृत्त प्रसृत केले. बाहेरून येणाऱ्या जाणाऱ्यांच्या गाठीभेटी घेण्याचे बंद केले. आपली खोली बंद करून घेतली. आत कोणासही जाण्यास परवानगी नसे. एका दाराच्या फटीतून त्यांना अन्नाची थाळी देण्यात येत असे. ठराविक वेळी ही थाळी परत पाठवली जात असे. काही दिवसानंतर 'आपण आता साधनेसाठी हिमालयात जाणार आहो' अशी हूल उठवली. मौन धारण केले. दाढी वाढविली. दूध व फलहार एवढाच सात्त्विक आहार घेण्यास सुरवात केली.

इकडे सरकारी यंत्रणाही कच्ची नव्हती. सुभाषबाबूंचा हा पवित्रा सरकारने ओळखला होता. मागे असेच १९१० साली श्री. अरविंदबाबू कलकत्त्याहून चंद्रनगर–पांडिचेरी येथे एकाएकी न कळत निघून गेले होते; राजकारणाचा संन्यास घेतला होता. सरकारी शासनाने हा गनिमी कावा ओळखून सुभाष-

बाबूंच्यावरील पहारा कडक करण्यात आला होता. घरातील माणसेही कोण केव्हा बाहेर जातात येतात यावरही सक्तनजर ठेवली होती. कॉलेजमध्ये शिकत असताना सुभाषबाबू असेच एकाएकी घरातून अदृश्य झाले होते. गुरूच्या शोधात ते सहा महिने परिभ्रमण करीत होते. तो काळ बालपणाचा, विद्यार्थी दशेतला, कोवळ्या मनावर झालेल्या संस्कारांचा ! पण आता विचार परिपक्व झाले होते. निश्चित झाले होते. दिशा ठरली होती. ध्येय निश्चित झाले होते. प्रसंग तर कठिणांतला कठीण–दुर्धर होता. बाहेर पडल्यावर स्वस्थ राहणे शक्य नव्हते. मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी जीव तळमळत होता. स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी आंदोलन अटळ होते. पण ते कसे, कोठे व केव्हा सुरू करायचे यासंबंधी अंतःकरणात विचारांचा कल्लोळ चालू होता. बाहेर पडल्यावर पुन्हा अटक होणार हे अटळ होते.

५ डिसेंबर १९४१ ते १६ जानेवारी १९४१ दीड महिन्यात सुभाषचंद्रांचा बेत पक्का झाला. १६ जानेवारीस आपण आता पूर्णपणे चिंतनात मग्न आहो असे त्यांनी जाहीर केले. बंद खोलीत व्याघ्राजिनावर बसून गीता व चंडी पाठ सुरू झाला. इतर धर्मग्रंथांचेही वाचन व पारायण त्यांनी सुरू केले. ते संन्यस्त रीतीने वागत. रोजच्या ठराविक वेळी त्यांना बाहेरून फळफळावळ, दूध एका थाळीत घालून देण्यात येई. दूध बाटलीतून देत.

बाहेर कलकत्त्यात व सर्व देशभर सुभाषबाबूंचा हा अज्ञातवास जनतेला समजल्याबरोबर जिकडे तिकडे कुतुहल उत्पन्न झाले. सरकारी गुप्तहेरांचे जाळे थोडे कमी झाले. पाच सहा आठवडे अशा अवस्थेत लोटले. १९४१ च्या १६ जानेवारीचा दिवस उजाडला. सकाळी नित्याप्रमाणे चाहूल घेताच खोलीशी जाणाऱ्या लोकांना आढळून आले की आदल्या दिवशी ठेवलेली थाळी–फळे-दूध पाणी जसेच्या तसेच ! थाळीला स्पर्शही केलेला दिसला नाही. लोक आत येऊन पाहतात तो काय ! सुभाषबाबू खोलीत नाहीत ! मग गेले कोठे ? कसे ? सर्व नातेवाईक घाबरून गेले. बेलूर मठ, दक्षिणेश्वर, पांडिचेरी, बनारस येथे तारा करण्यात आल्या. दुसरे दिवशी त्याच्यावरील खटल्याची सुरुवात होणार होती. सरकारी पोलीसांनी त्यांच्या घराची तीन तास झडती घेतली. पकड

वारंट काढले होतेच. सरकारच्या हातात गवसलेला पक्षी देखत देखत उडून गेला होता. सिंह पिंजऱ्यातून निसटला होता.

सरकारची गुप्त यंत्रणा फसली. सुभाषबाबू एकाएकी घरातून नाहीसे झाले हे सत्य होते! इकडे तिकडे धावाधाव शोध, झडत्या यांचे सत्र सुरू झाले!

जनतेचे लोकप्रिय तरुण नेते नाहीसे झाले होते. सर्व भारतभर अस्वस्थ व काळजीचे वातावरण पसरले. सुभाषबाबूंचे चाहते स्नेही, सहकारी, नातलग सर्वच चिंतामग्न झाले. काय झाले, कसे झाले हे सरकारला व जनतेला माहिती नसले तरी सुभाषबाबूंचे भवितव्य ठरविणाऱ्या नियतीला हे सर्व दृश्य दिसत होते. किंबहुना त्या लीलासूत्रधार परमेश्वराने काही योजना निश्चित करून पुढचे बेत ठरविले होते ते सुभाषबाबूंनी पार पाडले.

५ डिसेंबर ते १६ जानेवारी १९४१ च्या रात्रीपर्यंत सुभाबाबूंचे बेत पक्के झाले होते. महिना सव्वा महिन्यांच्या एकांतात भारताबाहेर जाण्याची योजना पक्की झाली. अफगाणिस्थानच्या मार्गे भारताबाहेर परदेशात गुप्त वेष धारण करून निसटून जाण्याचा अंतिम निर्णय रात्री ८ ला अमलात आणला तो दिवस होता १६ जाने. १९४१ चा!

१६ जानेवारी १९४१ रोजी रात्री ८ च्या सुमारास घराभोवती गुप्त पोलीसांचा पाहारा बेताबेताचा असताना मौलवीच्या वेषात सुभाषबाबू आपल्या घरातून बाहेर पडले–निसटले कायमचे–पुन्हा कधीही परत न येण्यासाठी! त्यांनी दाढी वाढविली. अचकन, सैल पायजमा, तुर्की टोपी हा वेश धारण केला. ते मोटारने कलकत्त्याहून चाळीस मैल दूर असलेल्या बर्दवान नावाच्या एका आडवळणी स्टेशनावर आले आणि रेल्वेने पुढे जाण्यासाठी पंजाब मेलने निघाले. त्यांच्या एका मित्राने त्यांच्यासाठी एक जागा राखून ठेवली होती. या वेशातही कोणी आपणास ओळखू नये म्हणून एक वृत्तपत्र तोंडासमोर धरून सुभाषबाबूंनी आपला चेहरा इतरांच्या दृष्टीआड केला. १७ जानेवारीस रात्री ९ वाजता ते पेशावरला जाऊन पोचले. सतत चोवीस तासांचा प्रवास झाला होता.

पेशावर स्टेशनावर उतरल्याबरोबर स्टेशनातून बाहेर पडताच एक मोटार सज्ज होती. त्यात बसून ते एका विश्वासू पठाण मित्राच्या घरी जाऊन उतरले. या मित्राने त्यांचे स्वागत केले. 'आम्ही पठाण तुमच्या स्वातंत्र्य संग्रामात तन

मन धनाने भाग घेऊ असे आश्वासन दिले. तिथे दोन दिवस राहून ते १९ जानेवारीला एका भगतराम नावाच्या वाटाड्याची मदत घेऊन पुढे गेले. त्यांनी भारताची सरहद्द ओलांडली. सुभाषबाबूंनी आपले नाव झियाउद्दीन पठाण व भगतरामाने रहमतखान हे नाव धारण केले आणि हे दोघे अज्ञात प्रवासी पठाण बनून पेशावराकडे जाण्यास निघाले.

सुभाषबाबूंना पुश्तू ही पठाणांची भाषा अवगत नव्हती. आपण घेतलेले सोंग उघडकीस येऊ नये म्हणून त्यांनी बहिऱ्यामुक्याचे व्रत घेतले. आपण दोघे भाऊ भाऊ असून 'सखी-साहब' दर्ग्याच्या यात्रेसाठी जात आहोत असे भासविले.

पेशावर, जमरुद, लंडी कोटाल हा टापू ओलांडून गढी या गावापर्यंत ते मोटारने गेले. तिथे एका मशिदीत रात्र काढून पुढे गेले. जमरुदला दूध व फळफळावळाचा आहार घेतला. गावकऱ्यांनी त्यांचे प्रेमाने स्वागत करून उवेसाठी एक कांबळे दिले. गढी या गावाच्या लोकांनी त्यांचे आदरातिथ्य केले. दुसरे दिवशी या गावी एक लग्न समारंभ होता. या समारंभास त्यांनी उपस्थित रहावे म्हणून लोकांनी आग्रह केला. सुभाषबाबू समारंभास गेले आणि त्यांनी वधुवरांस शुभाशीर्वाद दिला. पुढे त्यांना निरोप देताना गावच्या पाटलाने गहिवरून जाऊन अश्रूपूर्ण नयनांनी आश्वासन दिले तो म्हणाला–

'भारतवर्षाच्या नव्या सम्राटा! स्वातंत्र्य संग्रामात आम्हाला विसरू नका. वेळप्रसंग येईल तेव्हा आम्ही सर्व गावकरी बंधू रक्ताचा शेवटचा थेंब देहात असे पर्यंत मातृभूमीच्या रक्षणासाठी आपला देह अर्पण करू. पण पारतंत्र्य सहन करणार नाही.' ...

सुभाषबाबूंच्या आगामी लढ्याला मिळालेला हा पहिला शुभशकून होता.!...

पुढील मार्ग या पेक्षा बिकट होता. पायी जाणे भाग पडले होते. १०-१२ मैल चालून गेल्यावर परिगाह हे प्रसिद्ध ठिकाण आले. तिथे त्यांनी विश्रांती घेतली. सुभाषबाबूंना हा खडतर प्रवास फार जाणवत होता. आजवर असा प्रसंग कधी आला नव्हता. पेशावरच्या मित्राने दोन बंदुकधारी पठाण सोबत दिले होते त्याच्या साहाय्याने काबूल नदीपर्यंत प्रवास झाला. काबूलनदी

ओलांडल्यावर अफगाणिस्थानची सरहद्द सुरू होते. बंदूक घेऊन प्रवेश करण्यास सक्त मनाई असल्याने बंदुकधारी मित्रांना निरोप देऊन परत पाठवावे लागले. आता बरोबर होता तो एकच सहचर 'भगतराम' – रहिमतखान म्हणून सोबत करणारा! या दोघा प्रवाशांनी काबूल नदी पखालीच्या साहाय्याने पार केली. सायंकाळची वेळ होती. थंडीचा कडाका पडला होता. वारे वाहू लागले की अंगावर शहारे येत. नदीपलीकडे थेट काबूलपर्यंत जाणारी बस सर्व्हिस होती. त्यात जागा मिळवून पुढे जाणे आवश्यक होते. हे दोघे प्रवासी जागा मिळेल का या अपेक्षेने प्रत्येक मोटारीकडे पाहात होते, पण सर्वच मोटारी भरभरून येत. शेवटी एका ट्रकमध्ये सामान ठेवलेल्या टपावर कशीबशी जागा मिळवून ते दोघे मोठ्या जिकीरीने २१ जानेवारीस काबूलला येऊन पोचले. १६ जानेवारीस रात्री सुरू झालेला प्रवास २१ जानेवारीला काबूलला येऊन पोचल्यावर संपला. खडतर प्रवासाचा पहिला टप्पा तर निर्धास्तपणे पार पडला! वाटेत त्रास होऊ नये म्हणून एका प्रतिष्ठित मुसलमान गृहस्थाकडून शिफारसपत्र मिळविले होते, 'हे दोन सज्जन मुस्लिम बंधू बंधू असून यात्रेसाठी निघाले आहेत; त्यांच्याबद्दल मी जामीन आहे' अशी शिफारस केली होती. या पत्रामुळे प्रवासात त्रास झाला नाही. काबूलपर्यंत येऊन पोहचणे हे एक दिव्य होते.

सुभाषबाबू व भगतराम काबूलला पोचले.

काबूलला ओळखीचे असे कोणीच नव्हते. उतरणार कुठं? राहणार कसं? रहिमतखान व झियाउद्दिन नावे धारण करणारे हे दोघे मित्र प्रथम एका घाणेरड्या धर्मशाळेत उतरले. या दोघांचा संशय एका पोलिसाला आला पण कशीबशी त्याची मूठ दाबून त्याचा ससेमिरा चुकविला. मुशाफिरखान्यात असताना रहिमतखानाने रशियन वकिलातीशी संधान बांधण्याचा प्रयत्न केला, पण या वकिलातीभोवती अफगाणी लष्कराचे पहारे असल्याने यश मिळाले नाही. काबूलात शोध घेता घेता वायव्य प्रांतातील श्री. उत्तमचंद नावाचे एक व्यापारी राहात असल्याची माहिती मिळाली. उत्तमचंद हे सधन असून व्यापार करीत असत. रहिमतखानाने त्यांच्याशी संधान बांधले. दोघांनाही उत्तमचंद व्यापाऱ्याकडे आश्रय मिळाला. सुभाषबाबू झियाउद्दिन हे नाव धारण करून

पुढचे बेत योजीत होते. २१ जाने. ते १८ मार्चपर्यंत ४३ दिवस त्यांचा मुक्काम काबूलला होता. ते लाला उत्तमचंद या व्यापाऱ्याकडेच राहिले होते. या मुक्कामात रशियन वकिलातीमार्फत संधान बांधण्याचे प्रयत्न फसले म्हणून इटालियन वकिलांतीमार्फत प्रयत्न सुरू झाले. इटालीचा सर्वाधिकारी बेनिटो मुसोलिनी. मागच्या वेळी सुभाषबाबू युरोपात आले असताना त्यांचा मुसोलिनीशी परिचय झाला होता. इटालियन वकिलातीमार्फत रोमशी पत्रव्यवहार सुरू झाला तेव्हा कोठे खटपटीला यश आले. होकार मिळाला. मास्कोला जाण्याचा पासपोर्ट मिळविला. त्यांना पुढे एकटेच जाणे भाग होते. त्यांनी भगतरामाला जड अंतःकरणाने निरोप दिला.

सुभाषबाबूंनी लाला उत्तमचंद यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानले. दोन जर्मन व एका इटालियन गृहस्थासह ते मोटारने निघाले व १८ मार्चला मॉस्को येथे पोचले. आपण इटालीचे नागरिक हे भासवण्यासाठी "ओरलँडो मॅझेटा" हे नाव सुभाषबाबूंनी धारण केले. मॉस्को येथील थोड्याशा मुक्कामात आपल्याला स्वातंत्र्यलढ्यासाठी काय साहाय्य मिळणे शक्य आहे याचा अंदाज त्यांनी घेतला. २७ मार्च १९४१ रोजी त्यांनी स्टॅलिनची गाठ घेतली. त्याचा फारसा उपयोग झाला नाही. राजकीय कारणासाठी आपल्याला साहाय्य देता येणार नाही असे स्टॅलिनकडून समजले. मग मॉस्को येथे राहण्यात यापुढे काही अर्थ नव्हता. मॉस्को येथे आठ दिवस मुक्काम करून २८ मार्च १९४१ रोजी ते विमानाने बर्लिनला पोचले. जर्मन सरकारने त्यांच्यासाठी एक खास विमान राखून ठेवले होते; त्यांतून ते बर्लिनला सुखरूप आले.

जर्मनीत १९३९ साली सुरू झालेल्या युद्धाच्या ज्वाळा पसरल्या होत्या. १९४१ पर्यंत दुसरे महायुद्ध जोरात पेटले होते. जर्मनीची सरशी होत होती. हिटलर या सर्वाधिकाऱ्याने आपले पवित्रे मोठ्या हिकमतीने टाकून दोस्तांचा पराभव करण्याचा, एकामागून एक विजय मिळविण्याचा सपाटा चालविला होता. सुभाषबाबूंनी बर्लिनला येताच आपले ऑफिस थाटले. मोठ्या हिकमतीने इटालियन रेडिओवरून आपला प्रचार ब्रिटिशांविरुद्ध सुरू केला.

हिटलरची गाठ घेणे अत्यावश्यक होते पण युद्धाच्या धामधुमीत ही गाठ लांबणीवर पडत चालली. सुभाषबाबूंना पुष्कळ दिवस थांबावे लागले. जवळ

जवळ दोन महिन्यांचा कालावधी गेल्यावर २९ मे १९४१ रोजी भेटीचा दिवस ठरला!

ही भेट गुप्तपणे घेण्यासाठी बर्लिन व हॅम्बूर्ग याच्या दरम्यान एक लढाऊ जहाज सागरावर विराजमान होते ते निवडले होते. त्या बोटीवर एकांतात ही चर्चा होणार होती. दोघे पुढारी एके ठिकाणी आले. सुभाषबाबू पुढे येताच स्वतः हिटलरने सामोरे जाऊन त्यांचे स्वागत केले. उभे राहून 'भारताचे फ्युअरर-हिज् एक्सलन्सी सुभाष बोस यांचे मी स्वागत करतो' असे वाक्य उच्चारले! हिटलरवर सुभाषबाबूंच्या व्यक्तिमत्वाचा पुष्कळच प्रभाव पडला. या मुलाखतीत सुभाषबाबूंनी आपला जर्मनीत येण्याचा हेतू अत्यंत स्पष्ट शब्दांत व्यक्त केला. ही कल्पना फार धाडसाची होती. धाडस व साहस यांचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या हिटलरने त्यांच्या या बेताला दुजोरा दिला. त्यांना सुभाषबाबूंची कल्पना फार पसंत पडली. तुमच्या ह्या सर्व प्रयत्नांना जर्मनीकडून सर्वतोपरी साहाय्य मिळत जाईल असे हिटलरने आश्वासन दिले. मुलाखत अपेक्षेपेक्षा यशस्वी ठरली.

या भेटीचा वृत्तांत हळूहळू बाहेर आला. जर्मन वृत्तपत्रे व परराष्ट्रीय विभाग या सर्वांनी सुभाषबाबूंना 'भारताचे फ्युअरर' असे सन्मानपद दिले. फ्युअरर म्हणजे नेताजी. नेताजी हे नाव यामुळेच सर्वत्र रूढ झाले. त्यांचे संपूर्ण चरित्र वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले. चर्चेचा वृत्तांतही प्रसिद्ध झाला. ज्याच्या त्याच्या मुखी सुभाषबाबूंचे नाव गाजू लागले.

इकडे कलकत्त्यास सुभाषबाबू घरातून अचानक नाहीसे झाल्याची वार्ता १० दिवसांनंतर २६ जानेवारी १९४१ ला सरकारला व जनतेला समजली! अदृश्य होण्यापूर्वी आठ दिवस त्यांनी अन्नपाणी वर्ज्य केले होते. सरकारी वर्तुळात घबराट उत्पन्न झाली. देशाच्या कानाकोपऱ्यात शोधाशोध-तपास सुरू झाला. पण सुभाषबाबू तर देशाची सरहद्द केव्हाच ओलांडून काबूलला जाऊन पोचले होते. त्यांचे पुढचे पवित्रे व बेत आखले जात होते. भारताचे लाडके उसळत्या रक्ताचे तरुण नेते व धडाडीचे कार्यकर्ते गेले तरी कोठे? सर्वत्र चर्चा सुरू झाली. कोठेतरी अज्ञात स्थळी ते निघून गेले हे खास. कोणी काय कोणी काय वार्ता प्रसृत करू लागले. सुभाषबाबूंचा स्वभाव मूळ गूढ-

वादाकडे झुकलेला. त्यातूनच भारतदेश ही आपली माता; तिच्या स्वातंत्र्या-प्रीत्यर्थ आपले सर्व जीवन व्यतीत व्हावे अशी देशाभिमानाची ज्वलंत उर्मी हृदयात उसळलेली. मग देशविमोचनाच्या कार्यासाठी ते हिमालयात तर गेले नसतील ? कॉलेजमध्ये इंटरच्या वर्गात असताना ते असेच घर सोडून गुरूच्या शोधार्थ परिभ्रमण करीत सहा महिने अज्ञात स्थळी तीर्थक्षेत्री हिंडत होते. सुभाषबाबूंच्या घरातील मंडळींनी पांडेचरी, बनारस, गया, मथुरा या ठिकाणी तारा केल्या; पण कोठेही कसलाच पत्ता लागला नाही. देशातील जनता काळजी करू लागली. काँग्रेसच्या गोटात असेच भीतीचे वातावरण पसरले. स्वतः महात्मा गांधीजींनी शरच्चंद्र बोस या सुभाषबाबूंच्या बंधूंना तार करून खरी वस्तुस्थिती काय आहे याची विचारणा केली. पण शरच्चंद्रांना तरी नक्की माहिती कुठे होती ?' मीही त्यांच्या शोधात आहे ' एवढेच मोघम उत्तर त्यांनी तारेने महात्मा गांधींना पाठविले.

सर्व देश चिंताग्रस्त झाला. आता पुढे काय ? सुभाषबाबू कोठे गेले असतील, काय करीत असतील ? विद्युल्लतेप्रमाणे तळपणारे तेजस्वी, धाडसी, सुभाषबाबू कोठेही जाऊन स्वस्थ राहणार नाहीत याची खात्री त्यांच्या चाहत्यांना, मित्रांना होती. विरोधी पक्षाचे लोकही याबद्दल साशंक नव्हते.

आपण कलकत्त्याहून अज्ञात स्थळी निघून गेल्यावर आपल्या देश-बांधवांची जिज्ञासा किती शिगेला पोचली असेल याची कल्पना सुभाषबाबूंना होती पण प्रकट होण्याची वेळ अजून यावयाची होती.

बर्लिनमधील कार्य

बर्लिनला पोहोचताच त्यांनी आपल्यापुढील कार्याची रूपरेषा आखली. प्रचारासाठी रेडिओसारखे दुसरे प्रभावी साधन नाही. बर्लिनमध्ये जर्मन सरकारच्या साहाय्याने त्यांनी एक नभोवाणी-केंद्र सुरू केले. हिटलरकडून मानसन्मान झाला होताच. 'हिज एक्सलन्सी सुभाषचंद्र बोस-फ्युअर ऑफ इंडिया' ही मानाची पदवी, पोषाख मिळाला. सुभाषबाबूंना हिटलरने एक सुंदर भक्कम विमानही प्रेमाने नजर केले. हा बहुमान करताना जर्मन देशबांधवांना उद्देशून हिटलर म्हणाला, 'मी केवळ आठ कोटी जनतेचा नेता आहे; पण सुभाषबाबू यांचेवर हिंदुस्थानच्या चाळीस कोटी जनतेच्या स्वातंत्र्याची जबाबदारी आहे.'

हिटलरकडून असे आश्वासन मिळाल्याने सुभाषबाबूंचे कार्य सुकर झाले. त्यांचा आनंद गगनात मावेना. त्यांची उत्साहशक्ती वाढली, पुढच्या दिव्य आणि भव्य कार्याला चालना मिळाली. सुभाषबाबूंनी जनरल गोअरिंग, जनरल रोमेल या युद्धकलानिपुण मुत्सद्यांच्या व लष्करी अधिकाऱ्यांच्या गाठी घेतल्या. चर्चा केली.

सुभाषबाबू बर्लिनला असताना सरदार भगतसिंगांचे चुलते सरदार अजितसिंग बर्लिनमध्ये क्रांतीकार्य करीत होते. त्यांचे साहाय्य घेतले. ब्रिटिशांविरुद्ध सर्व हयातभर लढा देणारे सरदार अजितसिंग म्हणजे मूर्तिमंत देशसेवा, त्याग आणि जिद्द यांचा पुतळाच होते! या वीरपुरुषाने ३४ वर्षे अगोदरपासून म्हणजे विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून धाडसाने परदेशी जाऊन 'आझाद हिंद सेना' स्थापन केली होती.

अजितसिंगांच्या सूचनेप्रमाणे त्यांनी हर हिटलर यांची तर गाठ घेतली होतीच. आपल्या ध्येयाच्या प्रचारासाठी एक नभोवाणी केंद्र स्थापन केले,

त्यालाही जर्मनीच्या नेत्याकडून परवानगी मिळविली. या केंद्रावरून सतत चारचार तास प्रचार चाले. त्याची सर्व तयारी सुभाषबाबू स्वतः करीत.

परदेशात आझाद हिंद सेनेची स्थापना भारतीय स्वातंत्र्यसंग्रामासाठी झाली ती पहिल्याने जर्मनीत बर्लिन शहरी. १५०० हिंदी सैनिक युद्धकैदी म्हणून जर्मनीत हिटलरच्या ताब्यात होते. त्यांची मने वळविण्यात आली. जर्मनीच्या कैदेत राहून अपमानास्पद वागणूक सहन करून कुजत राहण्यापेक्षा आझाद हिंद सेनेत भरती होण्याचे त्यांनी आनंदाने मान्य केले. त्या युद्धकैद्यात हिंदू, शीख, मुसलमान सर्व धर्मांचे, सर्व पंथांचे लोक होते. या युद्धकैद्यांना आझाद हिंद सैनिक म्हणून मान मिळाल्याबरोबर ते ब्रिटिशांविरुद्ध शीर तळहातावर घेऊन लढण्यास तयार झाले. हिंदी फलटण तयार झाली.

सुभाषबाबूंनी उत्तम प्रकारे लष्करी शिक्षण मिळविले होते. त्यांनी या शिक्षणाचा उपयोग करून सेनेला सर्व प्रकारचे आधुनिक लष्करी शिक्षण दिले व ही सेना जर्मन सेनेच्या तोडीची कार्यक्षम बनविली.

एकदा जर्मन सेनेबरोबर आझाद हिंद सेनेची परेड घेण्यात आली. परेडच्या वेळी जर्मनराष्ट्राचे नेते हर हिटलर हे लष्करी पोषाखात उभे होते–त्यांच्या खांद्याला खांदा लावून लष्करी पोषाखात नेताजी सुभाषबाबू उभे होते. दोघांनी दोन्ही सेनेची सलामी–मानवंदना स्वीकारली. ते दृश्य अपूर्व होते. नेत्राचे पारणे फिटणारे होते. त्या वेळच्या कार्यक्रमांचे चित्रपट घेण्यात आले. नेताजी सुभाषबाबू वीरश्रीने भारावून जाऊन आपल्या सेनेला उद्देशून म्हणाले–

'भाइओ,...तुम मुझे खून दो–मै तुम्है आझादी दूंगा"

आपणाला हिंदुस्थानचे स्वातंत्र्य मिळवायचे आहे लढा देऊन. सर्व सेनेत चैतन्याच्या, वीरश्रीच्या लाटा उसळू लागल्या. या सेनेचे प्रधान कार्यालय जर्मनीतील ड्रेसडेन या शहरी होते. पुढे सेनेतील सैनिकांची संख्या हळूहळू वाढत गेली. प्रत्येकी बारा हजार सैनिकांची एक अशा आठ बटॅलियन्स या सैन्यात होत्या. ड्रेसडेनजवळील ॲनाबर्ग या गावी सैनिकांची छावणी उभारण्यात आली. सुभाषबाबूंचे मार्गदर्शन सतत होत होते.

जर्मन सरकारवर या आझाद हिंदी सेनेचा एवढा प्रभाव पडला की हिंदी सैनिकांना जर्मन कन्यांशी विवाह करण्याची परवानगी दिली गेली.

हिटलरकडून सहकार्य मिळत गेले तरी हाताखालचे नाझी अधिकारी सहकार्य देईनात. ते वारंवार अडथळे आणू लागले. सुभाषबाबूंच्यावर अनेक चमत्कारिक अटी लादण्यात येऊ लागल्या. सुभाषबाबूंना हे सहन होणे शक्य नव्हते. एके दिवशी प्रसंग साधून ते एका नाझी अधिकाऱ्याला म्हणाले, 'माझ्या मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी मी तळहातावर शीर घेऊन ब्रिटिश सरकारच्या कडक पहाऱ्यातून निसटून येथे आलो. माझे उद्दिष्ट साधण्यासाठी तुमच्याकडून सहकार्य मिळण्याऐवजी अडथळे येणार असतील तर तुमच्या गेस्टापोंच्या (गुप्त जर्मन पोलीस) हातांवर तुरी देऊन जाणे मला अशक्य नाही.'

या स्वाभिमानी उत्तराने ते करडे नाझी अधिकारी चपापले. मग नमते घेऊन सुभाषबाबूंच्या कार्याला त्यांनी मदत देण्यास सुरुवात केली. कालांतराने जर्मनीच्या परराष्ट्र खात्याने सुभाषबाबूंना खर्चासाठी दरमहा प्रथम ८०० पौंड मंजूर केले. पुढे ही रक्कम वाढता वाढता १२०० पौंड झाली. ३२०० पौंड रक्कम कर्ज म्हणून दिली.

२ नोव्हेंबर १९४१ रोजी परराष्ट्र कचेरीच्या कार्यालयात सुभाषबाबूंनी एक सभा घेतली. या सभेस जर्मनीतील बहुतेक सर्व हिंदी लोक उपस्थित होते. या सभेत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

'जयहिंद' ही हिंदची घोषणा ठरविण्यात आली. सुभाषबाबूंना 'नेताजी' या नावाने संबोधण्याचे ठरले. भाषा हिंदुस्थानी-लिपी रोमन 'जन गण मन' हे राष्ट्रगीत-वाद्याचे चित्र असलेला तिरंगी ध्वज हा राष्ट्रध्वज ठरविण्यात आला.

मतप्रचाराचे साधन उपलब्ध होते. नभोवाणी-केंद्र बर्लिनला पोचताच त्यांनी हिंदी बांधवांना संदेश दिला. २० एप्रिल १९४२ रोजी बर्लिन रेडिओ-वरून भाषण केले. सुभाषबाबू हे शत्रूचे हस्तक बनले असा विरोधी प्रचार सुरू होता त्याला सडेतोड उत्तर देणे अत्यावश्यक होते. सुभाषबाबू आपल्या ओजस्वी भाषणात म्हणाले,-'ब्रिटिश मतप्रचारक काहीही सांगोत.... हिंदुस्थानला फक्त एक शत्रू आहे. शंभर वर्षेपर्यंत या शत्रूने हिंदुस्थानला पिळले आहे. भारतमातेचे रक्तशोषण हा शत्रू करीत आहे. ब्रिटिश साम्राज्य-वाद हा तो शत्रू.

...ब्रिटिशी साम्राज्यशाहीचा पराभव झाला म्हणजे हिंदुस्थान स्वतंत्र होईल. आणि उलट घडले तर साम्राज्यशाहीची गुलामगिरी या देशावर कायमची राहील. म्हणून स्वतंत्र होणार की कायमची गुलामी पत्करणार हा रोकडा प्रश्न हिंदुस्थानपुढे आहे...!

ब्रिटिशांचे भाडोत्री मतप्रचारक मला शत्रूचा हस्तक म्हणत आहेत पण माझ्या देशबांधवांना उद्देशून मी बोलत असता मला कोणत्याही शिफारस-पत्राची गरज नाही. माझे सर्व जीवन हे ब्रिटिश साम्राज्यशाहीशी दीर्घकालीन सतत व बिनतडजोड असे चाललेले युद्ध आहे. प्रामाणिकपणाची हीच उत्कृष्ट हमी आहे. मरेपर्यंत मी असाच राहीन. मी जगात कोठेही असलो तरी माझी स्वामिनिष्ठा माझ्या मायभूमीसंबंधी जशी आजवर राहिली तशी यापुढेही राहील. भारतवर्ष हाच माझ्या निष्ठेचा केंद्रबिंदू असेल—'

'मात्र ब्रिटिश साम्राज्याचा नाश आता अटळ आहे. त्वरेने होणारा हा नाश कोणत्याही ऐहिक उपायाने टळणार नाही...महासागरातील सर्व स्थळे ब्रिटिशांच्या सागरी सत्तेखालून निसटली आहेत-मंडाले पडले, ब्रह्मदेशातून दोस्त राष्ट्रांच्या सैन्याची हकालपट्टी झाली.

...देशबांधवहो, ब्रिटिश साम्राज्य असे अस्तास चालले असून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा दिवस जवळ येत चालला आहे. १८५७ साली पहिले स्वातंत्र्ययुद्ध झाले. १९४२ सालच्या मे महिन्यात अखेरचे स्वातंत्र्ययुद्ध आता सुरू झाले आहे. आपल्या कमरा कसा. स्वातंत्र्याची घटका अगदी जवळ आली आहे.

आझाद हिंद! बाहेरच्यांचा हस्तक्षेप न होऊ देता हिंदुस्थानासाठी लढून स्वातंत्र्य प्राप्त करून घेऊ. भवितव्य घडविण्याचा निश्चय करून भावी हिंदुस्थानची उभारणी करू. न्याय, समता आणि बंधुभाव या त्रिकालाबाधित तत्त्वांवर आधारलेली समाजघटना स्वतंत्र भारतात निर्माण होईल...'

सिंहगर्जनेप्रमाणे नेताजींच्या मुखमंडलातून गर्जना होत होत्या. श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले.

बर्लिन रेडिओवरील हे भाषण जगातील सर्वांनी ऐकले. भारतात ज्यांनी ज्यांनी हे भाषण ऐकले त्यांनी आनंदाने टाळ्या पिटल्या. जल्लोष केला. २६ जानेवारीपासून एप्रिल १९४२ पर्यंत त्यांची काहीच वार्ता नव्हती! सुभाष-

बाबूंचे आता प्रत्यक्षच भाषण ऐकल्याने–'नेताजी जिवंत आहेत' या बातमीने काळजी दूर झाली; अत्यानंद झाला. भारतभर आनंदीआनंद झाला एवढेच नव्हे तर सुभाषबाबू परदेशात जाऊन स्वातंत्र्यलढ्याची तयारी करीत आहेत हे समजून देशबांधवांचे हृदय उत्साहाने रसरसू लागले. नेताजी सुभाषबाबू बर्लिनमध्ये १७ मार्च १९४१ पासून जवळ जवळ दोन वर्षे राहिले.

१९३२ ते १९३६ या काळात ते पहिल्या वेळी युरोपात आले तेव्हाच त्यांनी स्वातंत्र्यलढ्याची भूमिका समजावून दिली. ब्रिटिश राजवटीविरुद्ध रणशिंग फुंकले तर कोणकोणती राष्ट्रे साहाय्य देतील याचा आढावा घेतला होता. बहुतेक सर्व नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या होत्या. आता १९३९ ते १९४१ या दोन वर्षांत जर्मनीमध्ये सैन्याची प्रत्यक्ष संघटना करून सेनेच्या पलटणी उभारण्याचे, प्रत्यक्ष लढ्याच्या पूर्वतयारीचे कार्य सुरू केले. आता ते यशस्वी होईल अशी सुचिन्हे दिसू लागली.

या काळातच सुभाषबाबूंच्या वैयक्तिक जीवनात एक महत्त्वपूर्ण घटना घडली. तिचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

१९३५ साली सुभाषबाबू व्हिएन्ना येथे प्रकृतीस्वास्थ्यासाठी राहिले असता त्या शहरातील एमिली शेंकेल या जर्मन तरुणीशी त्यांचा परिचय झाला होता. एमिली शेंकेल ही २५ वर्षांची एक मध्यमवर्गीय जर्मन कुटुंबातील सामान्य पण हुषार तरुणी. उपचार चालू असताना सुभाषबाबू रुग्णशय्येवर होते. पण स्वस्थ नव्हते. हिंदुस्थानचा लढा–" The struggle for India " हा ग्रंथ ते तयार करीत होते. हा ग्रंथ तयार करण्याचे कामी या तरुणीचे साहाय्य त्यांना हरएक प्रकारे झाले. मजकूर लिहून घेणे, टंकलिखित करणे, त्याच्या प्रती जुळविणे, मुद्रणालयाकडे पाठविणे, मुद्रिते तपासणे हे सर्व काम या तरुणीने चोखपणे आनंदाने केले. १९३५ नंतर १९४१ साली सुभाषबाबू सहा वर्षांनंतर पुन्हा जर्मनीत आले. या तरुणीची पुनर्भेट झाली. परिचयाचे रूपांतर सहवासात व सहवासाचे पर्यवसान प्रेमात झाले. एमिली शेंकेलची नेमणूक सुभाषबाबूंनी आपली कार्यवाह–पर्सनल सेक्रेटरी म्हणून केली. आपल्या कार्याशी समरस होणारी सहचरी लाभली असे सुभाषबाबूंना वाटले. १९४१ च्या डिसेंबर महिन्यात सुभाषबाबू विवाहबद्ध झाले. एमिली शेंकेल ही

सौ. सुभाषचंद्र बोस झाली. या विवाहाचे वृत्त मात्र पुढे तीन-चार वर्षे गुप्त राहिले.

२९ नोव्हेंबर १९४२ ला या दांपत्याला एक कन्या रत्न झाले. तिचे नाव अनिता असे ठेवण्यात आले. जेमतेम एक वर्षाचे वैवाहिक जीवन सुभाषबाबूंना लाभले असेल नसेल ! सुभाषबाबू ज्या देशविमोचनाच्या कार्यात मग्न झाले होते त्यात एका क्षणाचीही फुरसत त्यांना मिळत नसे. प्रत्येक दिवस हा काहीतरी कार्यक्रमाच्या आखणीत गुंतलेला असे.

त्यांची लाडकी अनिता, त्यांच्या संसारवेलीवरले हे वहिले पहिले नाजूक फूल कोठे उमलते न उमलते तोच सुभाषबाबूंना बर्लिनहून प्रयाण करावे लागले. अनिता बालिका त्यावेळी केवळ २७ दिवसांची होती. पत्नीची व मुलीची व्यवस्था योजून सुभाषबाबूंनी आपले बंधू शरच्चंद्र बोस यांना पत्राने कळविली. हे पत्र आपल्या पत्नीच्या बंधूंच्या हवाली करण्यासाठी स्वाधीन केले. पत्नीचे सांत्वन केले. अत्यंत भारावलेल्या हृदयाने त्यांनी उद्‌गार काढले—

'प्रिय एमिली, आपण दोघांनी एकमेकांवर प्रेम केलं यात आनंद मानावा. वियोगाबद्दल दुःख करू नये. तू मला सतत हवीस; अंतःकरणापासून हवीस. याजन्मी नाही तर पुढील जन्मी मी पुन्हा तुझ्याकडे येईन, पण येईन हे निश्चित. वायुलहरींना मी हे नित्य सांगत असतो' शेवटी ते म्हणाले, 'मी आता दुसऱ्या प्रेमाकडे चाललो. तिथून कदाचित परत येणार नाही...!' कौटुंबिक पाशावर देशप्रेमाने विजय मिळविला !!

आणि झालेही तसेच. भवितव्यता भीषण ठरली. सुभाषबाबू पुढे बर्लिनहून टोकियोला गेले. जपान, मलाया, सिंगापूर या सर्व ठिकाणी आझाद हिंद सेना भारताच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी सिद्ध झाली. त्याचे नेतृत्व सर्वस्वी सुभाषबाबूंनी स्वीकारले. प्रत्यक्ष युद्धास सुरुवात झाली. लढे दिले. जय मिळविले. आता पुढचे पवित्रे ठरविण्याची वेळ येताच नियतीचे फासे उलटे पडले. १८ ऑगस्ट १९४५ रोजी विमानअपघातात सुभाषबाबू होरपळून निधन पावल्याची दुःखद वार्ता कानी पडताच एमिली शैंकल विकल झाली. सुभाषबाबू जिवंत आहेत, ते पुन्हा मला व कन्येला भेटल्याशिवाय राहणार नाहीत या आशेत तिने

आतापर्यंत दिवस काढले. आता मात्र ती निराश झाली आहे. मुलीचे शिक्षण चालू आहे. तिच्या नावाने सुभाषबाबूंनी आपली काही इस्टेट ठेवली आहे.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर या वीर पत्नीला व तिच्या लाडक्या मुलीला–अनीताला–भारताने गौरवाने व सन्मानाने बोलविले पण तिने नकार दिला. तिला आशा वाटे, 'आपले प्रिय पती यश मिळवून परत येतील भेटतील –आपले पुनर्मीलन होईल. आपल्या लाडक्या अनीताला घेऊन पतीसमवेत भारतात पदार्पण करण्यात भूषण आहे' – पण तिची ही आशा दुरावली– मावळली–करपली. व्यथित हृदयाने ती कशी येणार?

भारतातील अनेक पुढाऱ्यांनी, भारतातर्फे बोस कुटुंबातील मंडळींनी तिला अनेक वेळा आग्रह करून बोलाविले. मुलीच्या शिक्षणासाठी व एमिलीच्या उदरनिर्वाहासाठी सोय केली. तिने कोठेही राहावे. अनीताचे शिक्षण पुरे झाले आहे...माता आणि कन्या बोस कुटुंबात कलकत्त्यास आली आहेत अशी वार्ता कानी आली आहे. कालाय तस्मै नमः!...

आशियाकडे – बर्लिन-टोकियो युद्धाची पार्श्वभूमी व परिस्थिती

नेताजी सुभाषबाबू बर्लिनला पोहोचण्यापूर्वी दुसरे महायुद्ध पूर्व आशियामध्ये भडकले होते. युद्धाच्या ज्वाळा पसरल्या होत्या. जपानची सरशी होत होती. अवघ्या सहा महिन्यांत जपानने जावा, मलाया, सिंगापूर ब्रह्मदेशापर्यंतचा सर्व प्रदेश जिंकून हिंदुस्थानच्या पूर्व सरहद्दीवर धडका मारण्यास सुरुवात केली होती. जर्मनी व जपान या दोन्ही प्रबळ राष्ट्रांनी दोस्त राष्ट्रांचा पिच्छा पुरविला

होता. जर्मनीचे सर्वाधिकारी हर हिटलर, जपानचे टोजो यांनी अनुक्रमे युरोप व पूर्व आशियात एकामागून एक जय मिळविले होते.

७ डिसेंबर १९४१ रोजी जपानने युद्धात भाग घेऊन पर्ल हार्बर, मलाया, डच ईस्ट इंडिज या प्रदेशावर आक्रमण केले. अमेरिका, ब्रिटन, चीन व डच सरकार या सर्वांची संयुक्त आघाडी तोंड देत होती. ही आघाडी अभेद्य आहे या भ्रमात ही दोस्त राष्ट्रे असतानाच १५ फेब्रुवारी १९४२ रोजी ब्रिटिशांचे सिंगापूर जपानच्या हाती पडले. सिंगापूरला ब्रिटिशांच्या सेनेत पंधरा हजार ब्रिटिश, तेरा हजार ऑस्ट्रेलियन व बत्तीस हजार भारतीय सेना होती ती सर्व जपानच्या ताब्यात बंदीवान म्हणून आली. मलायाही हस्तगत केले. मलायातील तीन लक्ष भारतीय प्रजाजन जपानच्या अंकित झाले.

जपानमध्ये या काळात दुसरे एक ज्वलंत क्रांतिकारक भारताच्या स्वातंत्र्यासाठी झटत होते. त्यांचे नाव रासबिहारी बसू. ज्याप्रमाणे जर्मनीमध्ये सरदार अजितसिंग ब्रिटिशांविरुद्ध भारताच्या स्वातंत्र्यासाठी कार्य करीत होते. त्याचप्रमाणे स्वातंत्र्ययुद्धाचे महान सेनापती रासबिहारी बसू जपानमध्ये कार्य करीत होते. दोस्त राष्ट्रांचा सतत होत चाललेला पराभव, ब्रिटिशांची पीछेहाट ही एक नामी संधी होती. स्वातंत्र्ययुद्धाचे विचार उसळू लागले. १७ फेब्रुवारी १९४२ रोजी जपानचे सेनापती मेजर फ्युजिवारा यांनी सिंगापूरच्या भारतीयांना आपल्या सेनाकेंद्रात बोलावून सांगितले की ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याची ही एक नामी संधी तुम्हाला लाभत आहे. तुम्ही सर्व एकत्र या. स्वातंत्र्यसंघ स्थापन करून सेना उभारा. युद्धाची तयारी करा. जपानी राष्ट्राकडून तुम्हांला संपूर्ण साहाय्य मिळेल असे मी आश्वासन देतो. लोक एवढे धीट नव्हते. ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून सुटलो तरी जपानच्या गुलामगिरीत अडकून पडणार नाही कशावरून अशी भीती त्यांना वाटत होती. अशा वेळी या सर्व भारतीयांना एकत्र आणून त्यांच्या मनात विश्वास उत्पन्न करून युद्धाला प्रवृत्त करण्याची महान जबाबदारी रासबिहारी बसूंनी स्वीकारली. त्यांचे हे आवडते कार्य होते. याच ध्येयासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले होते. ध्येय ठरले होते. साधनांची आवश्यकता होती.

२८ मार्च ते ३० मार्च १९४२ ला रासबिहारी बसूंनी टोकियो येथे एक

संमेलन भरविले. या संमेलनास जपान, चीन, मलाया, थायलंड या देशांतील सर्व भारतीय एकत्र जमले होते. या संमेलनामध्ये भारतीय स्वातंत्र्यसंघ–इंडियन् इंडिपेंडन्स लीग–स्थापन करण्यात आला. रासबिहारी बसू एकटे पुढे सरसावले. ब्रिटिश सेनेतील भारतीय सेनाधिकाऱ्यांना आव्हान देऊन भारताच्या स्वातंत्र्याची ज्योत त्यांच्या अंतःकरणात चेतविली–'भारताबद्दल प्रेम व निष्ठा बाळगा. आपण सर्वजण मिळून एकजुटीने लढा देऊ. भारत स्वतंत्र करू.' या तेजस्वी भाषणाने भारतीयांची मने थरारली; त्यांनी भराभर ब्रिटिशसेनेतून अंग काढून घेतले व ते या राष्ट्रीय सेनेला मिळाले. त्याच वेळी ५०,००० सेना उभारली गेली. भारताचे पूर्ण स्वातंत्र्य हे संघाचे ध्येय घोषित करण्यात आले. आझाद हिंद सेनेची स्थापना झाली.

१४ जून ते २३ जून १९४२ बँकॉक येथे दुसरे एक प्रचंड संमेलन भरविण्यात आले. त्यास जावा, सुमात्रा, इंडोचायना, बोर्नीओ, मांचुको, हाँगकाँग ब्रह्मदेश, मलाया, जपान या ठिकाणाहून तीन लाख लोक एकत्र आले. टोकियो संमेलनाप्रमाणे या सभेतही स्वातंत्र्यप्राप्तीचे ठराव स्वीकारण्यात आले. आझाद हिंद सेनेचा उपयोग ब्रिटिश सत्तेविरुद्ध भारताला पूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या उद्देशाने ध्येयानेच केला जाईल हे जाहीर झाले. संघाच्या युद्धपरिषदेत पाच पदाधिकारी नेमण्यात आले त्यांत रासबिहारी बसू हे पहिले सभापती होते.

इकडे जर्मनीमध्ये याच पद्धतीवर सुभाषबाबूंनी प्रयत्न चालविले होते. पण जर्मनी हे फार दूरवरचे राष्ट्र. या ठिकाणाहून लढा देणे अत्यंत कठीण होते. रासबिहारी बसू यांच्या परिषदेने एक ठराव केला व आशियात हिंदी स्वातंत्र्य सैन्याचे नेतृत्व सुभाषबाबूंनी करावे अशी आग्रहाची विनंती सुभाषबाबूंना केली. सुभाषबाबूंना बोलाविण्यात आले.

सुभाषबाबू या संधीची वाट पाहात होते. रासबिहारी बोस यांनी चालविलेल्या प्रयत्नांची संपूर्ण माहिती त्यांना होती. आपले कार्य जर्मनीपेक्षा जपानमध्ये सुकर होईल याची खात्री पटल्याने सुभाषबाबूंनी हे निमंत्रण स्वीकारले. कोणत्याही उपायाने का होईना भारताबाहेर परदेशात सैन्याची जमवाजमव करून स्वातंत्र्याचा लढा देणे आवश्यक होते. ती संधी आता चालून आली

होती. ब्रह्मदेश-जपानचा विस्तृत तळ लढ्यास सोयीचा होता. परिस्थितीही अनुकूल, जमून आली होती.

सुभाषबाबूंनी परिषदेचे निमंत्रण तर स्वीकारले. आता जपानमध्ये जाणे आवश्यक होते; पण आशियात जायचे कसे हा बिकट प्रश्न होता. सागरी परिसर तर ब्रिटिश-अमेरिकन आरमारांनी व्यापलेला. बोटीतून प्रवास करणे धोक्याचे, जिवावर बेतणारे. विमानाने हा प्रवास निर्विघ्नपणे करणे कठीण. शत्रू पक्षाकडील लढाऊ विमाने केव्हा हल्ला करतील याचा नेम नव्हता. काहीतरी धोक्याचा मार्ग स्वीकारणे जरूर होते. सुभाषबाबू कोणत्याही अडचणींना जुमानणारे नव्हते. त्यांची साहसी वृत्ती या प्रसंगी उफाळून आली.

या प्रवासासाठी त्यांनी जपान व जर्मनी या राष्ट्राचे सहकार्य मिळविले. एका पाणबोटीतून जलप्रवास करण्याचे योजिले. हा प्रवास अत्यंत गुप्तपणे करणे आवश्यक होते. निदान तीन महिन्यांचा अवधी लागणार होता. सुभाषबाबू हसन नावाच्या एका हुजऱ्याला बरोबर घेऊन १९४३ च्या एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात बर्लिनहून पाणबोटीने निघाले. मार्गात अटलांटिक महासागरातून प्रवास होता. जीवघेणे अनेक प्रसंग येऊन जात होते. एकदा तर त्यांची पाणबुडी वाट चुकून क्षणभर समुद्राच्या पृष्ठभागावर आली. शत्रूंनी ती हेरली व नेम धरून बंदुकीने गोळ्या झाडणार पण तोच पाणबुडी खोल सागरतळाशी शिरली. मोठ्या शर्थीने सुभाषबाबू बचावले! मृत्यूशी प्रत्येक दिवशी प्रत्येक क्षणी सामना देत देत सुमात्रा, पेनांगमार्गे तीन महिन्यानंतर ते २० जून १९४३ रोजी टोकियोला येऊन पोचले!

टोकियोत पदार्पण केल्यावर सुभाषबाबूंचे अभूतपूर्व प्रचंड स्वागत झाले. हिंदी बांधवांचा उत्साह दुणावला. आपल्या आकांक्षा पूर्ण करील असा नेता आपणांस लाभला याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. उगवत्या सूर्याच्या जपानभूमीवर स्वतंत्रतेच्या प्रकाशाचे दान भारतीयांना देणारा सूर्यच उदयाचलावर आलेला होता!

आझाद हिंद सेनेचे नेते

सुभाषबाबू २० जून १९४३ रोजी टोकियोस येताच त्यांनी रेडिओवरून एक महत्त्वाचे निवेदन केले. आपल्या निवेदनात ते म्हणाले,

"आत्ताचा क्षण आणिबाणीचा आहे. प्रसंगी आम्ही भारतीय, स्वातंत्र्यासाठी लढणार आहोत. तलवारीला उत्तर तलवार उपसूनच दिलं पाहिजे. हिंदी जनतेच्या दृष्टीने स्वातंत्र्याची ही सुप्रभात होय. अशी महायुद्धासारखी संधी शंभर वर्षांतही येण्याचा संभव नाही."

"ब्रिटिश साम्राज्यशाहीचा आमच्यावर काही परिणाम झाला असेल तर तो एवढाच की आमचा नैतिक अधःपात झाला; सांस्कृतिक नाश ओढवला; आर्थिक दारिद्र्य आणि राजकीय गुलामगिरीत आम्हांला पिचत पडावे लागले. आमच्या रक्ताची किंमत देऊन स्वातंत्र्य संपादन करणे हे आमचे आता कर्तव्य. ज्या वेळी हिंदी लोकांवर या अग्निदिव्याचे संस्कार फार मोठ्या प्रमाणावर होतील त्यावेळीच स्वातंत्र्य मिळविण्याची पात्रता त्यांच्या अंगी येईल.

२१ जून १९४३ रोजी सुभाषबाबूंनी टोकियो नभोवाणीवरून पहिले जाहीर भाषण केले. त्यात ते म्हणतात—

'ब्रिटिशांकडून साम्राज्यविलयाची अपेक्षा करणे हे वेडेपणाचे आहे. हिंदुस्थानात आणि हिंदुस्थानाबाहेरून परदेशांतून–आपण सर्व सामर्थ्यानिशी नेटाने लढा दिला पाहिजे. त्यातूनच स्वतंत्र भारताची निर्मिती होईल.'

'आपले राज्य यावच्चंद्र दिवाकरौ अबाधित राहील. अशी भ्रामक कल्पना ब्रिटिश साम्राज्यशाही बाळगून आहे. पण या समजुतीला जबरदस्त तडे जात आहेत. सिंगापूरचा पाडाव व ब्रह्मदेशातून त्यांची झालेली हकालपट्टी या दोन घटनांमुळे ब्रिटिशांची चांगलीच नाचक्की झाली आहे तरी आपले सार्वभौमत्व टिकावे यासाठी ब्रिटिश सरकार व इंग्रज माणूस अखेरपर्यंत प्रयत्नांची शिकस्त

करीलच! केवळ तडजोडीच्या मार्गाने ब्रिटिश मुत्सद्दी हिंदुस्थानचे स्वातंत्र्य कधीच मान्य करणार नाहीत.'

"म्हणून देशबांधवहो आणि मित्रहो! आपण स्वातंत्र्याचा लढा हिंदुस्थानच्या बाहेरून आपल्या सर्व सामर्थ्यानिशी दिला पाहिजे. ब्रिटिश साम्राज्यशाही पूर्णपणे उध्वस्त होईपर्यंत हा लढा अचल श्रद्धेने आपण चालू ठेवला पाहिजे. ब्रिटिश साम्राज्याच्या रक्षेतूनच स्वतंत्र हिंदुस्थान पुन्हा जन्माला येईल.

आता या लढ्यात माघार नाही. कचरायचे नाही. 'पुढचे पाऊल पुढेच' पडत गेले पाहिजे. विजय मिळवून आपण स्वतंत्र होईपर्यंत ही लढाई आपण पुढे चालूच ठेवली पाहिजे. 'आगे बढो' हेच आपले घोष वाक्य.

हिंदुस्थानाबाहेर हिंदी बांधवांचे संघटन करणे हाच योग्य मार्ग...घड्याळाच्या ठोक्याबरोबर मी तुमच्या बाजूने तुमच्यासह युद्धात भाग घेण्यासाठी माझ्या सबंगड्याना बरोबर घेऊन येणार!.. हिंदुस्थानात स्वातंत्र्याची प्रभात तळपणार–अगदी लवकर. स्वतंत्र भारत आपल्या तुरुंगाचे दरवाजे सतत उघडलेले पाहील, त्या दरवाजातून राजबंदी सूर्यप्रकाशात बाहेर पडतील."

नेताजी टोकीयोत आल्याची वार्ता, या प्रकट भाषणानंतर सर्वत्र पसरली. आशियातील हिंदी स्वातंत्र्य चळवळीला एक नवे तेज, नवे स्फुरण चढले. जे अशक्य वाटत असे ते प्रत्यक्ष घडून येत होते. आता नेताजी हिंदी स्वातंत्र्ययुद्धाचे नेतृत्व करून आंदोलनाची सर्व सूत्रे आपल्या हाती घेणार, ब्रिटिश राजसत्तेला आणि सेनेला भारताच्या पूर्वेकडील सीमेवरून धडका मारणार या आशेने हिंदी बांधवांना उत्साहाचे भरते आले. पारतंत्र्य विमोचनाचा क्षण जवळ आला होता, त्याकडे सर्वांचे लक्ष लागले.

टोकीयोत आल्यावर प्रथम सुभाषबाबूंनी जपानचे प्रधानमंत्री जनरल टोजो यांची भेट घेतली. प्रथम भेटीतच टोजोनी त्यांना स्पष्ट सांगितले की 'आम्ही हिंदुस्थानवर स्वारी करून ब्रिटिशांना हाकलून दिल्यानंतर युद्ध संपेपर्यंत हिंदुस्थानने आमच्या बाजूने उभे राहिले पाहिजे. आमची ही अपेक्षा केवळ युद्धकाळापुरतीच मर्यादित आहे. युद्ध संपल्यावर हिंदुस्थान अर्थातच पूर्णपणे स्वतंत्र होईल. आपले भवितव्य ठरविण्यासाठी आम्ही शक्य ती सर्व मदत आपल्याला देऊ.'

सुभाषबाबूंनी जपानकडून स्वातंत्र्य सैनिकांना कसकशी मदत लागेल याची कल्पना जनरल टोजो यांना दिली.

सुभाषबाबूंनी रासबिहारी बसूंची भेट घेतली. रासबिहारींनी चालविलेल्या इंडियन इंडिपेंडन्स लीगची, आझाद हिंद सेनेची त्यांना प्रत्यक्ष हिंडून माहिती दिली.

पूर्व नियोजनाप्रमाणे, रासबिहारींनी आपल्या स्वातंत्र्य संघाची व स्वातंत्र्य सेनेची सूत्रे सुभाषबाबूंच्या हवाली केली. या पुढे खऱ्या अर्थाने 'नेताजी' या गौरवपूर्ण पदवीने गौरवले जाऊ लागले. सर्वांगीण नेतृत्व हाती आल्यावर सुभाषबाबूंनी प्रचार, संघटना, सभा दौरे, बैठकी भाषणे, लष्करी संचलने या सर्व प्रकारे अक्षरशः रान उठविले.

सुभाषबाबू २ जुलै १९४३ ला सिंगापूरला पोचले. मलायातील हिंदी बांधव, चिनी जपानी लोक लक्षावधीने सुभाषबाबूंच्या स्वागतार्थ एकत्र जमले होते. सुभाषबाबूंचे अंतःकरण गहिवरले. त्या प्रसंगी भाषण करताना ते म्हणाले–

'मित्र हो! चलो दिल्ली ही तुमची घोषणा असू द्या. आमचे युद्ध प्रत्येक प्रकारच्या साम्राज्यवादाशी आहे मग तो इंग्रजी साम्राज्यवाद असो अथवा जपानी असो. पंचम स्तंभीयापासून मात्र आपण निश्चितपणे सावध राहिले पाहिजे.

'अंधारात आणि प्रकाशात, दुःखात आणि आनंदात, हाल अपेष्टात आणि विजयोत्सवात मी तुमच्या बरोबरीनेच राहीन. सध्या मात्र मी तुम्हांला तहान, भूक, कष्ट, यातना, प्रवास, मृत्यू यावाचून काहीच देऊ शकत नाही. आपल्यापैकी कोण जिवंत राहतो, कोण मरतो यात विशेष नाही. आपण सर्व-स्वाचा होम करू–हिंदुस्थान स्वतंत्र होईल–त्यातच तुम्हाला सर्व काही मिळेल.'

–सुभाषबाबूंच्या वक्तृत्वाचा ओघ गंगौघाप्रमाणे चालू होता. त्यांची उंच शरीर यष्टी ताठ होती–चेहरा उमदा, रुंद कपाळ त्यावर मोहक हास्य, दुर्दम्य आशा महत्त्वाकांक्षेचा करारीपणा दिसत होता. त्याचे दर्शन घडताच, वक्तृत्व ऐकताच जनतेची मने उल्हसित झाली. 'हा आमचा नेता त्याचे आम्ही अनुयायी. आमचे ध्येय आम्ही गाठू.' असा विश्वास जनतेमध्ये उत्पन्न झाला.

श्रोत्यांची मते व अंत:करण त्यांनी जिंकले. सुभाषबाबूंचे दर्शन घेण्यासाठी प्रत्येक जण धडपडत होता. त्यांच्या व्यक्तिमत्वाने सर्वजण भारून गेले. जणू कोणी जादुगारच!

सुभाषबाबू संघटनाकुशल नेते होते. जपानी राष्ट्राकडून मदत घेताना आपण फसले जाणार नाही याविषयी ते दक्ष असत. त्यांच्याचपैकी एका सेनाधिकाऱ्याने जपानवर सर्वस्वी विश्वास टाकणे धोक्याचे आहे असा इशारा दिला. त्यावेळी सुभाषबाबू म्हणाले, 'निदान फसला जावू नये इतपत माझी बुद्धी जागरूक आहे यावर तुमचा विश्वास आहे ना?...आपण सर्वोवरच पाळत ठेवली पाहिजे. आपण काही कर्तवगारी दाखवू शकलो तरच जपानी सरकारचा आपणावर विश्वास बसेल.'

सुभाषबाबू हिंदी फौजेच्या पुढाऱ्यांना वारंवार भेटत. भोवतालच्या परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण करून साद्यंत माहिती घेत. नकाशे तयार करून अचूक जागा ठरवीत. आधुनिक शस्त्रसामग्री, युद्धतंत्र याची त्यांना अचूक आणि साद्यंत माहिती होती.

भेटी-गाठी, चर्चा, भाषणे, मुलाखती आता रोजच कुठे ना कुठे तरी होत राहात. वारंवार जमलेल्या लोकांना ते आपल्या कार्याची ध्येयाची व साधनांची आठवण करून देत. हिंदुस्थानच्या हितसंबंधास बाधक ठरेल, लोकमताला पसंत न पडेल, इभ्रतीला धक्का पोचेल अशी कोणतीही कृती होता कामा नये असा इशारा देत.

स्वातंत्र्याच्या या अखेरच्या लढ्यात उपासमार, तहानभूक वाटचाल मृत्यू या सर्वांना तोंड द्यावे लागेल. हा मोठा कसोटीचा क्षण आहे-या परीक्षेत आपण उतरले पाहिजे तरच दारिद्र्य आणि पारतंत्र्य यांच्या शृंखलात खितपत पडलेल्या मातृभूमीस स्वातंत्र्य आणि वैभव आपण प्राप्त करून देऊ शकू असे त्यांचे निर्वाणीचे बोल असत.

४ जुलै १९४३ रोजी पूर्व आशियातील सर्व जमातींचे सुमारे पाच हजार प्रतिनिधी जमले होते.

५ जुलै रोजी सिंगापूर टाऊन हॉलसमोर हिंदी सेनेची कवाईत घेण्यात आली नेताजींनी सलामी घेतली. सुभाषबाबूंनी उच्चरवाने भारतवर्षाला स्वातंत्र्य प्राप्त

करून देण्याची घोषणा करताच टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यांच्या विश्वासपूर्ण आश्वासनाने विरोधकांची कारस्थाने बंद पडली. भांडणे मिटली आणि सर्वजण एकाच ध्येयाने भारले गेले. तन-मन-धन अर्पण करण्यास सिद्ध झाले.

याच प्रसंगी ५ जुलै १९४३ रोजी रासबिहारी बोस यांनी स्वातंत्र्यसंघाचे अध्यक्षपद सुभाषबाबूंना अर्पण केले व आपण त्यांचे सल्लागार म्हणून राहिले. या अधिकारग्रहण प्रसंगी सुभाषबाबूंनी शपथ घेतली—

'चलो दिल्ली' ही आता आमची घोषणा आम्हापैकी जे कोणी जिवंत राहतील त्यांना ब्रिटिश साम्राज्याच्या दुसऱ्या स्मशानभूमीवर दिल्लीच्या लाल किल्ल्यापुढे विजय कवाईत करायला मिळेल. तोपर्यंत आमचे कार्य संपणार नाही–हिंदुस्थान स्वतंत्र होणारच आणि त्यासाठी आम्ही सर्वस्वाचा होम करणार. आमच्या या फौजेला ईश्वर आशीर्वाद देवो आणि आगामी युद्धात आम्हांला विजयी करो.'

६ जुलै १९४३ रोजी सिंगापूरच्या टाऊन हॉलच्या समोरील प्रचंड मैदानावर सैनिकांची सलामी घेण्यात आली. जपानचा मुख्य प्रधान जनरल टोजो हा समवेत होता. दोघाही महान पुढाऱ्यांनी खांद्याला खांदा लावून हिंदी आझाद सैन्याने दिलेली सलामी स्वीकारली. स्वातंत्र्य-सैन्याची पाहणी केली. तो देखावा भव्य होता. सैनिकांच्या चेहऱ्यावर स्वाभिमानाचे, शौर्याचे, वीरश्रीचे तेज चमकत होते. वाघाचे चिन्ह मध्यभागी असलेले हिंदुस्थानचे राष्ट्रीय निशाण खांद्यावर उंचावर फडकत होते!

९ जुलै १९४३ रोजी पेडँग येथे एक भव्य मेळावा भरविला होता. नेताजींचे भाषण ऐकण्यास एक लाखाहून अधिक लोक आले होते. नेताजींचे दर्शन होताच श्रोतृवर्गात चैतन्याचे वारे संचरू लागले. नेताजी म्हणजे मुक्तीदाते देवदूतच भासत होते. त्याप्रसंगी भाषण करताना ते म्हणाले–

"१९२१ साली विद्यापीठ सोडल्यापासून मी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेत आहे. गेल्या वीस वर्षात निःशस्त्र सत्याग्रहाच्या सर्व मोहिमांत मी होतो....आम्हांला परदेशात सैन्य जमवून क्रांती घडवून आणायची आहे...हिंदुस्थानातील व हिंदुस्थानाबाहेरील हिंदी लोक आपले कर्तव्य पार पाडतील तर ब्रिटिश सत्तेला हाकलून देऊ. तीस लक्ष हिंदी लोकांची घोषणा

'अखंड युद्धासाठी अखंड संघटना' ही असली पाहिजे. या संघटनेतून तीन तीन लक्ष सैनिक व तीन कोटी डॉलर फंड मिळेल अशी अपेक्षा करतो. तसेच १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धात झाशीच्या शूर राणीने-राणी लक्ष्मीबाईने तरवार हाती धरली व शत्रूला सामना दिला त्याप्रमाणे मृत्यूला आव्हान देऊन, तरवार गाजविणाऱ्या हिंदी स्त्रियांची एक पलटण तयार व्हावी अशी माझी इच्छा आहे.

स्वातंत्र्यासाठी परदेशात तयार होत असलेली ही दुसरी आघाडी."

...नेताजींचे हे भाषण चालू असताना पाऊस पडू लागला. पावसाच्या सरीच्या सरी कोसळू लागून मुसळधार पाऊस सुरू झाला. श्रोतृवर्गात एकदम गडबड उडाली. नेताजींनी मोठ्याने गर्जना करून एकच वाक्य उच्चारले– "उठू नका; कोणीही सभा सोडू नका; निर्धाराने बसून राहा. पाऊस आपल्याला भेडसावू शकत नाही."—श्रोतृसमुदाय स्तब्ध झाला सर्वजण भिजून ओलेचिंब झाले. कडेवर मुले घेतलेल्या लेकुरवाळ्या स्त्रियाही तशाच बसून राहिल्या! जनतेचा संयम पाहून नेताजी आश्चर्यचकित झाले. त्यावेळी एका स्वयंसेवकाने त्यांना रेनकोट देऊ केला; पण तो त्यांनी स्वीकारला नाही. लोकांच्याही अंगी सोशिकता आणि विलक्षण धैर्य आले होते! धैर्याचा मूर्तिमंत पुतळाच त्यांच्यासमोर उभा होता. नेताजींच्या सेनेला नैतिक बळ होते!! मागच्या अशाच एका भाषणाचे वेळी त्यांच्या पायधुळीचे वंदन घेण्याची अहमहमिका लागली होती.

कवाईत संपल्यावर सिंगापूरला असताना एक वृद्ध महिला नेताजींचे दर्शन घेण्यासाठी जवळ आली आणि खाली वाकून पदस्पर्श करण्याचा प्रयत्न करू लागली. नेताजींचे लक्ष तिचेकडे जाताच त्यांनी त्या वृद्ध महिलेला वर उठविले आणि तिचेपुढे मान लववून विनंती केली, 'माताजी, मला आशीर्वाद द्या–' त्यांच्या नेत्रांत अश्रू तरळले. त्याच अवस्थेत जनतेकडे दृष्टी फेकून ते म्हणाले– 'कलकत्त्यास आमच्या मागे अशीच आमची एक मोठी प्रेमळ आजीवी आई आहे तिची मला आठवण येते–ही माता म्हणजे हिंद माता– भारतमाता!' त्यावेळेस त्यांना आपल्या प्रेमळ जन्मदात्या मातेचीही आठवण झाली असावी!

१२ जुलै १९४३ रोजी इंडियन इंडिपेंडन्स लीगच्या स्त्री शाखेने स्त्रियांची एक सभा भरविली. या सभेपुढे नेताजींनी ओजस्वी भाषण केले–भाषणापूर्वी–नेताजींना पुष्पहार अर्पण करण्यात आले. क्रांतीगीतांचे गायन झाले. जमलेल्या स्त्रियांनी रेडक्रॉस आणि झाशीची राणी पलटण उभारण्याची मागणी केली. त्यावेळी एका गुजराती महिलेने आपल्या अंगावरचे सर्वच्या सर्व दागिने विलवर, अंगठ्या, हार स्त्री संघटनेच्या कार्यासाठी नेताजींना अर्पण केले. त्या प्रसंगी नेताजी भारावून जाऊन म्हणाले–

'भगिनींनो, आमच्या स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांनी फार मोठा भाग घेतला आहे. गुप्त क्रांतिकारकांच्या चळवळींतही त्या मागे नाहीत. प्रत्येक घडाडीच्या देशकार्यात स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने आपला भार उचलला आहे, आनंदाने आणि शौर्याने, तुरुंगवास लाठीहल्ला, उपासमार सोसून!

...१८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात झाशीच्या शूर राणीने केवढे शौर्य गाजविले! या राणीने तरवार उपसून घोड्यावर स्वार होऊन, अनुयायांचे नेतृत्व स्वीकारून, रणांगणावर मार्गदर्शन केले. दुर्दैवाने ती राणी ठार झाली. तिला अपयश आले! ते अपुरे कार्य आपल्याला पुरे करायचे आहे...या शेवटच्या युद्धात आम्हांला एक झांशीची राणी पुरणार नसून शेकडो स्त्रियांनी झांशीच्या राणीची भूमिका घेऊन बंदुका चालवून गोळ्या झाडून लढा दिला पाहिजे. तुम्ही किती गोळ्या झाडाल किंवा किती गोळ्यांचा वर्षाव अंगावर घ्याल हा महत्त्वाचा मुद्दा नाही. पण तुम्ही जे शूर उदाहरण घालून द्याल त्याचा नैतिक परिणाम विलक्षण होईल.

'शोनान आणि पेनांग येथे आम्ही स्त्रियांना लष्करी शिक्षण देण्यासाठी सैनिक शाळा काढल्या आहेत तिथे तुम्हांला शिक्षण मिळेल.'

संघाचे व सेनेचे कार्य चालविण्यासाठी एक कार्यालय स्थापन करण्यात आले. स्वातंत्र्य सैनिकांची उभारणी करण्यासाठी विविध शाखा स्थापन करण्यात आल्या. (१) आरोग्य-समाजकल्याण (२) महिला आघाडी (३) राष्ट्रीय शिक्षण व संस्कृती (४) पुरवठा व वाहतूक (५) पुनर्रचना (६) परदेशी राजकारण इत्यादी शाखांचे काम सुरूही झाले.

१३ जुलै १९४३ रोजी राणी ऑफ झाशी रेजिमेंटची स्थापना झाली. कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन या तडफदार, शूर, लष्करी शिक्षणात तरबेज झालेल्या तरुणीची प्रमुख पदी योजना झाली. बंदुकधारी सशस्त्र स्त्री सैनिकांची पलटण आली. शुश्रुषा पथक-रेडक्रॉस-स्थापन करण्यात आले. त्या प्रसंगी सुभाषबाबू म्हणाले, 'भगिनीनो! झाशी राणी रेजिमेंटची सुरवात आज होत आहे. स्त्री वर्गात नव चैतन्य निर्माण झाले आहे. आमच्या इतिहासात मैत्रेयी, अहिल्या राणी भवानी, रझिया बेगम, नूरजहान अशा शूर स्त्रिया होऊन गेल्या. सध्याच्या आणीबाणीच्या काळीही निर्माण होत आहेत.'

झाशीची राणी पथकात लष्करी शिक्षण घेतलेल्या १५६ बंदूकधारी स्त्रिया होत्या. कॅप्टन लक्ष्मी ही तरुणी विद्युल्लतेसारखी तळपत होती. तिच्या मुखमंडलावर मूर्तीमंत तेज, साहस आणि शौर्य विलसत होते. तिने महिला सैनिकांना सर्व लष्करी शिक्षण दिले. स्त्री सैनिक पुरुष सैनिकांपेक्षा कोणत्याही प्रकारे कमी प्रतीच्या नाहीत हे या पथकाने आपल्या शौर्याने व कर्तृत्वाने सिद्ध केले. दुसऱ्या पथकातील स्त्रिया शुश्रूषा करण्यात तरबेज होत्या. बॉंब वर्षावात घायाळ झालेल्या शेकडो सैनिकांची शुश्रूषा या महिलांनी केली व जवानांचे प्राण वाचविले. प्रत्यक्ष युद्धात आघाडीवर जाऊन शत्रूशी लढा देण्यातही त्या मागे राहिल्या नाहीत.

आझाद हिंद सेनेची संघटना

आझाद हिंद सेनेचे चार प्रमुख भाग होते; त्यांची नावेही साजेशी होती.

(१) सुभाष ब्रिगेड- या पलटणीत शीख, पठाण सैनिक होते. सेनेचे युद्धमंत्री कर्नल शाहनवाजखान हे कमांडर होते.

(२) गांधी ब्रिगेड- कमांडर कर्नल कमानी.

(३) आझाद ब्रिगेड- कमांडर कर्नल फुलमारा सिंह.

(४) नेहरू ब्रिगेड- कमांडर गुरुबक्ष सिंह धिल्लन याशिवाय वायुसेना दल, तोफखाना दल, इंजिनिअर कंपनी, सिग्नल कंपनी, मेडिकल कंपनी, गुरिला रेजिमेंट, सी. आय. डी. गुप्तचर विभाग, नभोवाणी केंद्र.

(१) कॅप्टन लक्ष्मी पथक- कमांडर कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन.

आझाद हिंद फौजेतील सैनिकांची संख्या पन्नास हजार होती, पंधराशे ऑफीसर होते. सदस्यांची संख्या वीस लाख होती. या सर्वांनी आझाद हिंद सरकारची आज्ञा मानून त्याप्रमाणे कार्य करण्याची प्रतिज्ञा केली होती.

२५ ऑगस्ट १९४३ रोजी सुभाषबाबूंनी आझाद हिंद सेनेचे अधिकृतपणे नेतृत्व स्वीकारले. ते म्हणाले, 'पुढील दोन महिन्यांत आझाद हिंद सेना ब्रह्मदेशाच्या वाटेवर कूच करेल व पुढे हिंदुस्थानच्या सरहद्दीत प्रवेश करील. सेनेचे ठाणेही रंगूनला जाईल.'

नेतृत्व स्वीकारल्यानंतर केलेल्या भाषणात सुभाषबाबू म्हणाले, 'आपली स्वातंत्र्याची चळवळ यशस्वी व्हावी म्हणून मी सैन्याचे अधिपत्य स्वीकारीत आहे. यापेक्षा माझा बहुमान तो कोणता! भाईओ, आमचे कार्य सुरू झालेच आहे. चलो दिल्ली हा जयघोष उच्चारीत दिल्लीच्या व्हॉईसराय गृहावर राष्ट्रीय निशाण चढेपर्यंत, लाल किल्ल्यात फौजेची कवाईत सुरू होईपर्यंत आपण लढत राहिले पाहिजे.'

सुभाषबाबूंचे लक्ष भारतातात चाललेल्या घडामोडींकडे बारकाईने होते. १५ ऑगस्ट १९४३ रोजी महात्माजींचे चिटणीस महादेवभाई देसाई यांचे आगाखान पॅलेसमध्ये निधन झाले. त्यांची आठवण हिंदी सेनेतील सैनिकांना करून देताना १५ ऑगस्टच्या सभेत ते म्हणाले, 'जॉन्सन आणि वॉस्वेल यांचे जसे संबंध तसेच महात्माजी व महादेवभाई यांचे होते. ज्यांच्या संबंधाने ब्रिटिशांवर सूड उगवायचा आहे. त्यांत महादेवभाईंच्या नावाची आता भर पडली आहे.'–या सभेस तीस हजार श्रोतृसमुदाय उपस्थित होता. आझाद हिंद झिंदाबाद या जयघोषांनी आकाश दुमदुमून गेले!

६ सप्टेंबर १९४३ रोजी सुभाषबाबू आपल्या बरोबरच्या मंडळींसह कौलालंपूर येथे गेले. प्रत्येक रेल्वे स्टेशनवर त्यांच्या दर्शनास अनेक लोक येत. थैल्या अर्पण करीत. लोकांनी आपल्या कार्याचे महत्त्व ओळखून मदत करावी पण वैयक्तिक प्रतिष्ठेस बळी पडू नये, विभूती पूजा करू नये यावर त्यांचा कटाक्ष असे. ते म्हणत—'पुढारी येतील आणि जातील, पण चळवळीचा प्रवाह सतत चालू राहिला पाहिजे.'

श्रोत्यापैकी एकाने उत्तर दिले, 'नेताजी, तुम्ही चळवळीत नवचैतन्य निर्माण केले, जनतेच्या अंतःकरणातील स्वातंत्र्यलालसा प्रज्वलित केलीत, तुम्ही त्या सर्वांचे प्रतीक आहात. जनता तुमचे स्वागत करण्यास त्यामुळेच उत्साहाने पुढे येत आहे.'

कौलालंपूरच्या सभेत सुभाषबाबूंनी आव्हान करताच पैशांच्या थैल्यांचा पाऊस पडला. थैल्या व देणग्या अर्पण करण्याचा कार्यक्रम तासभर चालला होता. द्रव्याच्या राशीच्या राशी पाहून सुभाषबाबू गहिवरले–आपल्या भाषणात ते म्हणाले—

'प्रत्येकाने जास्तीत जास्त स्वार्थत्याग करण्याची संधी आता आली आहे. सैन्य तयार करण्यासाठी आधुनिक शस्त्रास्त्रे, बंदुका, दारूगोळा खरीदण्यासाठी द्रव्यसाहाय्य, साहित्य व त्याचप्रमाणे मनुष्यबळ आम्हांला मिळाले पाहिजे... युद्ध ही ईश्वराने दिलेली एक संधी आहे...पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याची सुसंधी या युद्धाने आम्हांला दिली आहे.

या ठिकाणी आता लष्करी शिक्षण देण्याचे केंद्र स्थापन होत आहे याबद्दल तुमचे अभिनंदन. आम्ही हिंदुस्थानात जाऊ तेव्हा सैनिकांच्या बराकी आयत्या बांधलेल्या आम्हांला मिळतील. त्या बदली ब्रिटिशांना त्यांच्या उपयोगासाठी सर्व तुरुंग आम्ही परत करू.'

रंगून येथे स्वातंत्र्ययुद्धात मरण पावलेल्या हिंदुस्थानच्या शेवटच्या बादशहाची–बहादूरशहाची कबर आहे. सुभाषबाबूंचे या कबरीजवळ एक गौरवपूर्ण भाषण झाले. प्रथम सर्वांनी या कबरीवर आदराचे प्रतीक म्हणून फुले वाहिली. या प्रसंगी भाषण झाले त्यात सुभाषबाबू म्हणाले—

'बंधूंनो हिंदुस्थानच्या शेवटच्या बादशहाचे अवशेष ब्रह्मदेशात रंगूनमध्ये आणि ब्रह्मदेशाच्या शेवटच्या राजाचे–थिबा राजाचे–अवशेष हिंदुस्थानात रत्नागिरीस असावे हा दैवदुर्विलास आहे. बहादूरशहा हा बादशहा असून साधा सामान्याप्रमाणे वागत असे. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धातील तो अखेरचा योद्धा.

या थडग्यासमोर आम्ही प्रतिज्ञा जाहीर करतो–'आमच्या अखेरच्या लढ्यास सुरुवात झाली आहे. हा शेवटचा लढा स्वातंत्र्य मिळेपर्यंत दृढ निश्च-

याने आम्ही लढू. यातना, अडचणी, संकटे सर्व सोसू. ब्रह्मदेश आणि हिंदुस्थान या दोन्हींचाही शत्रू एकच.

'येथे मी स्वतः बहादूरशहाने केलेल्या कवनातील काही ओळी म्हणून दाखवितो'—ते उच्चरवाने म्हणू लागले.

'गाझियों में बू रहेगी
—जब तलक ईमानकी
तब तो लन्दन तक चलेगी
तेग हिन्दोस्तान की—'

—हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यवीरांच्या अंतःकरणांत श्रद्धेचा शेवटचा कण शिल्लक असेपर्यंत हिंदुस्थानची समशेर लंडनच्या अंतःकरणात घुसत राहील!

नेताजींच्या डोळ्यांतून अश्रू पाझरू लागले. कबरस्तानापुढे गुडघे टेकून त्यांनी मान लवविली; आपली आदरांजली वाहिली. 'जय हिंद', 'इन्क्विलाब झिंदाबाद' या सिंहनादाने सारे रंगून शहर दणाणून गेले.

२ ऑक्टोबर १९४३ चा दिवस उगवला. महात्माजींचा हा ७५ वा वाढदिवस सुभाषबाबूंनी प्रचंड सभा भरवून साजरा केला. हिंदी नागरिकांच्या घराघरांवर राष्ट्रीय निशाणे फडकत होती. या प्रसंगी केलेल्या भाषणात सुभाषबाबूंनी महात्माजींच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली. सत्याग्रह, सविनय कायदेभंग यांचा महामंत्र देणारे ते देवदूतच.....गांधीजी १९२० साली पुढे आले नसते तर अजूनही हिंदुस्थान लाचार राहिला असता. त्यांची कामगिरी अपूर्व आहे. राष्ट्रीय स्वाभिमान आणि आत्मविश्वास प्रत्येकाच्या अंतःकरणात जागृत करून महात्माजींनी सर्व थरात राष्ट्रीय संघटना राष्ट्रव्यापी निर्माण केली...

आता परिस्थिती बदलली आहे. तलवार उपसणे आम्हांस शक्य आहे, आवश्यक आहे."

महात्मा गांधीजींनी सुभाषबाबूंना हरिपुरा काँग्रेसनंतर सतत विरोध केला होता पण त्याचे शल्य यत्किंचितही मनात न बाळगता सुभाषबाबूंनी त्यांचा एवढा गौरव केला! केवढा हा मनाचा उदारपणा!!

आता मनुष्यबळ व पैसा सर्व कल्पनेबाहेर गोळा होऊ लागला होता. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी सिंगापूरला कामचलाऊ राष्ट्रीय सरकार प्रस्थापित झाल्याची घोषणा करण्यात आली, मंत्रीमंडळ निवडण्यात आले. सुभाषबाबू सर्वप्रमुख पंतप्रधान होते. शिवछत्रपतींच्या अष्टप्रधानांच्या नेमणुकीचा इतिहास डोळ्यापुढे होता.

राष्ट्रपती या नात्याने सुभाषबाबूंनी प्रथम शपथ घेतली.—"ईश्वरास साक्ष ठेवून मी सुभाषचंद्र बोस अशी प्रतिज्ञा करतो की हिंदुस्थान आणि ३८ कोटी प्रजा यांना स्वतंत्र करण्याकरिता मी हे स्वातंत्र्ययुद्ध माझ्या आयुष्याच्या अखेरपर्यंत रक्ताचा शेवटचा बिंदु संपेपर्यंत चालू ठेवीन. भारत-भूचा नित्य सेवक राहून ३८ कोटी बंधुभगिनींचे हित साधणे हेच मी कर्तव्य समजेन. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावरही हिंदुस्थानचे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी शेवटपर्यंत लढेन."

शपथविधीचा प्रसंग गंभीर स्फूर्तिदायक होता. नेताजींचे अंतःकरण गहिवरले. नेत्रांतून अश्रूधारा वाहू लागल्या. बाकीच्या अधिकाऱ्यांच्या शपथा पुऱ्या झाल्या. जपानचे जनरल यामामाटो उपस्थित होते. तेही गहिवरले. या प्रतिज्ञे-खाली राष्ट्रपतींपासून सर्वांच्या सह्या होत्या.

शपथविधीनंतर जाहीरनामा वाचून दाखविण्यात आला. त्याचा आशय असा—

सुरुवतीस १८५७ सालच्या युद्धानंतर हिंदी लोकांनी चालविलेल्या लढ्याचा आढावा घेण्यात आला. आम्हांला ब्रिटिशांनी निःशस्त्र केले. दहशत दाखवून अत्याचार केले. राष्ट्रीय सभा स्थापन करून हिंदी जनतेने सनदशीर मार्गाने स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सर्व उपाय अवलंबिले. ते अपुरे पडताच काँग्रेसच्या जहाल गटाने बहिष्कार, घातपात, क्रांतियुद्ध, सशस्त्र बंड उभारले; पण ते सर्व निष्फळ ठरले. १९२० साली महात्मा गांधीजी हिंदु-स्थानच्या राजकीय क्षितीजावर उगवले. सत्य, अहिंसा या गुणसंवर्धनाबरोबर स्वदेशी, बहिष्कार, सत्याग्रह, राष्ट्रीय शिक्षण या चतुःसूत्रीवर भर देऊन त्यांनी आसेतुहिमाचल आंदोलन सुरू केले.

ढोंगी-दुहीचे, सवत्या सुभ्याचे ब्रिटिशांचे राजकारण उघडकीस आले. ब्रिटिश सेनेबद्दल चीड निर्माण झाली. देशातील जिणे धोक्याचे, परावलंबी, अपमानास्पद झाले आहे.

'स्वातंत्र्याची सुप्रभात जवळ आली आहे. हिंदी लोकांनी देशाला गांजणाऱ्या ब्रिटिश सत्तेचा अवशेष नष्ट करण्यासाठी एका ज्वालेचा भडका पुरे आहे. त्यासाठी परदेशात हे सशस्त्र लढा देणारे सरकार स्थापन केले आहे. आझाद हिंद सेना स्थापन करून स्वातंत्र्यलढा त्यासाठीच लढावयाचा आहे.'

'या आमच्या तात्पुरत्या सरकारला हिंदी जनतेची निष्ठा हवी आहे. सर्व नागरिकांना समान हक्क, समान संधी, पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य हे सरकार देत आहे. भेदाभेद बाजूस सारून स्वदेशहितार्थ हे सरकार झटत राहील.'

'मागील सर्व पिढ्यांना साक्षी ठेऊन, ईश्वरास साक्षी ठेऊन सर्व हुतात्म्यांना साक्षी ठेऊन आम्ही आवाहन करतो की हिंदी स्वातंत्र्याच्या या लढ्यात आमच्या या राष्ट्रीय निशाणाखाली सर्व एकजूट व्हा. हा अखेरचा लढा आहे आणि शत्रू हिंदुस्थानच्या भूमीबाहेर हाकलला जाऊन हिंदुस्थान देश पुन्हा स्वतंत्र राष्ट्र होईपर्यंत हा झगडा आपण चालवू या.'

या जाहिरनाम्यावर पुढाऱ्यांच्या सह्या झाल्या—

सुभाषचंद्र बोस – राज्याचे अधिपती, पंतप्रधान.

युद्ध परराष्ट्र खात्याचे मंत्री– कॅ. मिसेस लक्ष्मी.

स्त्री संघटना–सेना प्रमुख– एस.ए. अय्यर,

वृत्तप्रचार प्रसिद्धी खाते– ले. क. चतर्जी.

जमाबंदी व अर्थखाते- कर्नल अझीद अहमद, ले. क. एन. एस. भगत, ले. क. जगन्नाथराव भोसले. ले. क. गुलझारसिंग, ले. क. एम. झेड. कियानी, ले. क. ए. डी. लोकनाथन, ले. क. हसन, कादीर, कॅ. शहानवाज

सशस्त्र सैन्य प्रतिनिधी– ए. एम. सहाय. चिटणीस– रासबिहारी बसू

प्रमुख सल्लागार– करीम गनी, देवनाथ दास, डी. एम खान, ए. पलाप्पा, जे थिवी, सरदार ईश्वरसिंग, सर्वसल्लागार

सर्व सल्लागार– ए. एन. सरकारकायदे पंडित

मुक्काम शोनान (सिंगापूर) २१ आक्टोबर १९४३

या शपथविधीनंतर जाहीरनामा वाचून झाल्यावर नेताजींनी भाषण करून स्पष्ट केले—

'हिंदुस्थानातील परिस्थिती आम्हांला अनुकूल होत आहे. लोकांच्या यातना वाढत आहेत पण त्याला इलाज नाही.

हिंदुस्थानातील कित्येक प्रांतांत दुष्काळी परिस्थिती आहे. बंगालमध्ये तर दुष्काळाची तीव्रता अधिक असून राजकीय असंतोषही भडकत चालला आहे. याला ब्रिटिश राजवटच कारणीभूत आहे. इंडियन इंडिपेडन्स लीगच्या मार्फत बंगालच्या दुष्काळग्रस्त जनतेसाठी उपासमार थांबविण्यासाठी साहाय्य म्हणून एक हजार टन तांदूळ पहिला हप्ता म्हणून आम्ही देऊ केले, पण ब्रिटिश अधिकाऱ्यांनी ही आमची देणगी स्वीकारली नाही उलट आम्हांला शिव्या दिल्या!

मलायाच्या मुख्य प्रदेशात सयाम ब्रह्मदेश आणि इंडोचायना या देशांत मी अनेकदा फिरून आलो. मला सर्वत्र उत्साह आढळला त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला. आशावादात भर पडली.'

'युद्धोत्तर पुनर्घटना कशी करावी यासंबंधीही आम्ही काही योजना आखल्या आहेत. हिंदुस्थानात आजच्या परिस्थितीत सर्व प्रमुख पुढारी तुरुंगात खितपत पडले असताना स्वातंत्र्याचा झगडा देशातून उभारला जाण्याची शक्यता कमी आहे. म्हणून हे कार्य आम्ही पूर्व आशियातील सर्व हिंदी जनतेला एकत्र आणून स्वीकारले आहे. आम्ही त्यासाठीच पुनर्घटना खाते निर्माण केले आहे.

'आम्ही आमचे सैन्य घेऊन हिंदुस्थानचे राष्ट्रीय निशाण फडकवीत ज्या वेळी हिंदुस्थानची सीमा ओलांडून जाऊ त्यावेळी हिंदुस्थानात खरीखुरी क्रांती सुरू होईल व त्याचे पर्यवसान शेवटी ब्रिटिशांची सत्ता नष्ट होण्यात व स्वातंत्र्य संपादनात होईल.

'आमचे हे तात्पुरते सरकार स्वातंत्र्याचा झगडा सुरू करून यशस्वी करण्यासाठी आहे. १९१६ मध्ये आयरिश लोकांनी असेच तात्पुरते सरकार स्थापन केले होते. मुस्ताफा केमालपाशानेही हेच केले.'

...भाईयो, आपल्या सर्वांच्या अंतःकरणात असा दृढ निश्चय असू द्या की एक विजय वा मृत्यू! एकच जयघोष असू द्या– चलो दिल्लीचा– दिल्ली मार्ग हाच स्वातंत्र्याचा मार्ग आहे. याच रस्त्याने आपणाला गेले पाहिजे. मग जय आपलाच आहे. 'इन्किलाब झिंदाबाद, आझाद हिंद झिंदाबाद!'

नेताजींच्या या तेजस्वी स्फूर्तिदायक भाषणानंतर हजारो श्रोत्यांच्या कंठांतून आझाद हिंद सेनेचे राष्ट्रगीत उचंबळून आले.

हंगामी सरकारची स्थापना झाल्यावर दुसऱ्याच दिवशी २२ ऑक्टोबर रोजी सुभाषबाबूंनी झाशीच्या राणी पथकाचे उद्घाटन केले.

झाशीच्या लक्ष्मीबाईंचा हा जन्म दिवस होता. या दिवसाची त्यामुळे फार चांगली निवड झाली होती. बरोबर पाच वाजता नेताजी हजर झाले. कॅप्टन लक्ष्मीने स्वागत केले. या स्त्री पथकाने नेताजींना गार्ड ऑफ ऑनर दिला. नेताजींनी राष्ट्रीय निशाण उभारले. समोर हातात बंदूका घेऊन स्त्रीसैनिक पुतळ्यासारख्या उभ्या होत्या. त्या प्रसंगी नेताजी म्हणाले,

'भगिनींनो!

झाशी राणी रेजिमेंटची लष्करी शिक्षणाची छावणी सुरू होत आहे. आमच्या पूर्व आशियातील चळवळीच्या प्रगतीतील हा एक महत्वाचा दिवस आहे.

आमच्या स्त्री वर्गात नवजीवन संचारले जाणे ही अगदी स्वाभाविक घटना आहे.

आमचा प्राचीन इतिहास वैभवपूर्ण आहे. त्यामुळेच त्या परंपरेत झाशीच्या राणीसारखी वीर स्त्री भारतात जन्माला आली. मैत्रेयी, अहल्याबाई, बंगालची राणी भवानी, रझिया बेगम नूरजहान अशा किती तरी शूर स्त्रिया निपजल्या आजच्या काळातही निर्माण होत आहेत.

झाशीची राणी अवघी वीस वर्षांची. 'ही राणी सर्व बंडवाल्यांत शूर आणि श्रेष्ठ होती' असे एका ब्रिटिश सेनापतीने नमूद करून ठेवले आहे... तिने सतत झगडा चालू ठेवला. ती झाशीच्या किल्ल्यातून लढली. किल्ल्याला वेढा पडल्यावर ती एक तुकडी घेऊन किल्ल्याबाहेर पसार झाली. ती कालीपाला येथे गेली. तिथून तिने लढा चालू ठेवला. तिने सेनापती तात्या टोपे यांचे बरोबर सख्य केले.

ग्वाल्हेरचा किल्ला हस्तगत केला आणि किल्ल्याच्या ठाण्यावरून तिने लढा चालू ठेवला; त्याच प्रचंड लढ्यात ती अखेर मृत्यु पावली...पराभव झाला पण तो केवळ तिचाच नव्हता-साऱ्या हिंदुस्थानचाच होता. राणी मेली पण तिचे तेज अमर आहे...झाशीच्या राणीचे अनेक अवतार या देशात जन्म पावतील-विजयी होतील. तिचे राहिलेले अपुरे कार्य पुरे करण्याची जबाबदारी आपणांवर आहे."

—या पथकात १५६ स्त्रिया होत्या. कॅप्टन लक्ष्मी या सर्वप्रमुख असून बिजलीसारख्या चमकत होत्या. त्यांच्या मुखमंडलावर विलक्षण तेज, निश्चयाचा-करारीपणा दिसत होता. जणू रणरागिणी दुर्गाच तिच्या रूपाने अवतरली आहे. मूर्तीमंत शौर्य आणि साहस यांची चालती बोलती प्रतिमाच !!

२३ ऑक्टोबर १९४३ रोजी जपानी सरकारने आझाद हिंद सरकारला मान्यता दिली. पूर्ण स्वातंत्र्य हे हिंदुस्थानचे ध्येय; या सरकारला जपानी सरकार शक्य ते सर्व सहकार्य व पाठबळ देईल असे आश्वासन दिले.

२५ ऑक्टोबर रोजी आझाद हिंदच्या तात्पुरत्या सरकारने ब्रिटन व अमेरिकेविरुद्ध जाहीरपणे युद्ध पुकारल्याची घोषणा केली. त्यावेळी जनतेने जयघोष करून नेताजींचे स्वागत केले. पूर्ण संमती दर्शविली. ५० हजार श्रोते त्यांचे भाषण मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते. आझाद हिन्द सरकारच्या मंत्रीमंडळाचे कार्य सुरू झाले. लष्करी कवाइती सुरू झाल्या. फौजेचे निरीक्षण, पाहणी, सलामी हे कार्यक्रम रोजचे सुरू झाले. सैनिक प्राणपणाने लढा देण्यास तयार झाले. सुभाषबाबू म्हणतील ते करण्यासाठी लागेल तो त्याग करण्याची सिद्धता सैनिकांनी दर्शविली. सैनिकांचे नैतिक धैर्य पराकोटीला पोचले होते.-नेताजींनी पुन्हा आश्वासन दिले-'ज्यावेळी आझाद हिंद फौज आपला लढा सुरू करील त्यावेळी आम्ही हिन्दुस्थानात प्रवेश करू. आम्ही जिंकलेल्या प्रदेशाचा कारभार आपल्या हाती येईल...हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हिन्दी माणसाच्या प्रयत्नानेच आत्मयज्ञाने आमच्या फौजेमार्फत मिळविले जाईल.' चलो दिल्लीची घोषणा करण्यात आली.

२६ ऑक्टोबर रोजी नेताजींनी सिंगापूरमध्ये एक सभा घेऊन द्रव्याच्या साहाय्याची मागणी केली.

देणग्यांचा सतत वर्षाव होत होता. परंतु मिळालेल्या तेवढ्या पैशाने नेताजींचे समाधान झाले नाही. त्यांनी श्रीमान हिन्दी व्यापाऱ्यांना आव्हान केले. ते गर्जून म्हणाले–

'या राष्ट्रीय हिन्दी सैन्यात जे सामील झाले आहेत त्यांच्याकडे जरा एकवार नजर टाका. हिन्दुस्थान स्वतंत्र झालेला पाहण्याचे भाग्य यांपैकी कोणाला मिळेल न मिळेल, पण आपल्या रक्तातील शेवटचा बिंदू संपेपर्यंत रक्तदान करीत राहायचे एवढाच निश्चय त्यांनी केला आहे. स्वतंत्र भारतात प्रवेश किंवा प्राणार्पण एवढेच ध्येय त्यांना माहीत आहे

गरीब जनता सर्वस्व अर्पण करण्यास पुढे येत आहे. त्यांनी आपल्या सर्व संपत्तीचे दान आम्हांला देऊ केले आहे. हिंदी राष्ट्र हे श्रद्धेवर, त्यागावर उभारलेले राष्ट्र आहे. हिंदूंचे संन्यास हे ध्येय असून फकीरी हे मुसलमानांचे ध्येय आहे. ३८ कोटी बांधवांना स्वतंत्र करण्याहून अधिक मोठे, उच्च, पवित्र कार्य दुसरे कोणते असू शकेल काय ?

'मलायापुढे माझी पहिली मागणी दहा कोटी रुपयांची आहे.–' या आवाहनाबरोबर लगेच तिथेच पैसे जमवण्यास सुरुवात झाली. जवळ जवळ सत्तर लक्ष डॉलर्स जमा झाले. पुढे एका दिवसातच एक कोटी तीस लक्ष डॉलर्स जमले !

याच दिवशी २६ ऑक्टोबर १९४३ रोजी जर्मन परराष्ट्र मंत्री हर फॉ रिबेन ट्राप यांनी जर्मन सरकारतर्फे तारेने मान्यता पाठविली. ब्रह्मदेश व फिलिपाइन्स सरकारांनीही आझाद हिंद सरकारला मान्यता दिली.

आझाद हिंद सरकारच्या स्थापनेने नेताजींचे एक स्वप्न साकार झाले ! राष्ट्रीय क्रांतिकारक सैन्याची उभारणी तर प्रत्यक्ष झाली होतीच. आता प्रत्यक्ष लढा देऊन स्वातंत्र्य प्राप्त करून घेणे हे ध्येय साध्य करावयाचे होते. ते साकार करण्याच्या मार्गाला ते प्राणपणाने लागले.

२३ ऑक्टोबर पर्यंत आझाद हिंद सरकारला नऊ स्वतंत्र राष्ट्रांकडून मान्यता मिळाली होती. जपान, जर्मनी, इटली, फिलिपाइन्स, मांचुरिया, चीन, सयाम, ब्रह्मदेश, क्रियोशिया हे ते देश.

८ नोव्हेंबर १९४३ रोजी आयर्लंडचे अध्यक्ष डी व्हॅलेरा यांनी अभिनंदनाची तार पाठवून कळविले.

'हिंदी स्वतंत्र सरकार स्थापल्याबद्दल अभिनंदन. तुम्ही आज ज्या आणीबाणीच्या परिस्थितीत आहात तसेच त्यावेळी आम्ही होतो–मी तुमच्या सहकाऱ्यांच्या कार्यास सुयश चिंतितो.'

यापूर्वी २८ ऑक्टोबर रोजी नेताजी टोकियोस एका परिषदेसाठी निरीक्षक म्हणून गेले. जपानच्या बादशहाने नेताजींचा साजेसा गौरव करून त्यांचे स्वागत केले. डॉ. बामॉने हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्याला पाठिंबा देण्याचा ठराव मांडला व तो मान्य झाला. हिंदुस्थान स्वतंत्र होणे आवश्यक आहे. त्यामुळे पूर्व आशियात शांतता टिकेल असे मत व्यक्त केले.

८ नोव्हेंबर १९४३ रोजी जपानी सरकारने आझाद हिंदच्या तात्पुरत्या सरकारला अंदमान व निकोबार ही बेटे दिली. जनरल टोजोने तसे अधिकृतपणे जाहीर केले. त्याप्रसंगी नेताजींनी आपले मत व्यक्त केले—

हिंदी लोकांच्या दृष्टीने अंदमान–निकोबार ही बेटे स्वतंत्र होणे याला महत्त्व फार आहे. ज्या आमच्या देशभक्तांनी अमर्याद हालअपेष्टा भोगल्या ती अंदमान निकोबार ही बेटे आज मुक्त होत आहेत. याने हिंदी मुलूख स्वतंत्र होण्याची सुरुवात झाली. हिंदी स्वातंत्र्य लढ्याच्या दृष्टीने तर याला विशेष महत्त्व आहे. राजकीय कैद्यांना डांबण्यासाठी ब्रिटिश सरकारने या बेटांचा तुरुंग म्हणून उपयोग केला. सक्तमजुरी झालेले शेकडो बंदी या बेटात कोंडले गेले. आमच्या या स्वातंत्र्ययुद्धात देशभक्तांच्या यातनांचे ठिकाण असलेली ही बेटे आज प्रथमच स्वतंत्र होत आहेत. यापुढे हप्त्याहप्त्याने हिंदुस्थानचा मुलूख स्वतंत्र होईल. अंदमान बेटांना 'शहीद' व निकोबार बेटांना 'स्वराज्य' अशी नावे आम्ही देत आहो.'

३० डिसेंबर १९४३ रोजी आझाद हिंद सरकारचा राष्ट्रीय ध्वज अंदमानावर फडकला. स्वतंत्र हिंदुस्थानचे मुख्य प्रधान म्हणून या बेटावर पदार्पण करून तिरंगी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. काही क्षण ते स्तब्ध झाले. त्यांना

अनेक क्रांतिकारक नेत्यांची आठवण येऊन अंत:करण गहिवरून आले. ते सद्‌गदित झाले. पूर्वी सावरकर बंधू येथेच होते. त्या प्रसंगी ते म्हणाले—

या स्वतंत्र बेटांवर तिरंगी ध्वज फडकावल्याची वार्ता ज्यावेळी महात्माजींना आणि माझ्या ३८ कोटी देशबांधवांना कळेल त्यावेळी त्यांना किती आनंद होईल !

१७ फेब्रुवारी १९४४ रोजी कर्नल लोकनाथन यांनी पोर्ट ब्लेअर येथे जाऊन या दोन्ही बेटांचा ताबा घेतला.

हिंदी राष्ट्रीय सैन्याचे शिक्षण चारपाच केंद्रांतून चालू होते. सर्व दर्जाची सर्व धंद्यातील जनता या युद्धकार्यात सहभागी झाली होती. शेकडो लोक स्वयंसेवक म्हणून अहमहमिकेने पुढे आले. आपल्याजवळ जे जे द्रव्य होते ते त्यांनी या युद्धकार्यासाठी अर्पण केले. मलाया हे पिछाडीचे ठाणे ठरविण्यात आले. इंडियन इंडिपेंडन्स लीगच्या शाखा उपशाखा सर्वत्र स्थापन करण्यात आल्या. लीगचे सभासद वाढू लागले. शोनानमध्ये ५४ टक्के, जोहोरमध्ये ६६ टक्के, मलाया येथे ६० टक्के लीगचे सभासद झाले.

जनतेची सेवा, राजकीय मतप्रचार, सैन्यभरती, द्रव्यसाहाय्य मिळविणे इ० सांस्कृतिक कार्ये सुरू झाली. हिंदी, तामीळ भाषेचे ज्ञान निरनिराळे शिक्षण वर्ग काढून, आकाशवाणीवरून पाठ देऊन, देण्यात येऊ लागले.

'मत प्रचारासाठी 'पूर्ण स्वराज्य' हे दैनिक व 'जयहिंद' हे साप्ताहिक सुरू झाले; त्याचा प्रसारही वाढला.

सेनेचे वैशिष्ट्य असे की जातीभेदाचा लवलेशही नाही–मुसलमान, हिंदू, ख्रिश्चन, शीख, ज्यू, डुंगरा–सर्व एकाच आत्मीयतेने एकत्र येतात, जेवणखाण करतात, एकत्र राहतात. शाकाहारी मांसाहारी सर्व मिळून एकत्र जेवतात. स्वदेशाभिमानाने भारलेले हे सैनिक हिंदी स्वातंत्र्याचे एकमेव ध्येय डोळ्यांसमोर ठेवून तळहातावर शीर घेऊन लढा देण्यास सिद्ध झाले आहेत. त्यात भपका नाही; बडेजाव नाही स्वार्थ नाही. चर्चेचे विषय–हिंदुस्थानचा राष्ट्रीय इतिहास, गांधीजी, लो. टिळक, नेहरू पितापुत्र, सी. आर. दास इ. पुढाऱ्यांच्या चरित्रांचे गुणगान, हिंदुस्थानच्या भूगोलाचा अभ्यास, राष्ट्रगीतांचे गायन, चित्ररेखन-

गणित, आरोग्यविज्ञान, बागाईत इत्यादींचे शिक्षण, शारीरिक व्यायाम खेळ, निरनिराळ्या व्यवसायांचे ज्ञान, साबण, शाई तयार करणे, इलेक्ट्रोप्लेटिंग, पाणी शुद्ध करणे, सायकल, ग्रामोफोन, घड्याळे दुरुस्त करण्याचे शिक्षण, पलटणीत आवश्यक ते सर्व लष्करी शिक्षण दिले जात असे.

क्रांतिकारक सैन्य अतिशय काटकसरीने राहात असे. कर्नलचा पगार दरमहा अडीचशे रुपये, मेजरला १८५ रुपये. फौजेमार्फत अन्न कपडे मोफत. मिळणाऱ्या थोड्या वेतनातून सैनिक शिल्लक टाकत व ती सैन्यफंडाला देत.

१९४३ अखेर फंडाची रक्कम ७७ लाख डॉलर्स झाली. मलायात एकट्या शोनानमध्ये २९ लाख डॉलर्स जमले. जडजवाहर वेगळेच. त्याची किंमत ८६ हजार डॉलर्स भरली.

मदतीचा ओघ सर्व दिशांहून येत असे.

पेनांगच्या जाहीर सभेत सुभाषबाबूंनी फंडाची मागणी करताच एका घरकाम करणाऱ्या नोकराने चांदीची फुलदाणी सुभाषबाबूंना अर्पण केली. 'माझ्या मातेच्या स्मरणाने ही फुलदाणी पवित्र झाली असून तेवढीच काय ती माझी धनदौलत' असे त्याने सांगताच सुभाषबाबूंनी त्या फुलदाणीचा जाहीर लिलाव केला. सवाल एक सारखा वाढतच चालला. शेवटी तीन वार होऊन ही फुलदाणी एक लाख पाच हजार डॉलरला विकण्यात आली!

आझाद हिंद सेनेची तयारी जय्यत सुरू झाली. आता प्रत्यक्ष लढ्याचे सत्र सुरू होण्याचा क्षण समोर ठेपला होता.

लढा कोणत्या आघाडीवर केव्हा सुरू करायचा हे पवित्रे आखले जात होते. सैन्याची जमवाजमव सुरू झाली. अनेक राष्ट्रांची मान्यता मिळाली होती, जपान सरकारचे साहाय्य मिळाले होते. द्रव्याच्या राशीच्या राशी मिळत होत्या. जिद्द होती, ध्येय होते. नेताजी लाभले होते. आता दिल्लीवर चाल करून स्वातंत्र्य-लढा देण्यासाठी सैनिक उतावीळ झाले होते!

लढ्याची प्रत्यक्ष सुरुवात

३१ डिसेंबर १९४३ रोजी अंदमान बेटावर पदार्पण करून तिरंगी झेंडा फडकावल्यावर नेताजींनी पुढे बेटांचा ताबा घेतला व १७ फेब्रुवारी १९४४ रोजी कर्नल लोकनाथन यांची गव्हर्नर म्हणून नेमणूक केली. नंतर अंदमानहून नेताजी ब्रह्मदेशात गेले. रंगूनला प्रमुख कार्यकर्त्यांची एक कचेरी उघडली. रंगूनला एक आघाडी व सिंगापूरला दुसरी. रंगून केंद्र अतिशय महत्वाचे. ते परिपूर्ण करण्यासाठी सुभाषबाबूंनी शिकस्त केली.

आझाद हिंद फौजेच्या चार बटालियन्स होत्या. सर्व सैनिकांची भरती स्वेच्छेने झाली होती. कोणावरही जबरदस्ती केली नव्हती. एका ध्येयाने प्रेरीत झालेले, हिंदी राष्ट्राच्या मुक्ततेसाठी बद्धपरिकर झालेले, प्राणपणाने लढा देण्यास सिद्ध असलेले हे सैनिक व सेनाधिकारी नेताजींची आज्ञा शिरसावंद्य मानीत.

आझाद हिंद सैनिकांची संख्या पन्नास हजारांवर गेली होती त्यात १५०० अधिकारी होते. पुढे ५६००० युद्धकैदीही या सेनेत सामील झाले. नेताजी कवाइती घेत. काळा कोट, काळा चष्मा, काळी टोपी, लष्करी पोषाख चढवीत, त्यांच्या वाणीत अजब जादू होती, सेनेला आवाहन करताना त्यांचा स्वर चढे, वीरश्री, त्यांच्या रोमरोमांत संचरू लागे आणि ते उच्चरवाने सांगत—

'भाइयो और बेहनो! आपली मातृभूमी स्वतंत्रतेची मागणी करीत आहे; त्यासाठी तळमळत आहे. पण स्वतंत्रता अशी तशी का मिळते? त्यासाठी सर्वस्वाचे बलिदान करण्याची सिद्धता पाहिजे. सुख, चैन, आराम करण्याचे दिवस गेले. ते आता विसरा. स्वतंत्रतादेवीला प्राणांचे बलिदान हवे—

तुम मुझे खून दो!
मै तुम्हे आजादी दूंगा!!

या रक्तदानाला कोण कोण तयार आहोत, बोला !' हजारो हात उंचावले. जनतेने साथ दिली. सुभाषबाबू म्हणाले, 'छे छे ! असं नाही. प्रतिज्ञापत्रावर आपल्या रक्ताने प्रत्येकाने सही करावी' – ही सूचना येताच हजारो युवक पुढे सरसावले. चाकू, सुरीने आपली करांगुली छाटून त्यांनी रक्ताने प्रतिज्ञापत्रावर सह्या केल्या. भगिनीवर्गही पुढे सरसावला. त्यांनीही रक्ताने प्रतिज्ञापत्रकावर सह्या केल्या. सुभाषबाबूंच्या जयजयकाराने सभा दणाणून गेली.

२६ जानेवारी १९४४ रोजी नेताजी सुभाषबाबूंनी रंगून येथे स्वातंत्र्यदिन साजरा केला. आता प्रत्यक्ष लढ्याची तयारी ! रंगून या ठिकाणाहून कूच करून हिंदुस्थानच्या सरहद्दीत प्रवेश करण्याचे पवित्रे आखले जात होते. रंगूनहून इंफाळ येथे जायचे. आझाद हिंद सेनेनेही तयारी चालविली.

या स्वातंत्र्यदिनानिमित्त नेताजींनी स्फूर्तिदायक भाषण करून द्रव्य-साहाय्याची मागणी केली. ७–८ मैलांवरून श्रोते भाषण ऐकण्यास आले होते. श्रोतृसमुदाय साठ हजारांवर होता.

सभेच्या प्रारंभी सुभाषबाबूंना हार घालण्यात आले. सर्व हार एकत्र गुंडाळून त्यांनी फार उत्तेजक स्फूर्तिदायक भाषण केले. श्रोत्यांचे अंतःकरण हेलावले. त्यांच्या शरीरावर रोमांच उभे राहिले. भाषण संपल्यावर सुभाषबाबूंनी एकेका हाराचा लिलाव केला. लिलाव पुकारताना ते म्हणाले, 'हार तुम्ही मला घातलात तो मी स्वातंत्र्यासाठी झटणारा म्हणून ! मी तुमचे नेतृत्व पत्करले. तुम्ही मजवर पूर्ण विश्वास ठेवलात. मग बोला, या हाराची किंमत तुम्ही काय देणार ? सवाल व बोली सुरू झाली. एका हाराची बोली एक लाख पाच हजारांवर गेली. एक युवक हे दृश्य पाहात होता. तो हार त्याला हवा होता. सुभाषबाबूंच्या हातचा संग्राह्य ठेवा म्हणून ! सवाल वाढले. पाच लाखावर बोली चढली. मग तो युवक पुढे आला आणि म्हणाला, 'माझी सर्व संपत्ती मी या हारासाठी दान करतो.'

सुभाषबाबू गहिवरले. दुसरे दिवशी त्या तरुणाला बोलावून त्यांनी त्याची समजूत घातली. 'अरे असं करू नको. आपल्या निर्वाहापुरते राखून ठेव–' त्यानं उत्तर दिलं 'नेताजी, छे छे असं होणार नाही. मी स्वतःच आता हिंद

सेनेत सामील होऊन स्वातंत्र्याप्रीत्यर्थ लढणार.' त्याच्या नेत्रात प्रसन्नतेचे अश्रू तरळत होते !

लाखो रुपयांची मदत येत होती. हिंदु मुसलमान व्यापाऱ्यांनी १५ लाख रुपयांचे चेक पाठविले.

आझाद हिंद सरकारची स्थापना होऊन एक वर्ष झाले होते ! या वर्धापनानिमित्त सुभाषबाबूंची रत्नतुला करण्याचे माता भगिनींनी ठरविले. ही सर्व संपत्ती अखेरीस स्वातंत्र्य सेनेकरिता लागणार होती.

तुलेसाठी एक तराजू सुशोभित करण्यात आला. दोन्ही पारड्यांच्या चारी बाजूना सुवासिक पुष्पहार गुंफले होते, सुभाषबाबूंना सुवासिनींनी ओवाळून ललाटी तिलक लावला व एका पारड्यात बसविले. जमलेल्या महिलांनी दुसऱ्या पारड्यात आपल्या अंगाखांद्यावरील सर्व सुवर्णालंकार भराभर टाकले. एका गुजराती महिलेने आपल्याजवळच्या सोन्याच्या पाच विटा तयार करून आणलेल्या पारड्यात टाकल्या. आपले जीवन सार्थकी लागल्याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर दिसत होता.

एका युवतीने आपला पती इंग्रजांशी लढता लढता हुतात्मा झाला असे समजताच गळ्यातले मंगळसूत्र पारड्यात टाकले. पारडे हळू हळू समांतर होऊ लागले पण अजून थोडे वजन कमी पडले ! इतक्यात एक नवल वर्तले !

एक वृद्ध महिला पुढे सरसावली. लोकांना वाटले ही नेताजींना वंदन करण्यासाठी पुढे येत असावी. ती पुढे आली. तिच्या हातात एक सोन्याची फ्रेम असलेला फोटो होता. धारातीर्थी पतन पावलेल्या आपल्या एकुलत्या एका मुलाचा फोटो फ्रेम करून तिने तो सतत आपल्याजवळची ठेव म्हणून छातीशी जपून ठेवला होता. त्या वृद्धेने एकवार त्या फोटोचे चुंबन घेतले— हृदयाशी धरला आणि डोळ्यांतून अश्रूंची धार वाहात असतानाच तिने ती सोन्याची फ्रेम तराजूत टाकली. तराजू समांतर झाले. तुला भरली. जीवनाचे सार्थक झाल्याचे समाधान तिच्या चेहऱ्यावर विलसत होते. रुक्मिणीने टाकलेल्या तुलसीदलाने श्रीकृष्णाची तुला झाली त्याप्रमाणे !

ही वृद्ध महिला होती एक गुरखा स्त्री. तिचे नाव लक्ष्मी. तिचे जवळ सोने-नाणे, पैसा अडका काही नव्हता. ती दूध विकून आपला उदरनिर्वाह करीत असे. मागच्या एका प्रसंगी सुभाषबाबूंनी असेच एकदा सैन्य भरतीसाठी आवाहन केले होते. ह्या वृद्ध महिलेला एकुलता एक मुलगा होता. त्याचे नाव मानबहादूर सिंह. ती या सभेच्या शेवटी नेताजींचे जवळ येऊन म्हणू लागली– 'नेताजी, माझ्याजवळ तुम्हाला देण्यासारखे काही नाही. पण माझा एकुलता एक तरुण मुलगा आहे. त्याला मी तुमच्या हवाली करते. या तरुणाला तुमच्या सेनेत घ्या. माझे सर्वस्व काय तो हा मुलगा; तोच मी तुमच्या स्वाधीन करते. तुम्ही सर्वस्व अर्पण करण्यास सांगितलेत ना? घ्या तर ह्या माझ्या मुलाला.'

नेताजी गहिवरले. ही देणगी स्वीकारताना ते त्या वृद्धेला प्रणाम करून म्हणाले, 'माताजी, तुम्ही धन्य आहात! ज्या देशातल्या स्त्रिया असे महान बलीदान करण्यास तयार होतात तो देश स्वतंत्र झाल्याशिवाय कसा राहील?'

या तरुणाने सैन्यात भरती झाल्यावर इंफाळच्या लढाईत बहादुरी गाजविली. भारतीयांचा पराभव होण्याची चिन्हे दिसताच सैन्यातले सहा तरुण पुढे आले. त्यांत चार शीख व दोन गुरखे होते.—अमरसिंह, हरजितसिंह, खजानसिंह, प्रीतमसिंह, जगबहादूरसिंह आणि मानबहादूरसिंह —मानबदादूरसिंह हा त्या वृद्धेचा एकुलता एक मुलगा. युद्धप्रसंग घडला होता तो असा—

टांजीकडे जाणारे तिन्ही रस्ते रोखले गेले. शत्रूंचे रणगाडे या मार्गाने येणार होते. हे रस्ते तोडण्याची कठीण कामगिरी या सहा तरुणांनी पत्करली. प्रत्येक रस्त्यावर दोघा दोघा तरुणांनी खोल खोल खड्डे खणले. त्यात जिवंत बॉंब पुरून ठेवले. रणगाडे मार्गावर येताच बॉंब फोडण्याचे काम त्यांनाच करावयाचे होते. त्यांचे प्राणार्पण होणार हे उघड दिसत होते. नियोजित कार्यक्रमाप्रमाणे रणगाडे जवळ येताच बॉंब स्फोट झाले; रणगाडे उध्वस्त झाले. पुढचा मार्ग खुंटला. रणगाडे चालविणाऱ्यांचा फन्ना उडाला. त्यांतील राहिलेल्या रणगाड्यांना माघारी परतावे लागले. या धाडसी कृत्यात ते सहाही तरुण मृत्यूमुखी पडले. त्यांना वीरगती प्राप्त झाली! सुभाषबाबूंच्या कानी ही वार्ता येताच ते समरांगणावर आले. त्यांनी त्या मृत शरीरांना आलिंगन दिले. प्रत्येकाच्या शवाला छातीशी धरून अश्रूविमोचन करू लागले!

मानबहादरसिंहाची माता तीच ही वृद्ध स्त्री ! दूध घालण्याचा धंदा करून पुत्रविरहाचे दुःख सहन करून वावरणारी. तिने आपल्या मुलाचे एक छाया-चित्र सोनेरी फ्रेममध्ये फ्रेम करून तो फोटो स्मरण म्हणून नित्य उशाशी बाळगला होता.–रत्नतुला झाली तो प्रसंग आल्यावर त्या वृद्ध महिलेचे हृदय हेलावले. इतर स्त्रियांनी आपल्या अंगाखांद्यावरचे दागिने काढून पारडयात टाकताच तिने सोन्याची फ्रेम पारड्यात टाकली. तिचे हे सर्वस्वाचे दान होते. नेताजी आश्चर्यचकित झाले. त्यांचे नेत्र पाणावले. तेव्हा ती म्हणाली–

'यह सोना मेरे बच्चेसे अधिक मूल्य का नही। यदि माँ का दिल अपने बच्चेको स्वतंत्रताकी बलीवेदीपर न्योच्छावर कर सकता है तो सोना कोई किमत ही नही रखती !'

धन्य ती माता आणि तिचा सुपुत्र !!

असे किती प्रसंग घडले; त्यांचे वर्णन शब्दांनी मर्यादित करणे अशक्य !

नेताजींनी रंगूनला एक आझाद हिंद सरकारची बँक काढण्याची आवश्यकता पटवून द्रव्याची मागणी केली. एका कोट्याधीश मुसलमान व्यापाऱ्याने नेताजींची भेट घेऊन विचारले 'आपणास सुरुवातीस किती पैसे लागतील.'–सुभाषबाबूंनी सांगितले 'पन्नास लाख रुपये कमीत कमी.' तो सद्गृहस्थ म्हणाला, 'ही काही फार कठीण मागणी नाही. हे घ्या तीस लाख रुपये. आता बाकीचे वीस लाख पुढच्या आठवड्यात देतो. !'

असे याचक ! असे दाते !–पण कशासाठी ? देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करण्यास सिद्ध झालेले !

देवी हिराबाई या महिलेने आपले सर्व दागिने सुभाषबाबूंच्या थैलीत समर्पण केले. आणि आपल्या पतीच्या सल्ल्याने एक्कावन्न हजार रुपये देणगी दिली !

एक तरुण भांडी घासण्याचे काम करीत असे. आपल्या मिळकतीतून त्याने पैसे साठवून एक फुलदाणी विकत घेतली. ती नेताजींना त्याने भेट म्हणून आदराने दिली. या अमूल्य भेटीचा लिलाव झाला. लिलावात ५१००० रुपयापर्यंत बोली चढली. फुलदाणीचे मूल्य एक्कावन्न हजार रुपये मिळाले–स्वातंत्र्य सेनेच्या कार्याला !

सुभाषबाबूंच्या वाढदिवस प्रसंगी २३ जानेवारी १९४४ रोजी सुवर्णतुला करण्यात आली. भारंभार सुवर्णालंकार मिळाले.

एका आणीबाणीच्या प्रसंगी नेताजी सिंगापूरला जायला निघाले होते. चेहऱ्यावर काळजीची छटा होती. एकाने धाडस करून विचारले, 'नेताजी, आपण आज उदास का?' नेताजींनी गंभीरपणे उत्तर दिले, 'मला सेनेच्या कार्यासाठी बीस लाख रुपये ताबडतोब पाहिजे आहेत. रंगून शहरातून यापूर्वीच बरेचसे पैसे घेतले आहेत. आता मी सिंगापूरला निघालो आहे.'

विमान सुटण्यास थोडा अवकाश होता. इतक्यात एका तरुणाने त्यांचे हाती एक कागद दिला. त्यात पंचवीस लाख रुपये देणगीदाखल दिले होते. काम झाले. नेताजींचा चेहरा उजळला. त्यांनी निःश्वास सोडला.

सर्व छोट्या मोठ्या देणगीदारांना 'सेवक ए हिंद' अशी बहुमानाची पदवी देऊन सुभाषबाबूंनी त्यांचा गौरव केला.

आझाद हिंद सरकारला द्रव्याची कमतरता कधीच भासली नाही. फौजेसाठी असो, लष्करी शिक्षणासाठी असो सुभाषबाबूंनी द्रव्याची मागणी करताच जनतेने अहमहमिकेने जेवढे जवळ होते ते अर्पण केले. दागदागिन्यांसह सर्वस्वाचे दान केले.

आता हिंद बँक सुरू करण्यात आली; ५० लाख डॉलर भांडवल जमा झाले होते. बँकेचे व्यवहार चेक्स, हुंड्या सर्व सुरू झाले. शाखा-उपशाखा निघाल्या. ब्रह्मदेशातून बँकेत ८॥ कोटी रुपये जमा झाले. स्वतंत्र नाणी पाडण्यात आली; त्यासाठी आझाद हिंद सरकारची टाकसाळ खोलण्यात आली. नोटा छापण्यात आल्या.

जुलै १९४४ रोजी एका कोट्याधीशाने आपल्या सर्व इस्टेटीचे दान करून एक कोटी रुपये नेताजींना दिले. नेताजींनी त्याचा गौरवपूर्वक उल्लेख केला. हिंदुस्थानी ही राष्ट्रभाषा, मध्ये वाघाचे चित्र असलेला तिरंगी झेंडा हा ध्वज, जयहिंद हे घोषवाक्य. पूर्ण स्वातंत्र्य हे ध्येय ठरविण्यात आले.

जपान सरकारकडून युद्धासाठी सर्व सामग्री मिळेल अशी अपेक्षा होती. पहिल्याने जरूर ते साहाय्य मिळत गेले पण पुढे ही मदत मिळण्यात कुचराई होऊ लागली. प्रामुख्याने हवी होती ती युद्धसामग्री हत्यारे—बंदुका, तोफा, रण-

गाडे, बाँब–पण जपानी अधिकाऱ्यांकडून ही सामग्री मिळेना. आझाद हिंद सेनेला सामना देणे कठीण होऊ लागले. तरी पण आझाद हिंद सेनेचे नैतिक धैर्य उत्तरोत्तर वाढतच होते.

भारताबाहेर स्वतंत्र सरकारच्या बतीने ही युद्धाची तयारी चालू असताना भारतात जनतेचा असंतोष भडकला होता. काँग्रेस मंत्रीमंडळाने राजीनामे दिले होते. 'चले जाव' चा ठराव ऑगस्ट ४२ ला मांडण्याचे ठरले. पण तत्पूर्वीच महात्मा गांधी व इतर सर्व पुढाऱ्यांना तुरुंगात डांबून ठेवण्यात आले होते. गांधीजी आगाखान पॅलेसमध्ये स्थानबद्ध होते तर जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल आदीकरून सर्व पुढारी अहमदनगरच्या तुरुंगात स्थानबद्ध करण्यात आले होते. ब्रिटिश नोकरशाहीचा जुलूम वाढत चालला होता. राजकीय कैद्यांनी तुरुंग भरून गेले होते. तंबू ठोकून नवीन तात्पुरते तुरुंग चालू करण्यात आले. अश्रूधूर, लाठीमार, गोळीबार, झटापटी, फाशी, बलात्कार, सर्व गावांवर बंदी यांचे थैमान सुरू झाले. आम जनताही त्रस्त होऊन अत्याचाराचे, हिंसेचे, लुटालूट, जाळपोळीचे मार्ग चोखाळू लागली. चिमूर, अष्टी, जोनपूर, गोरखपूर, बनारस, बिहार या व अशा अनेक ठिकाणाहून अत्याचार होत राहिले होते. साताऱ्यात पत्री सरकार सुरू झाले. जयप्रकाश नारायण यांनी क्रांतिकारक नेतृत्व पत्करून चळवळ सुरू केली.

ही वेळ आतून आणि बाहेरून–देशातून आणि परदेशातून उठाव करण्यास योग्य होती.

सुभाषबाबूंच्या नेतृत्वाखाली जपान–ब्रह्मदेश, मलाया–सिंगापूर येथे आझाद हिंद सेनेची जमवाजमव होत होती. हाच क्षण महत्त्वाचा होता. देशात जुलमी राजवटीचा कळस; असंतोषाचा भडका उडाला असताना परदेशातून चालल्लेल्या उठावाला एक आगळे महत्त्व प्राप्त झाले होते!

सिंगापूर ते इम्फाळ २७७५ मैल
आझाद हिंद फौजेचा पायी प्रवास १००० मैल

o पायी प्रवास ++ मोटार ट्रक प्रवास
रेल्वे प्रवास बोटीने प्रवास

स्वातंत्र्याची धगधगती प्रेरणा
हृदयाशी बाळगून नेताजी
सुभाषचंद्र बोस यांच्या
आझाद हिंद सेनेने मारलेली
मजल या नकाशात दिसत आहे.
पाऊस, दाट जंगले, प्रतिकूल
निसर्ग, अपुरी साधनसामुग्री
आणि आधुनिक शस्त्रास्त्रांचा
अभाव असूनही कोणत्याही
संकटाची पर्वा न करता
ही सेना पायीच पुढे
सरकत होती.
दैवाने उलटे फासे टाकले
नसते तर या सैनिकांनी
भारताच्या इतिहासाची पाने
वेगळीच लिहिली असती...

ह्या स्वातंत्र्यसूर्याच्या
पराक्रमाचा अखेरचा
अध्याय आता सुरू
होत आहे.

रणकुंड पेटले

१९४४ सालच्या सुरुवातीला ८ जानेवारीस सैन्याचे प्रमुख ठाणे रंगूनला नेण्यात आले.

२६ जानेवारी १९४४ रोजी स्वातंत्र्यदिन साजरा झाला. नेताजींनी स्फूर्तिदायक भाषण केले. श्रोतृसमुदाय साठ हजारापर्यंत होता. सात ते दहा मैलांवरून लोक सभेसाठी चालत आले होते. या सभास्थानी द्रव्याचा पाऊस पडला.

४ फेब्रुवारी १९४० रोजी ब्रिटिशांनी भारत-ब्रह्मदेशच्या सरहद्दीवर युद्धास प्रारंभ केला. त्यावेळी वीस हजार स्वातंत्र्य सेना आघाडीवर होती. जपानी सेनेसमवेत रणांगणाकडे आझाद हिंद सेनेच्या पहिल्या तुकडीला निरोप देताना सुभाषबाबू म्हणाले—

'रक्त रक्ताला आवाहन करीत आहे. सिद्ध व्हा. आता आपल्याला एक क्षणही गमावून चालणार नाही. शस्त्रास्त्रे हाती घ्या. आपल्या पूर्वीच्या स्वातंत्र्ययोद्धयांनी बांधलेल्या रस्त्यावरून आता तुम्हांला वाटचाल करायची आहे. एक तर आपण शत्रूला चोपून काढू किंवा हुतात्म्यांना साजेसे बलिदान करू. तसे झाले तर दिल्लीला जाणाऱ्या रस्त्यावरच आपला देह पडेल–हे समाधान काही कमी नाही. दिल्लीचा रस्ता हा स्वातंत्र्याचा रस्ता आहे. म्हणून आता आपणा सर्वांचा पुकार एकच असला पाहिजे 'चलो दिल्ली!'

सेनापती कर्नल शाहनवाजखां यांची तुकडी आघाडीवर होती. नेताजी तुकडीबरोबरच जात होते. प्रत्येक सैनिकाच्या खांद्यावर दहा दहा शेराचे वजन होते, हातात बंदूक होती. सर्वांत पुढे तिरंगी झेंडा फडकत होता. सैन्याची आगेकूच सुरू झाली–भारताच्या सीमेवर. दलदलीचा प्रदेश लागला होता. संचलनाबरोबर समर गीत उच्चस्वराने गाइले जात होते.

कदम कदम बढाये जा
खुशी के गीत गाये जा
यह जिन्दगी है कौम की
तो कौम पर लुटाये जा ।

तू शेरे हिन्द आगे बढ
मरनेसे कभी न डर
आस्मान तक उठा के सर
जोशे वतन बढाये जा ।

तेरी हिम्मत बढी रहे
खुदा तेरी सुनता रहे
जो सामने तेरे चढे
तो खाक में मिलाये जा ।

चलो दिल्ली पुकार के
कौमी निशां संभाल के
लाल किले पै गाड के
लहराये जा, लहराये जा ॥

वाटेत भयंकर दलदल होती; तरी कोणत्याही संकटांना न जुमानता आगेकूच करत करत आझाद हिंद सेना १८ मार्च रोजी आसामधील कोहिमा सीमेवर घेऊन पोचली. सैन्यातील शूर वीरांनी मातृभूमीला साक्षात दंडवत घातले. रस्त्यावरची धूळ, पवित्र मृत्तिका कपाळाला केशरी टिळ्यासारखी लावली व शपथा घेतल्या. 'या झगड्यात आम्ही कच खाणार नाही. हिंदुस्थान स्वतंत्र होईपर्यंत आम्ही विसावा घेणार नाही!' जय हिंद या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला!

सेनापती कॅ. शहानवाज यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यसेनेने भारतात प्रवेश करून मणीपूर येथे तिरंगी स्वातंत्र्यध्वज फडकाविला! इंफाळला वेढा दिला.

जिंकलेल्या भारतीय प्रदेशावर आझाद हिन्द सेनेचे स्वामित्व राहील असे जनरल टोजोने घोषित केले.

पुढे आझाद हिंद फौजेने रामू, कोहिमा, पालेल, तिडिम इत्यादी ठिकाणी ब्रिटिशांचा पराभव करून स्वतःचे आधिपत्य स्थापन केले. हातघाईच्या समोरासमोरच्या युद्धात आझाद हिंद सेना अजिंक्य ठरली. आराकान, इम्फाळ आणि पालेल या तिन्ही युद्धांत विजय मिळविताना हिंद सैनिकांनी जी मर्दुमकी दाखविली तिला तोड नाही. या शौर्याने विदेशी सेनापतीही चकित झाले. हे हातघाईचे युद्ध संगीनीच्या साहाय्याने लढले गेले.

एका प्रसंगी समोरासमोर युद्ध चालू असता ब्रिटिश सैन्यातील हिंदी सैनिकांची आझाद हिंद सैनिकांशी गाठ पडली तेव्हा त्यांनी आवाहन केले. 'आमच्या बाजूला या आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढण्यास सिद्ध व्हा.'

आपले सैन्य फितूर होईल या भीतीने ब्रिटिश अधिकाऱ्यांनी आपल्या फौजेतील हिंदी पथके हलवून ब्रिटिश सैन्य आणून ठेवले. दरम्यान शत्रूच्या गोटातील सर्व दाणागोटा आझाद हिंद सेनेला मिळाला.साध्या साध्या माणसांनी लष्करी शिक्षण वेताचे असतानासुद्धा युद्धात जो अतुलनीय पराक्रम दर्शविला त्यामुळे काळ, वेळ व परिस्थितीही धैर्य देते,शौर्य देते– जिद्दीच्या आत्मविश्वासाच्या जोरावर विजय मिळतो हे सिद्ध झाले. कित्येक प्रसंगी आझाद हिंद सैनिक आपली शरीरे झोकून देत व शरीराच्या चिंध्या करून रणगाडे उडवून देत. मृत्यूवर स्वार होऊन!

पुरेसे कपडे नाहीत, दारुगोळा पुरेसा नाही, वैमानिक संरक्षण नाही अशा स्थितीत आझाद हिंद सेनेने ब्रिटिश सेनेला मागे हटविले! अपूर्व जय मिळविला!

आझाद हिंद फौजेने वादळाच्या गतीने शत्रूला मागे रेटत रेटत, शत्रूच्या छावण्या आक्रमत आक्रमत मोराई, टिड्डीम, हाफा जिंकले– इंफाळला वेढा दिला. दुसऱ्या पथकाने उखराल व हुगेव या भागामधील रेल्वे हस्तगत केली. तिसऱ्या पथकाने सुरमा नदी पार करून कोहिमा येथील शस्त्रास्त्रांचा साठा, पाण्याचा साठा, अन्नधान्य कोठारे हस्तगत केली. कोहिमा शहरावर तावा मिळविला.

झाशीची राणी रेजिमेंटच्या अपूर्व पराक्रमाची कहाणी तर चित्तथरारक आहे. या रेजिमेंटला नर्सिंग व रेडक्रॉस एवढेच कार्य देण्यात आले होते. कॅप्टन

लक्ष्मी सर्व प्रमुख अध्यक्ष होती. या पथकातील स्त्रियांनी प्रत्यक्ष आघाडीवर घायाळ झालेल्या सैनिकांच्या शुश्रूषेचे काम उत्कृष्टपणे बजावले. शेकडो सैनिकांची मृत्यूमुखातून सुटका केली. पण एवढ्याने स्त्री सैनिकांचे समाधान होईना. पथकातील सर्व स्त्री सैनिकांनी एकत्र जमून नेताजींकडे एक अर्ज पाठविला; त्यात स्पष्ट केले होते–

'आमचे लष्करी शिक्षण पूर्ण समाधानकारक झाले असूनही आम्हाला प्रत्यक्ष आघाडीवरील युद्धास जाऊ देण्यात येत नाही. परिचारिकांची तुकडी एवढाच का आमचा दर्जा? हे अगदी अयोग्य आहे. आम्हांला शूर झाशीच्या राणीचे पथक असे नाव दिले. शोनान येथे लष्करी छावणी उघडली त्यावेळी आम्ही युद्धाच्या रणधुमाळीत जाऊन त्या शूर राणीप्रमाणे लढू शकू असे तुम्ही आम्हाला आश्वासनपूर्वक सांगितले. आम्ही लढणाऱ्या सैनिकात असल्याचे शत्रूच्या नजरेस पडले की शत्रूचा धीर खचेल, ब्रिटिश सेनेतील हिंदी सैनिक माघार घेतील असे तुम्ही म्हटले–आता आम्हांला रणांगणाच्या आघाडीवर जाण्यासाठी तुम्ही का सांगत नाही? तसा ताबडतोब हुकूम द्या. अशी आमची आपणाजवळ विनंती आहे—

भारतमातेला स्वतंत्र करण्याच्या कार्यात आम्ही प्राणत्यागास तयार आहो. हा आमचा दृढ निश्चय तुमच्यापुढे सिद्ध करण्यासाठी पहा या अर्जावर आमच्या रक्ताने आम्ही सह्या केल्या आहेत!'

अर्जावर सह्या करण्यात दोन महाराष्ट्रीय ब्राह्मण स्त्रिया, दोन बंगाली ब्राह्मण स्त्रिया, दोन गुजराती स्त्रिया होत्या, बिनलढाऊ जमातीतील स्त्रिया होत्या. या स्त्रियांनी आपली बोटे कापून त्यातून ठिबकणाऱ्या रक्ताने सह्या केल्या होत्या.

ती प्रतिज्ञा वाचून नेताजींचे डोळे पाणावले. ते गहिवरून गेले. रुद्ध कंठातून ते अडखळत म्हणाले—

'कॅप्टन लक्ष्मी, मी तुम्हांला नकार देऊ शकत नाही. तुमची शूर पलटण लवकरच आघाडीवर पाठविली जाईल. या कृतीने जपानी पलटणीच्या हाराकिरीची आठवण मला होत आहे. भारतमातेच्या उदरी असे शूर वीर व कन्या निर्माण होतील का अशी पूर्वी मला शंका वाटे. ही शंका तुम्ही फोल ठरवलीत. जा. मी तुम्हांला आघाडीवर जाण्याचा हुकूम देतो!

२ मार्च १९४४ रोजी या पलटणीने प्रत्यक्ष युद्धात भाग घेतला. शौर्य गाजविले.

या प्रसंगाचे वर्णन या पलटणीत प्रत्यक्ष लढत असलेल्या एका शूर महिलेने लिहून ठेवले आहे. त्यात ती म्हणते—

'आनंदी आनंद ! चाललो; आम्ही रणावर चाललो. नेताजींचा हुकूम आला. परिस्थिती अत्यंत विकट असल्याचा इषारा आम्हांला मिळाला आहे...

आम्ही आघाडीवर पोचलो. परिस्थिती अत्यंत कठीण होती. अन्न, कपडे, दारूगोळा सर्वांचाच पुरवठा कमी होता. पण आम्ही त्याची पर्वा केली नाही. रणांगण म्हणजे एक प्रचंड जंगल होते. लहान लहान टेकड्या, अरुंद खिंडी चहूबाजूस होत्या. खेड्डूत स्त्रिया आमच्याकडे टकमक पाहात राहात. त्यांनी लढाऊ स्त्रिया कधीच पाहिल्या नव्हत्या. एका खेड्यात आमची छावणी होती.

नंतर आम्हांला आगेकूच करण्याचा आदेश मिळाला. बरेच लांब अंतर चालायचे होते. आम्ही पहाटे तीन वाजता चालू लागलो. कित्येक मैल चालून गेल्यावर एका टेकडीच्या आश्रयाने आम्ही दबा धरून राहिलो. शत्रूचे सैन्य खिंडीत घुसले...आम्हांला गोळीबार करण्याचा हुकूम मिळाला....आम्ही स्त्रिया आहोत याचा आम्हांला विसर पडला. बंदुकीने फेरी झाडाव्या, तोफा डागाव्या, उडवाव्या, पुन्हा दारू ठासावी, पुन्हा गोळीबार करावा असा क्रम सतत चालू होता. अखेर 'संगिनीने हल्ला चढवा'–असे आदेश मिळाले... 'जयहिन्द' ची घोषणा करीत मी टेकडीच्या उताराने भरधाव धावू लागले. 'इन्किलाब झिंदाबाद, आझाद हिन्द झिंदाबाद' या आरोळ्या मारीत आम्ही चाललो होतो...शेवटी मला गोळी लागली. घायाळ झाले. बेशुद्ध पडले–मला हॉस्पिटलमध्ये शुश्रूषेसाठी आणण्यात आले हे मला नंतर शुद्धीवर आल्यावर समजले. पुढे रंगूनमधील मुख्य ठाण्यावर जाण्याचा मला हुकूम मिळाला !... १८ मार्च रोजी आम्ही हिंदुस्थानात प्रवेश करून जय मिळविला.'

'...२६ मे १९४४ रोजी अशीच इंफाळच्या आघाडीवर लढाई जुंपली. आम्ही जपानचे गुलाम आहोत असे आम्हांला हिणवण्यात आले. आम्हांला अन्नवस्त्राचा तुटवडा जाणवत होता; तरी धीराने आमच्या अधिकाऱ्याने उत्तर दिले– 'आम्ही जपानचे गुलाम नाही. सुभाषबाबूंच्या नेतृत्वाखाली त्यांच्या

हुकूमाप्रमाणे आम्ही लढत आहो; अन्नाविषयी म्हणाल तर गुलामगिरीतील तूपरोटीपेक्षा स्वातंत्र्यातील गवत खाणे अधिक चांगले.'

आझाद हिन्द सैनिकांजवळ अन्नाचा तुटवडा होता. थोडासा तांदूळ आणि बाकी जंगलातील कंदमुळे व रानटी फळे यावर ते तगून राहिले होते. मनोधैर्य विलक्षण होते! इच्छाशक्ती, दुर्दम्य आशावाद आणि ध्येयासाठी प्राणार्पण करण्याची सैनिकांची तयारी होती—

हतो वा प्राप्यसि स्वर्गं ।
जित्वा वा भोक्षसे महिम् ॥

या गीतेतील श्रीकृष्णाच्या आश्वासनाप्रमाणे सुभाषबाबूंनी दिलेले आश्वासन प्रेरक ठरले! चलो दिल्ली, इन्किलाब झिंदाबाद या घोषणांनी सर्व थरारून जात.

आझाद हिन्द सेनेने जपानी सैन्याच्या बरोबरीने ब्रह्मदेशाची सीमा ओलांडून प्रत्यक्ष हिन्दुस्थानात रणसंग्राम सुरू केला, विजय मिळविला त्यावेळी सुभाषबाबूंनी एक हुकूम काढला—तो दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिण्यायोग्य ठरला—

'—ब्रिटिश आधिकाऱ्यांनी अत्यंत निर्घृणपणे एका शतकापेक्षा अधिक काळात हिन्दुस्थानची लुटालूट केली. प्रचंड सैन्य उभारले. आम्ही ब्रह्मदेशाची सीमा ओलांडून हिन्दभूमीवर उतरतो आहोत. आपल्या सैन्याने उत्तम लष्करी शिक्षण घेतलेले आहे. हिन्दी स्वातंत्र्यासाठी मरू किंवा मारू या कृतनिश्चयाने आपले सैन्य लढत आहे. आम्ही एक उज्ज्वल परंपरा निर्माण करीत आहोत. इंफाळवर अखेरचा हल्ला करण्याची सर्व सिद्धता झाली असता मुसळधार पर्जन्यवृष्टी सुरू झाली. पुढचा बेत आम्हांला रहीत करावा लागला. परतून आघाडी बदलावी लागली. आपण आता उत्कृष्ट तयारी करू, पुनः चढाई करू. आमचा आत्मविश्वास दुणावला आहे. सैनिकांचे अतुल धैर्य, कर्तव्यनिष्ठा आणि जिद्द यामुळे अंतिम विजय आपलाच आहे—'

भारतीय स्वातंत्र्य युद्धात जे वीर समरांगणावर पतन पावले त्यांचे आत्मे आपणांस स्फूर्ती देवोत.'

रंगूनला मुख्य कचेरी नेल्यावर सुभाषबाबूंनी मंत्रीमंडळाची पुनर्रचना केली. मलाया, थायलंड, ब्रह्मदेश येथपासून भारतीय सरहद्दीपर्यंत उत्कृष्ट संघटना

केली. स्वतंत्र सरकारचा राज्यकारभार सुरळीत चालावा म्हणून विविध खाती सुरू करून कुशल अधिकाऱ्यांची योजना केली. जी खाती होती ती अशी — (१) अर्थ (२) हिशेब (३) नेताजी निधी (४) पुरवठा (५) पुरवठा मंडळ (६) खरेदी मंडळ (७) रेव्हिन्यू (८) सैनिक भरती व शिक्षण (९) प्रसिद्धी-प्रचार (१०) शिक्षण (११) आरोग्य व समाजकल्याण (१२) राष्ट्रीय नियोजन (१३) वार्ता (१४) माहिती (१५) महिला विभाग (१६) उत्पादन (१७) यांत्रिक शिक्षण (१८) तारांचे दळण-वळण (१९) शेतकी व उद्योगधंदे (२०) पुनर्रचना (२१) गृहसंयोजन व वाहतूक (२२) परदेशी संबंध (२३) मजूर (२४) सैनिक शाखा.

सैनिकी शिक्षण देणाऱ्या शाखा अनेक ठिकाणी उघडण्यात आल्या. त्यात मलाया येथील केंद्र सर्वप्रमुख व मोठे होते.

१८ मार्च १९४४ रोजी कोहिमाच्या सीमेवर आसाम प्रांतात आझाद हिन्द सेनेने प्रवेश केला. मोराई, टिड्डीम ही टाणी जिंकून घेतली.

झाशी राणी रेजिमेंटने इंग्रजी फौजेची पिछेहाट केली. १५–१६ तास सतत लढा देऊन शत्रूला जेरीस आणले. वाहनांची कमतरता, शस्त्रांचा अपुरा पुरवठा, अन्नवस्त्रांची वाण असूनही या वीरकन्या लढत राहिल्या. शुश्रूषा पथकाचे काम चालूच होते.

विमुक्त झालेल्या प्रदेशावर कर्नल चतर्जीची नेमणूक गव्हर्नर म्हणून झाली.

वैराग्यसंपन्न वीरांच्या या तुकड्या लढत होत्या. त्यांत एकही दारुडा नव्हता. सैन्यामध्ये घाणेरड्या विषयावर इतर ठिकाणी जशा चर्चा चालतात तशा या सैन्यात चालत नसत. सैन्ये पोटावर चालतात ही म्हण या सैनिकांनी खोटी करून दाखविली. कधी उपाशी पोटी तर कधी अर्धपोटी एका तत्वनिष्ठेने सैनिक लढत.

सुभाषबाबू सर्वत्र संचार करीत. आघाडीवर हिंडत. ४ जुलै १९४४ पासून नेताजी सप्ताह सुरू झाला. 'स्वातंत्र्यप्राप्ती अथवा आत्मार्पण' हेच ध्येय राहील अशा शपथा घेतल्या.

सुभाषबाबूंनी गेल्या वर्षाच्या कामगिरीचा आढावा घेतला. सर्व अडचणींवर मात करून निश्चितपणे प्रगती होत असल्याचे सांगितले. नेताजी भाषणे

करीत तेव्हा जादूने भारल्यासारखे लोक ऐकत राहात. त्यांच्या अंगी नवचैतन्य संचरे. एका भाषणात त्यांनी महात्माजींना उद्देशून रेडिओवरून भाषण केले व आपली भूमिका पूर्णपणे समजावून दिली. प्रगतीचा आढावा घेतला. 'आपण स्वदेश सोडून जपानशी हातमिळवणी करून युद्ध-आघाडी उघडली; स्वतंत्र सेना उभारली. देश स्वतंत्र करण्याचे उद्दीष्ट स्पष्ट केले. स्वातंत्र्य मिळाल्यावर आमचे कार्य संपेल व आम्ही पुन्हा सर्व महात्माजींचे पाईक होऊ हे स्पष्ट केले. शेवटी सद्गदित होऊन ते म्हणाले, 'महात्माजी, तुम्ही आमच्या राष्ट्राचे पिताजी, हिन्दी स्वातंत्र्याच्या या धर्मयुद्धात तुमचा आशीर्वाद व तुमच्या सदिच्छेची मी मागणी करीत आहे.'

१ ऑगस्ट १९४४ रोजी आझाद हिन्द सेनेने टिळक पुण्यतिथी साजरी केली.

आता पावसाळा सुरू झाला आणि युद्धाला कलाटणी मिळाली. लढाई आवरती घ्यावी लागली. रंगून येथे २३ जानेवारी १९४५ ला सुभाषबाबूंचा वाढदिवस साजरा झाला. चांदीची ताटेच्या ताटे भरभरून सोने, जडजवाहीर गोळा झाले. स्वातंत्र्य सैनिकांत 'आत्माहुति' पथक सुरू झाले. या पथकात नावे देण्यासाठी हजारो युवक पुढे आले. सर मुथिया चेट्टियार नावाच्या एका सधन गृहस्थाने आपली लक्षावधी रुपयांची मिळकत सुभाषबाबूंच्या चरणी अर्पण केली.

सुभाषबाबूंनी शौर्य गाजविणाऱ्या शूरांना पदके, पारितोषिके दिली. २२ सप्टेंबर १९४४ रोजी हुतात्मा दिन साजरा केला. ह्या प्रसंगी भगतसिंग, जतींद्रनाथ दत्त, चंद्रशेखर आझाद इत्यादी शूर क्रांतिकारकांचा जीवन-वृत्तांत सांगून नेताजी म्हणाले, 'आपली मायभूमी स्वातंत्र्याचा शोध घेत आहे! ती स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय जिवंत राहू शकणार नाही. या प्रसंगी आम्हांला तळहातावर शीर घेऊन लढणारे शूर वीर, बंडखोर हवेत. तुम्ही मला तुमचं रक्त द्या-मी तुम्हांला स्वातंत्र्य देईन! ही स्वातंत्र्यदेवीची मागणी आहे.'

या भाषणाला प्रतिसाद मिळाला. सर्वांच्या मुखांतून एकदमच उत्तर आले.-'आमची सिद्धता आहे. रक्त आत्ताच घ्या हवं तर!'

२२ सप्टेंबर १९४४ रोजी रक्ताने लिहिलेल्या प्रतिज्ञा घेण्यात आल्या. नेताजी म्हणाले, 'माझे म्हणणे नीट ऐकून घ्या. भावनोद्रेकाने केवळ हो म्हणू नका.' जनतेने उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. सुऱ्या, चाकू, टाचण्या यांनी भराभर रक्त निघत होते. सतरा स्त्रियांनी प्रथम रक्ताने सह्या केल्या. नंतर पुरुषवर्गाने सह्या केल्या.

सूर्यग्रहण

२३ जानेवारी १९४५ च्या सभारंभानंतर नेताजी पुन्हा आघाडीवर गेले. मेजर जनरल शहानवाज, कर्नल सहगल व मेजर धिलन हे आघाडीवरील कामगिरी उत्तम तऱ्हेने बजावीत होते. परंतु आझाद हिंद सेनेचे संख्याबळ कमी पडले. ब्रिटिशांजवळ मुबलक सैन्य व अपार शस्त्रपुरवठा, दारूगोळा होता.

आता दुसरी चढाई सुरू झाली. १९४५ च्या फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात इंग्रजांची दुसरी मलाया सेना कॅप्टन सहगलनी रोखून धरली.

पावसाळा सुरू झाला. इंफाळवरील मोहीम आझाद हिंद सेनेला थांबवावी लागली.

कोहीमाच्या आघाडीवर सरदार गुलजारा सिंहाने मोठ्या शौर्याने इरावती नदी पार करून इंग्रजांच्या सेनेला रोखून धरले–मागे मागे हटविले.

आता पावसाळी प्रतिकूल हवेमुळे माघार घेणे योग्य होते. विनाकारण प्राण खर्ची घालण्यापेक्षा ब्रह्मदेशातील आघाडी न चालविता दुसरीकडून युद्ध चालवण्याचा निर्णय सुभाषबाबूंनी घेतला व रंगूनमार्गे ते बँकॉकला गेले. हा प्रवास अवघा तीनशे मैलांचा पण फार धोक्याचा होता. रणधुमाळीत सही-

सलामत जाऊन पोचण्यास त्यांना तीन आठवडे लागले. २४ एप्रिल १९४५ ला ते बँकॉकला पोहोचले. रंगूनमधील व्यवस्था त्यांनी ले. कर्नल धिलन यांचेवर सोपवली.

युद्धाचा रंग पालटत चालला होता. जर्मनी, जपान, इटली या राष्ट्रांना जागोजाग मोठा पराभव पत्करावा लागला होता. सुभाषबाबूंना हे सर्व दिसत होते.

मार्च १९४५ च्या तिसऱ्या आठवड्यात जपान्यांनी रंगून खाली केले. अमेरिकेने याकोहामा शहरावर अखंड बॉंबवर्षाव करून शहर धुळीस मिळविले. लाखो नगरवासियांची कत्तल झाली. जपानी सेनेची विलक्षण पीछेहाट सुरू झाली आणि त्यामुळे सुभाषबाबू व आझाद हिंद सेनेचे मनोरथ धुळीला मिळाले. १३ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकन विमानांनी जपानच्या नागासाकी हिरोशिमा या शहरावर बॉंब टाकून ती बेचिराख केली. विध्वंसक युद्धास सुरवात झाली. सर्वजण हादरले! जपानी सरकारने १५ ऑगस्ट १९४५ रोजी अधिकृतरीत्या आपली शरणागती जाहीर केली. शस्त्रास्त्रे खाली ठेवली. इंग्रज व अमेरिकेचा जय होत गेला. इकडे युरोपात ७ मे १९४५ रोजी जर्मनीने पूर्णपणे माघार घेऊन आत्मसमर्पण केले.

नेताजी आणि आझाद हिंद सेनेतील वीरांची इच्छा मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढता लढता धारातीर्थी देह ठेवावा अशी होती पण इतर सर्व नेते विरुद्ध होते. हजारो सैनिकांचे बलिदान करणे योग्य नव्हे असे त्यांचे मत पडले. या सर्वांच्या इच्छेला मान देणे नेताजींना भाग पडले.

जपानी सैन्याने माघार घेतली होती. जपानी सरकारचे धाबे दणाणले. ५ मार्च १९४५ रोजी 'मिटकीना' शत्रूच्या हाती गेले. त्या मागोमाग १५ मार्चला रंगूनही ब्रिटीशांच्या हाती आले. जपानी सेनेचा व वैमानिकांचा पाठिंबा आझाद हिंद सेनेला मुळीच मिळत नव्हता. सर्व परिस्थिती प्रतिकूल होत चालली होती. अगदी नाइलाज म्हणून २४ एप्रिल १९४५ रोजी आझाद हिंद सरकार रंगून सोडून बँकॉककडे गेले. ३ मे १९४५ रोजी आझाद हिंद फौजेने रंगून ब्रिटिशांच्या हवाली केले.

सर्वोच्या शेवटी २४ एप्रिलला सुभाषबाबूंनी रंगून सोडून बँकॉकला प्रयाण केले. रंगून सोडण्यापूर्वी त्यांनी आझाद हिंद सेनेला अखेरचा संदेश दिला—

" आझाद हिंद फौजेचे शूर अधिकारी व सैनिकहो, मी अतिशय जड अंतःकरणाने ब्रह्मदेश सोडून चाललो आहे. फेब्रुवारी १९४४ पासून तुम्ही सतत अनेक शौर्यशाली लढे येथे दिलेत-देत आहात....पहिली चकमक आम्ही हरलो. अजून पुष्कळ चकमकी लढवायच्या आहेत...मी जातीवंत आशावादी असून कोणत्याही परिस्थितीत पराभव पत्करणार नाही.

" इंफाळच्या मैदानावर, आराकानच्या डोंगरात, जंगलात, ब्रह्मदेशातील तेलखाणीच्या मुलखात व इतर ठिकाणी तुम्ही गाजविलेली शूर कृत्ये ही आमच्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात अमर राहतील. "

" भाइयो, हा तुम्हाला तात्पुरता पराभव स्वीकारावा लागत आहे. तो पराभव वीराप्रमाणे स्वीकारा. शिस्त आणि स्वाभिमान यांचा उत्तम नमुना आपल्या वर्तनात तुम्ही दाखवा. हिंदुस्थानच्या भावी पिढ्या तुम्हांला दुवा देतील व जगाला जाहीरपणे सांगतील की तुम्ही, त्यांचे वाडवडील, मणीपूर आसाम आणि ब्रह्मदेश येथे लढला; आणि तुम्हांला अल्पकाळ पराभव स्वीकारावा लागला तरी त्या पराभवाने तुम्ही अखेरचे यश आणि कीर्ती यांचा रस्ता तयार करून ठेवला आहे. "

"हिंदुस्थान स्वतंत्र होणारच याबद्दलचा माझा अढळ विश्वास तसाच आहे. आमचा तिरंगी राष्ट्रीय झेंडा, आमच्या राष्ट्राची ही इभ्रत आणि हिंदी योद्धयांची सर्वोत्कृष्ट परंपरा या गोष्टी मी तुमच्या हाती सोपवीत असून तुम्ही त्या जतन कराल अशी माझी खात्री आहे...तुमचे बांधव दुसरीकडून जेव्हा हा स्वातंत्र्य-लढा चालू ठेवतील त्यावेळी तुमचे तेजस्वी उदाहरण त्यांच्यापुढे चमकत राहील. "

' माझ्या इच्छेप्रमाणे भला वागता आले असते तर अशा संकटाच्या वेळी येथे राहून तात्पुरत्या पराभवाचे दुःख तुमच्या संगतीत भोगणे मी अधिक पसंत केले असते. परंतु माझे मंत्री व वरिष्ठ अधिकारी यांच्या सल्ल्यावरून स्वातंत्र्यलढा पुढे चालविण्यासाठी मी ब्रह्मदेश सोडून जात आहे-मी तुम्हांला आश्वासन देतो की आपले हिंदुस्थानातील बांधव कोणत्याही परिस्थितीत लढा

चालू ठेवतील; तुम्ही भोगलेल्या यातना आणि त्याग व्यर्थ जाणार नाहीत. मी घेतलेल्या शपथेला चिकटून राहीन–हिंदी लोकांची सेवा मी यथाशक्ती करीत राहीन आणि स्वातंत्र्यासाठी लढेन. शेवटी मी एवढीच विनंती करतो की माझ्यासारखा दुर्दम्य आशावाद तुम्हीही धारण करा आणि माझ्यासारखीच श्रद्धा बाळगा. प्रभातकाळापूर्वी गडद काळोख हा नेहमीच येतो. हिंदुस्थान स्वतंत्र होणारच आणि तो लवकरच!

"ईश्वर तुमचे भले करो."

'इन्किलाब झिंदाबाद'

'आझाद हिंद झिंदाबाद'

'जयहिंद'

२४ एप्रिल १९४५ सुभाषचंद्र बोस

आझाद हिंद सेनेचे सरसेनापती.

सुभाषबाबूंनी आपल्या भारतीय बांधवांचा आणि सहकारी मित्रांचाही अखेरचा निरोप घेतला. त्या प्रसंगी त्यांनी नभोवाणीवर भाषण केले. ते म्हणाले,

'हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य–संग्रामातील एक गौरवशाली अध्याय नुकताच पुरा झाला आहे. त्या अध्यायातले तुमचे कार्य अमर आहे. मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी तुम्ही केलेला त्याग अतुलनीय आहे. त्या त्यागाचे कधीही विस्मरण होणार नाही.'

ब्रह्मदेश सोडून जाताना सुभाषबाबूंचे अंतःकरण फार व्यथित झाले होते. आपण हरलो आहोत याचे शल्य त्यांच्या हृदयात डाचत होते. तरी ते निराश झाले नाहीत. परिस्थितीच इतकी बदलली होती की त्या स्थितीत एकट्या दुकट्या सेनेचे सामर्थ्य थिटे पडले असते.

कोणत्या दुर्दम्य आशेने सुभाषबाबूंनी अज्ञातवास पत्करून चार वर्षांपूर्वी १६ जानेवारी १९४१ रोजी हिंदुस्थानातून परदेशात प्रवेश केला! किती संकटे सोसली, वेषांतर केले, नावे बदलली, किर्तींचे सहकार्य मिळविले, किती थोर राजकारणधुरंधर नेत्यांच्या, राष्ट्रधुरीणांच्या गाठीभेटी घेतल्या, मसलती केल्या, बेत आखले, योजना यशस्वी केल्या, सैन्याची संघटना केली, द्रव्य मिळविले,

झुंझार लढवय्ये शूर सेनापती मिळविले, स्वातंत्र्य-सरकार स्थापन केले, अनेक राष्ट्रांची मान्यता मिळविली, हिंदुस्थानची प्रतिष्ठा वाढवली. स्वातंत्र्याची आकांक्षा तेवत ठेवली, लढा दिला, स्वतंत्र राष्ट्रांच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त केला, हे आता सर्व धुळीस मिळणार काय? हे बलिदान, हा त्याग, हे समर्पण व्यर्थ होणार काय? पण बलिदान कधीही व्यर्थ होत नसते.

२४ एप्रिल १९४५ सुभाषबाबूंनी रंगून सोडले. १४ मे १९४५ रोजी नेताजी बँकॉकला पोचले. तो अशुभक्षण कसा आला कोण जाणे? स्वातंत्र्य-सैनिकांनी माघार घेण्यास सुरुवात केली. त्या फौजाही बँकॉककडे परतू लागल्या. झाशी राणी पथकाला परत पाठवण्यात आले. जपान, जर्मनी या राष्ट्रांचा टिकाव लागेना. जर्मनीचा तर धुव्वा उडाला. तरी सुभाषबाबू डगमगले नाहीत. त्यांनी निरोप देताना सांगितले होते—' जपान शरण गेले असेल पण आमचे सैन्य शरण गेले नाही. आमच्या लढ्याचे स्वरूप तात्पुरते बदलावे लागेल पण आमचे स्वातंत्र्ययुद्ध संपलेले नाही. आमच्यापैकी कोणीही सशस्त्र युद्ध चालू ठेवले तर त्यात मला आनंदच आहे. '

सिंगापूरला नेताजींनी अधिकाऱ्यांना बोलावून घेतले. चर्चा केली. या प्रसंगी नेताजींनी जावे कोठे व कसे? काहीही झाले तरी नेताजी इंग्रजांच्या हाती सापडू नयेत ही प्रत्येकाची तळमळ.

१५ ऑगस्ट १९४५ ला जपानने पूर्ण शरणागती पत्करल्यावर सुभाषबाबूंना सिंगापूरला राहणे अशक्य झाले. पण जायचे कोठे? शक्य तर नेताजींनी रशियात जावे असे सर्वांचे मत पडले. मेजर कियानी यांनी सेनाप्रमुख म्हणून सिंगापूरला राहावे, मेजर अय्यर, मेजर हसन वगैरे चार माणसांनी नेताजींबरोबर राहावे असे ठरले.

नेताजींचे दर्शन घेण्यास बँकाकला हजारो लोक जमले. बँकॉकहून नेताजी व त्यांचे सहकारी सायगावला पोचले.

१६ ऑगस्ट १९४५ रोजी सुभाषबाबू कर्नल हबीबूब रहमान यांच्यासह टोकियोला जाण्यासाठी निघाले. सायगावच्या विमानतळावरून टोकियोला जाण्यासाठी सज्ज असलेल्या एकमेव विमानात एकच जागा शिल्लक होती. एकट्यानेच जाण्याचे धाडस करणे योग्य नाही असे ठरले. सायगावला तर

राहणे शक्य नव्हते. अशा स्थितीत नेताजी जपानी अधिकाऱ्यांना भेटले. आणखी एक जागा मिळविली. कर्नल हबीबला बरोबर नेण्याचे ठरले. घाईघाईने नेताजी व हबीब यांचे सामानाची बांधाबांध करून विमानतळ गाठला.

सायगावला विमानतळावर सर्व हिंदी अधिकारी नेताजींना निरोप देण्यासाठी गेले होते. हा अखेरचाच निरोप होता काय? कोणाच्या तोंडून शब्द निघेना. सर्वांचे कंठ दाटून आले. नेताजींचे हृदय भरून आले. त्यावेळी ते उपाशीच होते; जेवणखाण करण्यासही त्यांना सवड झाली नव्हती.

१७ ऑगस्ट १९४५ रोजी सायंकाळी ५। वाजता नेताजी विमानात चढले. विमान सुरू झाले. बरोबर फक्त एक सहकारी होता. हबीबूब रहिमान. विमानतळावर गुलझारसिंग, अय्यर, प्रीतमसिंग, हसन, देवनाथदास इतकी मंडळी जमली होती. नेताजी पोचणार होते त्याच ठिकाणी दुसरे दिवशी बाकीच्या मंडळींनी जाण्यासाठी प्रयत्न केले. परवानगी फक्त एकाला मिळाली. त्याप्रमाणे प्रसिद्धीप्रमुख अय्यर यांनी नेताजींकडे जावे व बाकीच्यांनी जपानला जावे असे ठरले.

१७ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजींच्या विमानाने उड्डाण केले. दोन तासांनी टूरेन या इंडोचीनमधील विमानतळावर विमान पोचले. तिथे रात्रभर मुक्काम होता. विमानाने पेट्रोल भरून घेतले. प्रवाशांनी उपहार करून घेतला. दुसरे दिवशी १८ ऑगस्ट १९४५ रोजी दुपारी २–३५ वाजता विमान टूरेन विमानतळावरून उंच उडाले. विमान जरा वर जाते न जाते तोच एक भयंकर आवाज झाला. विमानाचा पंखा मोडला होता. विमान जोराने खाली कोसळत होते! त्यातच पेट्रोलची टाकी फुटली. उतारूंच्या अंगावर पेट्रोल उडाले. नेताजींच्या अंगावर, कपड्यांवर पेट्रोल उडाले. हात भाजून निघाले. कपड्यांनी पेट घेतला. कमरेचा पट्टा सोडता सोडताच नेताजी बेशुद्ध होऊन खाली कोसळले. हबीबूब रहिमानही अर्धवट बेशुद्ध झाले दोघांनाही औषधोपचारासाठी लष्करी दवाखान्यात नेले. दोघांचेही बिछाने रुग्णालयात शेजारी शेजारी होते. जपानी डॉक्टरांनी नेताजींना वाचवण्याची पराकाष्ठा केली. पण कशाचाही उपयोग न होता १८ ऑगस्ट १९४५ रोजी रात्री ९ वाजता नेताजी सुभाषबाबू मृत्यू पावले. आपला नश्वर देह सोडून अंतराळात विलीन झाले!

असंख्य यातना होत असतानाही नेताजींनी सर्व सहन केले. वेदना असह्य होत होत्या तरी शांत चित्ताने त्यांनी सर्व सहन केले. कधी सुस्कारा काढला नाही की कधी विवळले नाहीत. आपण या दुखण्यातून जगत नाही अशी खात्री होताच ते जवळ असलेल्या हबीबना म्हणाले, 'हबीब, माझा शेवट जवळ आला आहे. माझा देश स्वतंत्र व्हावा म्हणून मी आतापर्यंत झगडलो व देशाच्या स्वातंत्र्यासाठीच मी हौतात्म्य पत्करत आहे. भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढा द्या. भारत लवकरच पूर्ण स्वतंत्र होणार – हाच माझा अखेरचा संदेश.'

झाले ! सर्व शांत शांत झाले ! देशविमोचनासाठी बलीदान झाले!! स्वतंत्रता देवीच्या स्थंडिलावर एका महान विभूतीची आहुती पडली. देशकार्यासाठी झिजवलेला चंदनासारखा देह शेवटी अग्निस्वरूपी विलीन झाला. अलांछित सूर्य अस्तास गेला! कायमचा!!

नेताजींचा देह टोकियोला न्यावा यासाठी कर्नल हबीब यांनी पुष्कळ खटपट केली. पण यश आले नाही. २० ऑगस्ट १९३५ रोजी त्यांचे पूर्ण लष्करी सन्मानात दहन करण्यात आले! २३ ऑगस्ट ४५ रोजी त्यांच्या निधनाचे वृत्त रेडिओवरून भारतात प्रसृत झाले. त्यांच्या अस्थी एका कलशात घालून टोकियोला पाठविण्यात आल्या. रेणुका मंदिरात त्या जतन करून ठेवल्या आहेत. भारतात त्या केव्हा आणल्या जाणार कोण जाणे!

स्वातंत्र्यसूर्याला अर्घ्य

सुभाषचंद्र गेले आणि एका श्रेष्ठ धाडसी स्वातंत्र्यसूर्याचा अस्त झाला!! देशविमोचनासाठी त्यांनी केलेल्या धाडसांना तोड नाही. सुभाषचंद्र निधन पावले–सर्व देश हळहळला. आपल्या मातृभूमीला त्यांनी देवता मानून तिच्या चरणी आपले सर्वस्व अर्पण केले. उच्च पदांचा राजीनामा दिला. चालून आलेल्या आय. सी. एस. परीक्षेनंतरच्या सोनेरी अधिकाराला तुच्छ लेखले! आपले ध्येय गाठण्यासाठी उपोषणे केली, सत्याग्रह केला, बंड पुकारले, तुरुंगवास, हालअपेष्टा सहन केल्या. त्यांचा स्वभाव तापट असला तरी त्यांनी महात्मा गांधी, चित्तरंजनदास यांच्यापासून स्वातंत्र्यवीर सावरकरादी क्रांतिकारकांचाही सल्ला घेतला. मार्गदर्शन स्वीकारले. ते वृत्तीने गूढवादी, अध्यात्मवादी होते तरी अध्यात्मवाद त्यांच्या वृत्तीला पुढे पोषक ठरला नाही. त्यांची वागणूक सौजन्यशील होती. ते शौर्याचे, देशभक्तीचे, त्यागाचे पूजक होते. त्यांना विभूतीपूजा मान्य नसे. ते आपली मते कोणावर लादत नसत. सच्चा मित्र, योग्य वेळी मदत करणारा मार्गदर्शक मित्र म्हणून ते लोकप्रिय होते, ते द्रष्टे महापुरुष, सच्चे देशभक्त, धडाडीचे नेते होते. स्वतःच्या सामर्थ्यावर त्यांचा विश्वास होता. त्यांची इच्छाशक्ती प्रबळ होती. तिच्या जोरावर त्यांनी अचाट साहसी कृत्ये केली, प्राण पणाला लावून तळहातावर शीर घेऊन! सेनापतीचे गुण–योजकत्व, दूरदृष्टी, धडाडी, शौर्य, निर्भयता,–सर्व त्यांच्या अंगी पूर्णपणे वसत होते!

आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्यापासून चंद्रशेखर आझादपर्यंत सर्व क्रांतिकारकांच्या स्वप्नाला स्वतंत्र भारताचे सरकार परदेशात स्थापन करून, आझाद हिंद सेनेची उभारणी संघटना करून, त्यांनी मूर्त स्वरूप दिले. ईश्वराला साक्षी ठेऊन शपथा घेतल्या—

'हिंदुस्थान पूर्ण स्वतंत्र होईपर्यंत, माझ्या देहात रक्ताचा शेवटचा बिंदू

असेपर्यंत मी मायभूमीचा एकनिष्ठ सेवक म्हणून लढत राहीन.' ही प्रतिज्ञा त्यांनी खरी केली.

सुभाषचंद्र हे खरे समाजसेवक होते. दुष्काळ, महापूर, भूकंप या आपत्तीत त्यांनी लोकांचे प्राण वाचविण्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न केले. ते स्वयंसेवक होऊन औषधे पुरवीत, रुग्णांची शुश्रूषा करीत. जपान्यांनी कलकत्ता, आसाम यांवर बॉंबफेक करण्याचे ठरविले त्यावेळी आपल्या देशबांधवांचे प्राण नाहक बळी पडू नयेत म्हणून त्यांनी जपानी सरकारला थोपवून धरले. बंगालमध्ये दुष्काळ पडला; अन्नान्न दशा झाली त्यावेळी ब्रह्मदेशातून एक लाख टन तांदूळ देऊ केला. "जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले"—अशा मानवतेच्या उपासकांच्या ठायीच दिव्यत्व व देवत्व नांदते. सुभाषचंद्र हे अशाच श्रेष्ठ श्रेणीस पोचलेले महान समाजसेवक-देशभक्त होते.

सुभाषचंद्र बोस यांनी परदेशात जर्मनी, जपान, ब्रह्मदेश, मलायात जाऊन, स्वतंत्र सरकार स्थापून व स्वतंत्र सेना उभारून जो लढा दिला त्यामुळे हिंदुस्थानचे स्वातंत्र्य निदान दहा वर्षे तरी अलीकडे येऊ शकले हे खास. या त्यांच्या प्रयत्नाने ब्रिटिश राजसत्ता हादरली; त्यांचे सिंहासन डळमळू लागले! असंतोष भडकला. विमानदलातील लोकांनी हरताळ केला. नाविक दलाने बंड केले. सेना बिथरली. चतुर ब्रिटिशांनी ओळखले, वेळीच घडा घेतला. आणि धक्के मारून घालविण्याचा दुर्धर अपमानास्पद प्रसंग ओढवून न घेता सत्ता सोडून १५ ऑगस्ट १९४७ ला देश भारतीयांच्या हवाली केला. पण अखंड भारत नव्हे तर विभागून!! अखंड भारताचे स्वप्न जोवर अजून साकार झाले नाही तोवर सुभाषचंद्रांचा आत्मा तळमळत राहील! अखंड भारत झालेला पाहिल्यावर तो मुक्त होईल!

सिंधू, सतलज, रावी-लाहोर, क्वेट्टा, कराची ही अखंड भारताचीच पवित्र स्थाने-ती आज परदेशात आहेत! भारतसूर्याला अर्घ्य होण्यासाठी गंगा, यमुना, कृष्णा, गोदावरी या नद्यांच्या पवित्र जलाबरोबर अंजलीत सिंधू नदीचे अमृतजल येईल तेव्हाच हे अर्घ्यदान पुरे होईल!

नेताजींचे चरित्र संपले. त्यांच्या अमोलिक गुणांचे गुणगान करावे तितके थोडे. त्यांचे जीवन म्हणजे अखंड तेवलेली ज्वाला! अग्निकुंडातील हे रण-

चंडीचे स्थंडिल-त्यात त्यांनी आपल्या तन मन धनाची आहुती दिली. निर्मल चारित्र्य, अपूर्व त्याग, निरलस सेवा, अतुलनीय धैर्य अचाट साहस यांचे ते मूर्तिमंत प्रतीकच! ब्रिटिश नोकरशाहीच्या जुलूम, जबरदस्तीला हा पुरुष पुरून उरला! बावनकशी सुवर्णासारखा जितका भट्टीत घातला तितका तेजाळला-प्रज्वलित झाला! त्यांचा बाणा लढाऊ, वाटल्यास शत्रूंनी नमावे-मोडावे, पण हा शूरवीर शेवटपर्यंत 'नमयतीव धरित्रीम्' ताठच राहिला.

या स्वातंत्र्यसूर्याला शतशः प्रणाम!


म. ग्रं. सं. ठा., वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. 1124. दिनांक .....
विषय.....कि२।२.....क्र...६२१..

दिनचर्या कौटुंबिक जीवन

देशासाठी सर्वस्वाचे बलिदान करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना खाजगी जीवन असे नसतेच. आपल्या ध्येयाशी, कार्याशी ते सदासर्वकाळ समरस झालेले असतात. त्यांना स्वतःच्या कुटुंबाकडे लक्ष द्यायला सवडच नसते.

नेताजी फार उशीरापर्यंत रात्री काम करीत. झोपी जाण्यापूर्वी धार्मिक ग्रंथांचे वाचन करीत. उशीरा उठत. स्नानानंतर चहा– तो भरपूर लागे. सुपारीचेही जबर व्यसन होते तसे सिगारेट ओढण्याचेही. चर्चेच्या वेळी सिगारेटचे होमकुंड पेटलेले असे. चहाचेही ते भोक्ते होते.

सकाळी ११–१२ पर्यंत संघाच्या कचेरीत काम, नंतर साधे जेवण– भात-वरण, भाज्या, दही, केळी, मासे, शेवटी कॉफी. जेवणाच्या वेळी थट्टामस्करी, विनोद चाले. जेवण संथपणे सावकाश चाले. ते नित्य आनंदी, आशावादी, उत्साही असत!

दुपारी भेटी–चर्चा होत. पुढचे कार्यक्रम आखले जात. पत्रोत्तरे लिहिणे वगैरे कामकाज रात्री जागून पुरे करीत. बॅडमिंटन हा त्यांचा आवडता खेळ. त्यांची दोन वानरे, दोन शेळ्या दोन ससे. तीन बदके एक तट्टू असे आवडते प्राणी होते. वानरांची नावे होती राम–सीता. नेताजी सदैव आनंदी आशावादी असत! त्यांच्या चेहऱ्यावर विमनस्कता, म्लानपणा, निराशा कधी दिसत नसे. समदुःखे समे कृत्वा' या गीतावचनाप्रमाणे त्यांचे जीवन असे. वृत्तीने ते गंभीर, गूढवादी वाटत. पण मोठ्यांशी मोठ्याप्रमाणे लहानाशी लहान मुलांप्रमाणे वागून ते समरस होत. ते लोकप्रिय नेते होते. अखिल भारताचे अनभिषिक्त सम्राट होते.

त्यांना कौटुंबिक सौख्य असे कधी लाभलेच नाही. घनदाट अरण्यात काळोखाचे साम्राज्य असताना विद्युल्लता चमकून जावी तसे त्यांचे कौटुंबिक जीवन-फक्त एका वर्षाचे! एमिली शेंकेल त्यांच्या जीवनात आली– पण क्षण-भरच! पण या अल्पकाळातही दोघांच्या मधुर मीलनाचे एक प्रतीक कन्या-

रत्नाच्या रूपाने अर्पण करून. अनीता सुभाष बोस हे ते कन्यारत्न! तिचे पिता हे असे भारतीय उज्ज्वल कीर्तीचे रत्नदीप! – महिना झाला तोच पितृसुखाला अनिता पारखी झाली. आणि अवघ्या दोन तीन वर्षांत कायमची दुरावली!!– २९ नोव्हेंबर १९४२ चा तिचा जन्म आणि १८ ऑगस्ट १९४५ रोजी सुभाषबाबूंचा अस्त.

सुभाषचंद्र, भारताच्या जीवनमूल्यांशी, परंपरेशी, अस्मितेशी एकरूप झाले. अमृत बिंदू सागरात विलीन झाला.

सिंधुसागर बनला!!

• • •

परिशिष्ट २

जीवनपट–प्रमुख घटना

१८९७—२३ जानेवारी जन्म–ओरिसा–कटक
१९१३—मॅट्रिक
१९१४—सत्पुरुषाच्या शोधात.
१९१८—बी. ए. पहिला वर्ग
१९२०—आय सी. एस. परीक्षा पास–राजीनामा
१९२१—महात्मा गांधींची प्रथम भेट १६ जुलै १९२१
१९२१—१० डिसेंबर कारावास. पहिली शिक्षा
१९२२—चित्तरंजनदास यांचे चिटणीस
१९२७—अटक–मंडाले येथे तुरुंगात.
१९३०—३० जानेवारी–कायदेभंग लढ्यात कारावास.
१९३३—३१ मार्च–औषधोपचारासाठी व्हिएन्नाला गेले.
१९३६—हिटलरशी प्रथम भेट
१९३८—हरिपुरा काँग्रेस अध्यक्ष

१९३९—त्रिपुरी कॉंग्रेस अध्यक्ष
१९३९—कॉंग्रेसचा राजीनामा–पुरोगामी गटाची स्थापना.
१९४०—२२ जून स्वातंत्र्यवीर सावरकरांची भेट
१९४१—२७ जानेवारी. भारतातून अदृश्य
१९४१—२० एप्रिल बर्लिनमध्ये प्रगट होतात.
१९४१—हिटलरशी दुसरी भेट
१९४२—नेताजी एमिली शेंकेलशी विवाहबद्ध होतात.
१९४३—जर्मनीतून सिंगापूरला पाणबोटीतून गुप्तपणे
१९४३—१४ जून. जनरल टोजोशी भेट–टोकियो.
१९४३—४ जुलै. आझाद हिंद सेनेचे अध्यक्ष
१९४४—२५ ऑगस्ट. सरसेनापती
१९४३—२१ ऑक्टोबर. आझाद हिंद सरकारची स्थापना प्रमुख.
१९४३—२२ ऑक्टोबर झाशी राणी रेजिमेंटची स्थापना.
१९४३—हिंदी स्वतंत्र राष्ट्रास नऊ परदेशी राष्ट्रांची मान्यता.
१९४३—३१ डिसेंबर. अंदमान निकोबार बेटावर स्वामित्व
१९४४—२१ मार्च. आझाद हिंद सेनेचे भारतीय हद्दीत पदार्पण. मणीपूर येथे स्वातंत्र्यध्वज फडकविला.
१९४५—१५ ऑगस्ट. जपानची संपूर्ण शरणागती.
१९४५—१६ ऑगस्ट. शेवटचा संदेश निरोप बँकॉकहून प्रयाण.
१९४५—१८ ऑगस्ट. तैहोकू विमानतळावर अपघाती निधन ४८ व्या वर्षी.
१९४५—२३ ऑगस्ट सुभाषचंद्र बोस यांच्या निधनाची वार्ता जपानने प्रसिद्ध केली.

BVBK-0401124

आभार

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे एकंदर जीवनच अतिशय चित्तथरारक आणि प्रेरणादायक आहे. नियतीने या पृथ्वीवर सुभाषचंद्रांच्या रूपाने एक अतिशय भव्यदिव्य असे नाट्य घडविले. सुभाषचंद्रांच्या जीवनातील प्रत्येक क्षण चित्रित करण्यासाठी शब्दसंपत्ती अपुरी पडावी असे नाट्य त्यात भरलेले आहे.

माझ्या लेखणीने हे जीवन साकार करण्याचा माझा हा प्रयत्न कितपत यशस्वी झालेला आहे हे वाचकांनीच ठरवायचे आहे. हे चरित्रलेखन करीत असताना या व्यक्तिमत्वाच्या अगदी सन्निध असल्यासारखा भास मला सतत होत राहिला. हे क्षण मी कधीही विसरणार नाही. हे चरित्रलेखन करीत असताना अनेक व्यक्तींनी आपलेपणाने मला सहकार्य दिले. अनेक पुस्तकांनी सुभाषबाबूंच्या अष्टपैलू व्यक्तित्वाचा पटच माझ्यापुढे उलगडला. आभार मानणे त्यांना आवडणार नाही तरीही माझे परम मित्र सर्वश्री शं. रा. देवळे, रा. प्र. कानिटकर आणि दा. न. शिखरे यांचा येथे उल्लेख करणे मला अगत्याचे वाटते; कारण त्यांच्या सहकार्यानेच ही सूर्यगाथा मी पूर्ण करू शकलो.

— ना. स. करंदीकर

'अनिरुद्ध' पुस्तके

टेलिव्हिजन

महाराष्ट्र राज्य पारितोषिक विजेता ग्रंथ

रमेश के. सहस्रबुद्धे

महासागर

महाराष्ट्र राज्य पारितोषिक विजेता ग्रंथ

विद्याधर सहस्रबुद्धे

सोनेरी जयगाथा

बांगला देश लढ्याची कुमारांसाठी स्फूर्तिदायक कथा

वि. के. फडके

असा झुंजला माझा भारत

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा पूर्वार्ध

स्वतंत्र झाला माझा भारत

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा उत्तरार्ध

स्वातंत्र्योत्तर माझा भारत

स्वातंत्र्योत्तर कालातील भारतीय वाटचालीची कथा

राजा मंगळवेढेकर

सोन्याची कथा

चित्ताकर्षक सोन्याची चित्तवेधक ओळख

दि. बा. मोकाशी

भारताची विज्ञानभूषणे

आधुनिक भारतीय वैज्ञानिकांच्या जीवनकार्याचा परिचय

प्रा. ना. वा. कोगेकर

भारतीय अणुयुगाचे शिल्पकार

अणुयुगाकडे भारताला नेणाऱ्या वैज्ञानिकांची कथा

यदुनाथ थत्ते